रायगड, सोमवार, दि. १३ मे २०२४

कृषीवल

किंमत ४ ₹

देशभरातील हवा बदलतेय : शशी थरुर

नवी दिल्ली : लोकसभेची ही निवडणूक साधारण निवडणूक नसून भारताचा आत्मा सुरक्षित ठेवण्यासाठीचा हा संघर्ष आहे. भाजपाने लोकशाही, संविधान धोक्यात आणले आहे, विविधतेला खुलेआमपणे छेद दिला आहे. तीन टप्प्यातील मतदान झाले असून दक्षिण भारतातच नाही तर सर्वच राज्यात हवा बदललेली दिसत आहे. ४ जूनला दिल्लीतून भारतीय जनता पक्षाचे सरकार जाऊन इंडिया आघाडीचे सरकार येईल, असा विश्वास काँग्रेसचे वरिष्ठ नेते, माजी केंद्रीय मंत्री शशी थरूर यांनी व्यक्त केला आहे.

विमानतळ बॉम्बने उडवण्याची धमकी

नवी दिल्ली : दिल्लीतल्या वेगवेगळ्या रुग्णालयांना बॉम्बने उडवण्याची धमकी मिळाली आहे. त्यानंतर आता दिल्लीतल्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळाला बॉम्बने उडवण्याची धमकी देणारा देणारा मेल प्राप्त झाला आहे. काही दिवसांपूर्वी दिल्लीतील अनेक शाळांना बॉम्बने उडवण्याची धमकी मिळाली होती. त्यानंतर रविवारी दोन रुग्णालयांना बॉम्बने उडवून देण्याची धमकी ई-मेलच्या माध्यमातून मिळाली आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. दिल्ली पोलीस घटनास्थळी पोहोचले असून, सर्च ऑपरेशन युद्ध पातळीवर सुरु आहे.

चौथ्या टप्प्यातील आज मतदान

। मुंबई । प्रतिनिधी । लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात सोमवारी (दि.१३) देशातील १० राज्यांमधील ९६ मतदारसंघात मतदान होणार आहे. यात महाराष्ट्रातील नंदुरबार, जळगाव, रावेर, जालना, मावळ, अहमदनगर, पुणे, शिरुर, शिर्डी, बीड आणि छत्रपती संभाजीनगर या ११ मतदारसंघांचा समावेश आहे. या सर्व मतदारसंघांत महायुती आणि महाविकास आघाडीच्या उमेदवारांमध्ये चुरशीच्या लढती होत आहे. दरम्यान, याआधी पहिल्या तीन टप्प्यांत झालेल्या मतदानास मतदारांचा कमी प्रमाणात प्रतिसाद दिसून आला आहे. त्यामुळे सत्ताधाऱ्यांसह विरोधकही चिंतेत आहेत. यामुळे निदान चौथ्या टप्प्यात तरी जास्त प्रमाणात मतदान होणार का? याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. •➤ पान ५ वर

संजोग वाघेरे-पाटलांचे पारडे जड

मावळ मतदारसंघातील निवडणुकीच्या रिंगणात संजोग वाघेरे-पाटील हे इंडिया आघाडीचे उमेदवार आहेत. गेल्या महिन्याभरापासून गावबैठकांबरोबरच वेगवेगळ्या सभांमार्फत मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करण्यात आला. देशातील संविधान वाचविण्याबरोबरच हुकूमशाहीविरोधात असलेल्या या निवडणुकीच्या प्रचाराला संजोग वाघेरे यांना मतदारांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. राष्ट्रवादीचे नेते शरद पवार, शेकापचे सरचिटणीस आ. जयंत पाटील, शिवसेना नेते उद्धव ठाकरे, काँग्रेसचे पदाधिकारी अशा इंडिया आघाडीच्या प्रमुख नेत्यांनी संजोग वाघेरे यांना निवडून देण्याचे आवाहन केले.

राज्यात रावसाहेब दानवे, पंकजा मुंडे, चंद्रकांत खैरे, अमोल कोल्हे, हिना गावीत, रक्षा खडसे हे दिग्गज मैदानात आहेत. महायुतीसाठी पंतप्रधान, गृहमंत्र्यांनी, तर आघाडीकडून शरद पवार आणि उद्धव ठाकरेंनी सभाचा धडाका लावला होता.

पुणे मतदारसंघात भाजपाचे मुरलीधर मोहोळ, काँग्रेसचे रवींद्र धंगेकर आणि वंचितचे वसंत मोरे यांच्यात तिरंगी लढत आहे. शिरूर येथे दोन्ही राष्ट्रवादी आमने-सामने असून अजित पवार गटाकडून शिवाजीराव पाटील आणि शरद पवार गटाचे उमेदवार डॉ. अमोल कोल्हे रिंगणात आहेत.

देशभरात एकूण १,७१७ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. चौथ्या टप्प्यात आंध्र प्रदेशातील गुंटूर मतदारसंघातून निवडणूक लढवणारे टीडीपीचे डॉ. चंद्रशेखर पेम्मासानी हे सर्वात श्रीमंत उमेदवार आहेत. पेम्मासानी यांनी त्यांची एकूण संपत्ती ५,७०५ कोटी रुपयांपेक्षा जास्त असल्याचे घोषित केले आहे.

मावळमध्ये २५ लाख ८५ हजार १८ मतदार बजावणार हक्क

२,५६६ मतदान केंद्र

संवेदनशील १६ मतदान केंद्रावर राहणार ८३ सूक्ष्म निरीक्षकांची नजर

राज्यात ११ मतदार संघांमध्ये चुरशीच्या लढती

राज्यात २९८ उमेदवार

प्रशासन सज्ज

प्रमोद जाधव
। अलिबाग ।

मावळ लोकसभा मतदारसंघातील उरण, पनवेल, कर्जत, मावळ, पिंपरी, चिंचवड या सहा विधानसभेतील दोन हजार ५६६ मतदान केंद्रांवर सोमवारी (दि.१३) मतदान होणार आहे. २५ लाख ८५ हजार १८ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. संवेदनशील १६ मतदान केंद्रावर ८३ सूक्ष्म निरीक्षकांची नजर असणार असून, या ठिकाणी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त ठेवला जाणार आहे. •➤ पान ५ वर

रायगडमधून ८५ एसटी बसेस

मावळ मतदारसंघातील मतदान सोमवारी आहे. त्या पार्श्वभूमीवर कर्मचाऱ्यांसह व्हीव्हीपॅट इतर साहित्यांची केंद्रापर्यंत ने-आण करण्यासाठी एसटी बसची व्यवस्था केली आहे. त्यामुळे रायगड परिवहन महामंडळाकडे ८५ एसटी बसची मागणी करण्यात आली आहे. त्यानुसार रायगमधून ८५ एसटी बसेस पाठविण्यात आल्या आहेत.

भयमुक्त वातावरणात मतदान करा

मावळ मतदारसंघातील मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज आहे. सकाळी सात वाजल्यापासून मतदानाला सुरुवात होणार आहे. मतदानाच्या दिवशी काही गैरप्रकार घडणार नाही, यासाठी पोलिसांचा कडेकोट पहारा ठेवण्यात आला आहे. नागरिकांनी कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने सहकार्य करावे तसेच भयमुक्त वातावरणात मतदान करावे, असे आवाहन पुणे ग्रामीणचे उपविभागीय पोलीस उपअधीक्षक सत्य साई कार्तिक यांनी केले आहे.

मतदान केंद्रावर दृष्टीक्षेप

विधानसभा मतदारसंघ	केंद्र	कर्मचारी संख्या	मतदार संख्या
उरण	३४४	१,५२०	३,०९,२७५
पनवेल	५४४	२,४०४	५,६५,९१२
कर्जत	३३९	१,७३२	३,०४,५२३
मावळ	३९०	१,७३२	३,६७,५३४
पिंपरी	४००	१,७७६	३,६४,८०६
चिंचवड	५४९	२,४३६	५,९५,४०८

'.. तर मोदी पंतप्रधान नसते'

। धुळे । वृत्तसंस्था ।

पाचशे रुपयांचे सिलिंडर अकराशे रुपये केले. आदिवासी शेतकऱ्यांना तुम्ही मारहाण केली. शेतकऱ्यांच्या सगळ्याच वस्तू मोदींनी महाग केल्या. मोदी है तो मुमकिन है लेकिन टॅक्स बढाने के लिए. आम्ही ७० वर्षांत काहीच केलं नसतं तर मोदी तुम्ही पंतप्रधान बनले नसते, अशी जोरदार टीका काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर केली. धुळे लोकसभा मतदारसंघाच्या काँग्रेसच्या अधिकृत उमेदवार डॉ. शोभा बच्छाव यांच्या प्रचारार्थ मल्लिकार्जुन खरगे यांची सभा आयोजित करण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी त्यांनी विरोधकांचा समाचार घेतला.

आई ती आईच!

● पनवेल : रखरखत्या उन्हात चिमुकल्याचे अंग भाजू नये, म्हणून पदराची सावली देणारी आई. मातृदिनी त्रिवार वंदन. (छायाचित्र : राजेश डांगळे)

जिल्ह्यात अवकाळीचा तडाखा

कर्जत, पोलादपूरला झोडपले

मोरेवाडीत घर कोसळले; तिघे जखमी

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यात रविवारी पुन्हा एकदा वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. मात्र, चक्रीवादळात तालुक्यातील अनेक गावांतील शेतकऱ्यांच्या घरांचे तसेच झाडे कोसळून नुकसान झाले आहे. दरम्यान, मोरेवाडी येथे वादळी वाऱ्याने सात वर्षांपूर्वी बांधलेले विटा मातीचे घर कोसळले असून, घरातील तिघे जखमी झाले आहेत. जखमींमध्ये दोन लहान बालके असून, त्यांची आईदेखील जखमी झाली आहे. तिघांवर कशेळे ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

सध्या अवकाळी पाऊस सर्वत्र शेतकऱ्यांची त्रेधातिरपीट उडवत आहे. या वादळी पावसाने सलग दुसऱ्या दिवशी हजेरी लावली. शनिवारी माथेरान या थंड हवेच्या ठिकाणी तब्बल एक तास हजेरी लावून उकाड्याने त्रस्त झालेल्या पर्यटकांना आनंद दिला. त्याचवेळी कर्जत तालुक्यात काही ठिकाणी त्या अवकाळी पावसाची रिपरिप रात्री सुरू होती. रविवारी सकाळपासून वातावरणात प्रचंड उष्मा होता आणि त्यात सायंकाळी वादळी वाऱ्याला सुरुवात झाली आणि नंतर पाऊस सुरू झाला. कशेळे परिसरामधील आंबिवली परिसर तसेच खांडस परिसरात सायंकाळी पाऊस झाला. त्यात अवकाळी पावसाने अक्षरशः कशेळे भागाला झोडपून काढले आहे.

मात्र, वादळी वाऱ्याने तालुक्यातील •➤ पान ५ वर

शेतीचे नुकसान

सरकारी कर्मचाऱ्यांना सुट्टी असल्याने अद्याप पंचमाने नाही

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

गेल्या आठवड्यामध्ये अवकाळी पावसाने पोलादपूर तालुक्याला झोडपल्यानंतर शनिवारी सायंकाळी पोलादपूर शहर व तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये अवकाळीचा जोर दिसून आला. यामुळे शहरात जनजीवन तात्पुरते विस्कळीत झाले असले तरी ग्रामीण भागात शेतकऱ्यांच्या आंबा पीक, करवंद, फणसालाही धोका निर्माण झाल्याची माहिती प्राप्त झाली आहे. लोकसभा निवडणुकीसाठी व्यग्र राहिलेल्या महसूल, कृषी, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच ग्रामसेवक, तलाठी आदी यंत्रणांना शनिवार, रविवार सुट्टी असल्याने या अवकाळीतील नुकसानीचे पंचनामे करण्यात आले नाहीत. •➤ पान ५ वर

वाघेरे पाटलांना उरणकरांची पसंती

बारणेंविषयी मतदारांमध्ये नाराजी

। उरण । वार्ताहर ।

गेली दोन टर्म खासदार असलेले श्रीरंग बारणे हे ज्याप्रमाणे पावसाळ्यात छत्र्या उगवतात, त्याप्रमाणे फक्त निवडणुकीत उमेदवारी मिळाल्यानंतर उरण मतदारसंघातील सर्वसामान्य जनता व कामगार वर्गाची आठवण येऊन त्यांच्या गाठीभेटी घेतात, असे येथील जनतेचे म्हणणे आहे. त्यामुळे उरणकरांना आता बदल हवा असल्याने उरणकरांची पसंती ही महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांना असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

ज्या शिवसेना उद्धव ठाकरे पक्षांनी त्यांना दोन वेळा खासदार केले, त्यांच्याशी गद्दारी करून बारणे हे तिसऱ्यांदा निवडणुकीला सामोरे जात आहेत. जे गद्दारी करू शकतात, ते पुन्हा निवडून आल्यावर मतदारांशी कशावरून गद्दारी करून तडीपार होणार नाही, असा सवाल कामगारांनी व्यक्त केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खासगीकरणाचे धोरण अवलंबिले आहे. त्याचा फटका उरणमधील अनेक कंपन्यांना बसला आहे. •➤ पान ५ वर

विमानतळास दिबांचे नाव कधी?

। उरण । वार्ताहर ।

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळास लोकनेते दि.बा. पाटील असे नामांतर केले जाईल, असे सांगण्यात येत आहे. या विमानतळाच्या नामकरणावरून वादंग उठले होते. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे त्यांच्या महाविकास आघाडीने लोकनेते दि.बा. पाटील यांच्या नावाचा प्रस्ताव केला होता. त्यानंतर नाट्यमय राजकीय घडामोडीनंतर ठाकरे सरकार जाऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली नवे सरकार स्थापन झाले. त्यांनी हा ठराव रद्द करून पुन्हा नव्याने ठराव घेतला होता. त्याला आता जवळपास दीड दोन वर्षे होऊनही आजतागायत लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्यात आलेले नाही. •➤ पान ५ वर

अलिबाग, पेणला चक्री जुगाराचा विळखा

पोलिसांकडून कारवाई होत नसल्याचा तक्रारी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

जुगारामुळे अनेक तरुणांसह कुटुंबं उद्ध्वस्त होत असतानादेखील चक्री जुगारासारखे धंदे राजरोसपणे सुरु असल्याच्या तक्रारी आहेत. जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या अलिबागसह पेणलादेखील या अवैध धंद्याने विळखा घातला आहे. मात्र, पोलिसांकडून या धंद्यावर कारवाई होत नसल्याचा आरोप केला जात आहे. काही ठिकाणी सत्ताधाऱ्यांच्या दबामुळेदेखील पोलीस कारवाई करीत नाहीत, असेही बोलले जात आहे. त्यामुळे या बेकायदेशीर धंद्यावर पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे अंकुश ठेवतील का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

अलिबाग पोलीस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर पीएनपी नगर, मासळी बाजार, मेघा चित्र मंदिरजवळ, विद्यानगरमधील माय शॉपी परिसरात तसेच चेंढरे येथील सेंटमेरी स्कूलच्या काही अंतरावर, बाजारातील मिरची गल्ली, तसेच रेवस बायपास रोड अशा ठिकाणी चक्री जुगार चालविला जात असल्याची चर्चा आहे.

पेण शहरासह रसायनी, खोपोली परिसरातदेखील हा धंदा खुलेआमपणे जुगारमाफिया चालवित आहेत, असे सांगण्यात येते. पोलीसदेखील काहीच बिघडवू शकत नाही, अशा पद्धतीने ही मंडळी आपला अवैध व्यवसाय सुरू ठेवत आहेत. जुगारामुळे अनेक तरुण कर्जबाजारी होत असल्याच्या घटना जिल्ह्यात घडत आहेत. या कर्जातून मुक्ती मिळविण्यासाठी •➤ पान ५ वर

> पेणमध्ये छुप्या पद्धतीने सुरु असलेल्या चक्री जुगारावर कारवाई करण्याची मोहीम हाती घेतली जाणार आहे. माहिती घेऊन त्यांच्यावर लवकरच छापे टाकले जाणार आहेत.
>
> – देवेंद्र पोळ, पोलीस निरीक्षक, पेण

> अलिबागमध्ये अवैध धंद्यावर कारवाई केली जात आहे. मात्र, ज्या ठिकाणी चक्री जुगार सुरु आहे, त्यांच्यावरही कारवाई केली जाणार आहे.
>
> – संजय पाटील, पोलीस निरीक्षक, अलिबाग

आदिवासीवाडीचा मतदानावर बहिष्कार

● (छायाचित्र : रवींद्र गायकवाड)

। कर्जत । वार्ताहर ।

रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील नगरपरिषद हद्दीतील भिसेगाव आदिवासी वाडीतील रहिवाशांनी १३ मे रोजी मावळ मतदारसंघात होणाऱ्या मतदानावर बहिष्कार टाकला आहे.

सामाजिक कार्यकर्ते अमोघ कुळकर्णी यांनी पुढाकार घेऊन

- **मूलभूत समस्या अद्याप जैसे थेच**
- **प्रशासनाकडून टाळाटाळ**

आदिवासीवाडीवर समस्या दूर कराव्यात त्यांना त्यांचे मूलभूत अधिकार, हक्क मिळावेत यासाठी शासन दरबारी प्रयत्न •➤ पान ५ वर

'आरटीई' प्रवेश पूर्वीप्रमाणेच

शिक्षण विभागाचा नवा आदेश

। मुंबई । प्रतिनिधी ।

'आरटीई' प्रवेशाच्या नियमातील दुरूस्ती रद्द करून आता इयत्ता पहिलीतील विद्यार्थ्यांना पूर्वीप्रमाणेच प्रवेश मिळणार आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने त्यानुसार बदल करून प्रवेश प्रक्रिया राबविण्यासंदर्भातील आदेश शिक्षण संचालकांना दिले आहेत. येत्या शुक्रवारपासून नव्या आदेशानुसार पालकांना मुलांच्या प्रवेशासाठी नव्याने अर्ज करावे लागणार आहेत.

महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (आर्थिक व दुर्बल गटातील बालकांचे इयत्ता पहिली किंवा पूर्व प्राथमिक वर्ग या स्तरावर किमान २५ टक्के प्रवेश भरण्याची पद्धत) नियम •➤ पान ५ वर

> 'आरटीई' प्रवेशाच्या नियमात आता पुन्हा बदल करण्यात आला आहे. आता पूर्वीप्रमाणेच 'आरटीई' प्रवेश प्रक्रिया राबविली जाणार आहे. पालकांना आपल्या पाल्याच्या इयत्ता पहिलीतील प्रवेशासाठी नव्याने अर्ज करावे लागणार आहेत. त्यासंदर्भातील नवे आदेश निघाल्यानंतर पालकांनी पोर्टलवर अर्ज करायचे आहेत.
>
> – शरद गोसावी, संचालक, शालेय शिक्षण

रायगडातील किनारे गजबजले

सुट्टीचा आनंद घेण्यासाठी पर्यटक दाखल

। अलिबाग । प्रतिनिधी ।

उन्हाळी सुट्ट्यांचा आनंद लुटण्यासाठी पुणे-मुंबईसह राज्यभरातील पर्यटक रायगड जिल्ह्यातील पर्यटनस्थळांवर दाखल झाले आहेत. त्यामुळे अलिबागसह जिल्ह्यातील विविध समुद्रकिनारे व पर्यटन स्थळांवर पर्यटकांची गर्दी वाढली आहे. उन्हाच्या चटक्यापासून बचाव करण्यासाठी पाण्यात पोहोचण्याचा आनंद पर्यटक अधिक घेत असल्याचे चित्र दिसून येत आहे. •➤ पान ५ वर

माथेरान बहरले

उन्हाचा जोर वाढला असल्याने जिल्हह्यातील प्रसिद्ध असलेले थंड हवेचे ठिकाण माथेरान पर्यटकांनी बहरले आहे. सर्वसामान्य दिवसांपेक्षा विकेंडला येथे अधिक गर्दी असते.

स्थानिकांना रोजगार

पर्यटक जिल्ह्यात दाखल झाल्याने स्थानिक व्यवसायिकांना रोजगाराचे साधन खुले झाले आहे. हॉटेल, कॉटेजस व्यावसायिकांना यातून उभारी मिळत आहे. सध्या उष्णता जाणवत आहे. यातून सुटका घेण्यासाठी काही पर्यटकांनी नारळ पाणी पिण्यावर अधिक भर दिला.

जंजिरा, कुलाबा किल्ल्याला भेट

मुरुड आणि अलिबाग समुद्रकिनाऱ्याची मजा लुटतानाच पर्यटक येथे असलेल्या मुरुड जंजिरा आणि कुलाबा किल्ल्याला आवर्जून भेट देत आहेत. तिथला इतिहास जाणून घेत आहेत. ओहोटीच्या वेळी कुलाबा किल्ल्यावर चालत किंवा घोडागाडीने जाता येते. तर, जंजिरा किल्ल्यावर जाण्यासाठी फेरीबोटींच्या फेऱ्या सुरु असतात. किल्ल्याची माहिती देण्यासाठी याठिकाणी गाईडसुद्धा उपलब्ध आहेत.

● (छायाचित्र : समीर मालोदे)

कोकण पदवीधर निवडणूक

ॲड. प्रवीण ठाकूर इच्छुक

। उरण । वार्ताहर ।

विधान परिषदेच्या मुंबई पदवीधर आणि शिक्षक, कोकण पदवीधर तसेच नाशिक शिक्षक या चार मतदारसंघांत १० जूनला निवडणूक होणार आहे. या निवडणुकीसाठी काँग्रेस प्रदेश सचिव ॲड. प्रवीण ठाकूर इच्छुक आहेत. त्या संदर्भातचे निवेदन ॲड. ठाकूर यांनी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांना दिले आहे.

दरम्यान, ॲड. प्रवीण ठाकूर यांनी कोकण पदवीधर मतदारसंघाची ही निवडणूक आपण लढविण्यास इच्छुक आहोत, असे म्हटले आहे. महाविकास आघाडीच्या •➤ पान ५ वर

वे|ध|क

दिंडोरीचा राजकीय आखाडा तापणार

नाशिक : जिल्ह्यात उन्हाचा पारा वाढत असताना आता चौथ्या टप्यातील दिंडोरी लोकसभा मतदारसंघात पुढील आठवड्यात राजकीय आखाडा तापणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांसह राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार आदींच्या सभा होत आहे. तर, महायुती व महाविकास आघाडीतील अनेक बडे नेते मतदारसंघात तळ ठोकून असणार आहेत. त्यामुळे आरोप-प्रत्यारोपांची राळ उठणार आहे.राज्यात चौथ्या टप्प्यात १३ मे रोजी मतदान होत असून त्यासाठी शनिवारी (दि.११) प्रचारतोफा थंडावल्या आहेत. ही मतदान प्रक्रीया झाल्यानंतर, पाचव्या टप्यातील मतदारसंघाकडे राजकीय पक्षांचे लक्ष केंद्रीत होणार आहे. दिंडोरी लोकसभा मतदारसंघ पाचव्या टप्यात येत असून, पुढील आठवड्यात मंगळवारपासून (दि.१४) राजकीय नेत्यांच्या सभांचा धडाका सुरू होणार आहे. महायुतीच्या उमेदवारांसाठी १५ मे रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी निफाड तालुक्यातील पिंपळगाव येथे दुपारी २.३० वाजता सभा घेणार आहेत. त्याचदिवशी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांची दिंडोरी तालुक्यातील वणी येथे सभा होईल. शरद पवार दोन दिवस नाशिकला तळ ठोकून असणार आहेत. १६ मे रोजी पवार यांच्या उपस्थितीत नांदगाव तालुक्यातील मनमाड येथे सभा होणार आहे.

उद्धव ठाकरेंचा भाजपवर जोरदार हल्ला

। मुंबई । प्रतिनिधी ।

देशासह राज्यात सुरू असलेल्या लोकसभा निवडणुकीच्या दरम्यान माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिलेल्या स्फोटक मुलाखतीची सध्या सर्वत्र चर्चा आहे. यामध्ये ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींसह भाजपवर जोरदार हल्ला चढवला आहे. उद्धव ठाकरे यांनी मुलाखतीत महाराष्ट्रातील उद्योग-धंदे, बेकारी, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेमधील फुट यावर जोरदार भाष्य केले आहे. तसेच, शरद पवार आणि मी म्हणजे संताजी धनाजी यांच्यासारखे असल्याचे म्हणत ठाकरे यांनी मोदींची औरंगजेबाशी तुलना केली आहे.

यावेळी उद्धव ठाकरे म्हणाले, असं म्हणतात की, मोगलांच्या घोड्यांना पाण्यातही संताजी-धनाजी दिसायचे, तसे आम्ही दोघे त्यांच्या खेचरांना दिसत असू. तसेच, ठाकरेंनी नवाझ शरीफ, पाकिस्तान आणि केकचा मुद्दा काढत मोदींची औरंजेबाशी तुलना केली. ठाकरे म्हणाले, न बोलावताही पाकिस्तानात

मोदींची तुलना केली औरंगजेबाशी

जाऊन नवाझ शरीफांच्या वाढदिवसाचा केक खाणारे लोक मला औरंगजेब फॅन म्हणू शकत नाहीत. कारण औरंगजेबदेखील गुजरातमध्ये जन्मला होता. जसे हे दिल्लीला गेलेत तसेच औरंगजेब आग्र्याला जाऊन बसला होता. महाराष्ट्र जिंगण्यासाठी औरंगजेब २७ वर्षे इथे बसला होता. पण तो पुन्हा कधीच आग्र्याला जाऊ शकला नव्हता हे त्यांनी लक्षात ठेवावे.

ते गल्ली-बोळातही रोड शो करतील

उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपला चांगलेच झोडपले आहे. लोकसभा निवडणुकीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रात प्रचारसभांचा सपाटा लावला आहे. यावर बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, मोदी आज राज्यभर फिरत आहेत. मला वाटतं ते आता गल्ली-बोळातही एखादा रोड शो करतील. त्यांनी तो करावा. महाराष्ट्र कसा आहे पाहावा. महाराष्ट्राचा संताप आणि आक्रोश त्यांनी अनुभवावा. महाराष्ट्राचे प्रेम आणि आशीर्वाद मोदींना दहा वर्षे मिळाला. आता मोदीजींनी महाराष्ट्राचा शाप काय असतो हे अनुभवावे.

दरम्यान, महाराष्ट्रात गेल्या दोन वर्षांत पहिल्यांदा शिवसेना आणि नंतर राष्ट्रवादी पक्षात बंडखोरी झाली. अनेक मोठे-मोठे नेते उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना सोडून गेले

देशासह महाराष्ट्रातील सर्वकाही गुजरातला

ठाकरे म्हणाले, ज्यावेळी मुख्यमंत्री होतो तोपर्यंत कोणताही उद्योगधंदा गुजरातला नेण्याची त्यांची बिशाद नव्हती. पण नंतर गद्दारीमुळे त्यांचे सरकार डबल इंजिन झाले. आणि त्यानंतर डबल इंजिनामुळे त्यांनी वेगाने उद्योग-धंदे पळवले. याच मुद्द्यावर पुढे बोलताना ते म्हणाले, हे जे उद्योग-धंद्यांबाबत घडले आहे, तसेच बाढलेल्या बेरोजगारी आणि बेकारीमुळे जनतेमध्ये राग आहे.

आहेत. त्यानंतर या दोन्ही नेत्यांनी आक्रमक पावित्रा घेत महाराष्ट्रभर दौरे करत प्रचाराची राळ उठवली आहे. दुसरीकडे एकनाथ शिंदे आणि अजित पवार भाजपबरोबर गेल्याने सध्या उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्यावर सत्ताधारी टीका करत आहेत. हे दोन्ही नेते अनेकवेळा महाराष्ट्रातील प्रचारसभेत पंतप्रधान मोदींचे टार्गेट ठरले आहेत.

जरांगेंच्या विचाराला सहकार्य करावे

शरद पवार यांचे प्रतिपादन

। बीड । प्रतिनिधी ।

शिवाजी महाराजांचा सर्वधर्म समभावाचा विचार घेऊन मनोज जरांगे असो, की आणखी कोणी पुढे येत असतील, तर त्या ऐक्याच्या विचाराला आपण सर्वांनी सहकार्य केलं पाहिजे. मागे जरांगे यांना विनंती केली की, महाराष्ट्रात कोणत्याही जातीचा किंवा धर्माचा असो, त्या सर्वांना सोबत घेऊन सामाजिक ऐक्य आपण मजबूत ठेवू, असे प्रतिपादन राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले. मोदींच्या पक्षात देशाच्या ऐक्याचा विचार नसल्याने भाजपच्या आसपासही जाणार नाही, असेही शरद पवार म्हणाले.

लोकसभेच्या बीड मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या प्रचाराची सांगता शनिवारी शरद पवार यांच्या सभेने झाली. यावेळी माजी मंत्री अनिल देशमुख, राजेश टोपे, खासदार फौजिया खान, उमेदवार सोनवणे, आमदार संदीप क्षीरसागर, उषा दराडे, साहेबराव दरेकर व गणेश वरेकर आदींची उपस्थिती होती.

मी यापुढे निवडणूक लढणार नाही

। मुंबई । प्रतिनिधी ।

मी यापुढे निवडणूक लढवणार नाही, मला निवडणूक लढविण्याची इच्छा नाही, अशी घोषणा एकनाथ खडसे यांनी एका मुलाखतीत केली आहे. मी राजकीय निवृत्ती घेतलेली नाही. राजकारणात पुढे काहीही होऊ शकते, मात्र, आता माझा निवडणूक लढवण्याकडे कल नाही, असेही त्यांनी म्हटले आहे.

मी अजून ही पाच वर्ष विधान परिषदेचा आमदार आहे. शरद पवारांनी सांगितले आहे की, आम्ही दिलेली वस्तू परत घेत नाही. मला शरद पवार यांनी अभय दिल्यानंतर इतर लोकं माझा विधान परिषदेचा राजीनामा मागत असतील तर मला त्याच्याशी देणंघेणं नाही. मी राजकीय माणूस आहे. मी राजकीय निवृत्ती घेतलेली नाही. राजकारणात पुढे काहीही होऊ शकते, मात्र, आता माझे निवडणूक लढवण्याकडे कल नाही. शरद पवारांना पक्ष सोडताना काय सांगितले, हे आता सांगणार नाही, काही गोष्टी माझ्यासाठी राखीव राहू द्या, असे एकनाथ खडसे यांनी म्हटले आहे.

राज्य सरकारवर लोकांची नाराजी

एकनाथ खडसे म्हणाले की, रावेरची निवडणूक जाहीर झाल्यापासून मी भाजपमध्ये प्रवेश करण्याचे सूचित केले होते. भाजपमध्ये प्रवेश करणार असल्यामुळे भाजपचा प्रचार करावा, तसेच रक्षा खडसे माझ्या सून आहे. या दोन्ही भूमिकेतून मी भाजपचा प्रचार करत आहे. निवडणूक भाजप लढवत आहे. मी जोडीला मदत करत आहे. खानदेशात पूर्वी सारखे वातावरण राहिलेले नाही. मात्र एवढे वाईट वातावरण ही नाही. केंद्राच्या तुलनेत राज्य सरकारच्या कामगिरीविषयी लोकांची नाराजी आहे. शेतकऱ्यांची नाराजी आहे.

पुणेकर जनताच विजयी करेलः धंगेकर

। पुणे । प्रतिनिधी ।

पुणे लोकसभा मतदारसंघातील सहाही विधानसभा मतदारसंघात रॅलीच्या माध्यमातून महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी शक्तिप्रदर्शन करीत शनिवारी प्रचाराची सांगता केली. 'जनशक्ती विरुद्ध धनशक्ती', 'लोकशाही विरुद्ध हुकूमशाही' आणि संविधान वाचविण्यासाठीची लढाई आहे. पुणेकर जनता या लढाईत मला साथ देऊन विजयी करेल, असा विश्वास धंगेकर यांनी व्यक्त केला.

पुणे लोकसभा मतदार संघासाठी सोमवारी (दि.१३) मतदान होत आहे. यामुळे प्रचाराची

सांगता शनिवारी सायंकाळी सहा वाजता झाली. गेल्या ३० दिवसांमध्ये संपूर्ण मतदारसंघात ३७ पदयात्रा, रॅली आणि कोपरा सभेच्या माध्यमातून धंगेकर यांनी अधिकाधिक मतदारांशी संवाद साधला. प्रचाराच्या शेवटच्या दिवशी सहाही विधानसभा मतदारसंघांत महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षांच्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये पक्षाकडून मतदारसंघनिहाय नेमण्यात आलेल्या निरीक्षकांसह माजी खासदार सुप्रिया सुळे, माजी मंत्री डॉ. विश्वजित कदम, सुनील केदार, यशोमती ठाकूर, विकास ठाकरे यांच्यासह शहर पातळीवर महाविकास आघाडीचे नेते आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या रॅलीच्या माध्यमातून धंगेकर यांनी मतदारांशी संपर्क साधला.

दरम्यान, धंगेकर यांनी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत अरविंद शिंदे, शिवसेनेचे (उबाठा) शहर प्रमुख संजय मोरे, गजानन थरकुडे, प्रचारप्रमुख मोहन जोशी, प्रवक्ते गोपाळ तिवारी, कमल व्यवहारे, आप, रिपब्लिकन पक्ष यांच्यासह महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे नेते मंडळी उपस्थित होते.

अमोल कोल्हेंचा विजय निश्चित

। पुणे । प्रतिनिधी ।

महायुतीच्या सरकारविषयी जनतेत प्रचंड रोष आहे. राज्यात महाविकास आघाडीचे ४८ पैकी ३२ ते ३५ खासदार निवडून येतील, अशी स्थिती आहे. निष्ठा, प्रामाणिकपणा, तत्त्व याला तिलांजली देणाऱ्यांना या निवडणुकीत जागा दाखवून द्या. महाराष्ट्राचा द्वेष करणारे सरकार दिल्लीतून हद्दपार करा, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केले. शिरूर लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या प्रचाराची सांगता सभा शनिवारी (दि.११) सायंकाळी नारायणगाव येथे झाली. त्यावेळी जयंत पाटील पाटील बोलत होते.

यावेळी डॉ. अमोल कोल्हे, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, खासदार चंद्रकांत हांडोरे, आमदार शशिकांत शिंदे व भास्कर जाधव, ग्रामोन्नती मंडळाचे कार्याध्यक्ष अनिल मेहेर, विघ्नहर साखर कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर, अनंतराव चौगुले, योगेश पाटे, माउली खंडागळे, बाजीराव ढोले, सुरेश भोर, मोहित ढमाले, विजय कुऱ्हाडे, सुजित वाजगे, डॉ. शुभदा वाव्हळ, माजी नगराध्यक्ष सुनील मेहेर आदी उपस्थित होते.

जयंत पाटील म्हणाले, डॉ. कोल्हे यांच्याकडे तत्त्व व निष्ठा आहे. राज्यातील जनता निष्ठा व तत्त्वाशी एकनिष्ठ राहते, असा इतिहास आहे. खोके घेतलेल्या बोक्यांच्या मागे राहत नाहीत. डॉ. कोल्हे यांचा पराभव करण्यासाठी दोन उपमुख्यमंत्र्यांना बारा सभा घ्याव्या लागतात. यातच डॉ. कोल्हे यांचा विजय निश्चित आहे.

पुढे बाळासाहेब थोरात म्हणाले, बहुतेक माणसे राजकारणात व्यवहार पाहतात, मात्र डॉ. कोल्हे यांनी राजकारणातला व्यवहार न पाहता विचार, निष्ठा व तत्त्वाशी प्रामाणिक राहिले. जे गेले ते स्वतः चा उद्धार करण्यासाठी गेले. देशातील राजकारण बिघडले आहे. देशातील लोकशाही, घटना वाचवण्यासाठी भाजप सरकार व राज्यातील खोके सरकार हद्दपार करा.

जरांगेंनी उडवली पाटलांची खिल्ली

मुंबई : जरांगे यांचा बालेकिल्ला समजला जाणाऱ्या जालना व बीड लोकसभा मतदारसंघातील मतदानापूर्वीच जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा मराठा समाज बांधवांना हाक दिली आहे. यावेळी मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर बोलताना चंद्रकांत पाटील आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. चंद्रकांत पाटील यांना मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष का केलं? त्यांना काय कळतं. फक्त तेरे नाम भांग पाडून फिरत असतात, स्वतःची ३७ मतं तरी त्यांना पडतात का?, अशा शब्दात मनोज जरांगे यांनी चंद्रकां पाटील यांची खिल्ली उडवली.

ठाण्यातील लढाई निष्ठावंतविरुद्ध गद्दार

। मुंबई । प्रतिनिधी ।

अजित पवार आता सगळ्यांना डोस देत सुटलेत, तुला पाडीन, तुला पाडीन करतायेत, मग तुझ्या पोराला निवडून का आणला नाही? लोकशाहीत एवढा माज कसला दाखवता? ज्या बापाने मला घडवलं, त्या बापाचा हात सोडताना हृदयात जराही कालवाकालव झाली नाही? असा हल्लाबोल जितेंद्र आव्हाड यांनी अजित पवारांवर केला आहे.

जितेंद्र आव्हाड म्हणाले की, १९९१ साली अजित पवारांना महाराष्ट्रात कोण ओळखतं होतं? त्या अजित पवारांना लोकसभेची उमेदवारी दिली आणि संसदेत पाठवले. त्यानंतर सातत्याने सत्तेच्या वर्तुळात ठेवले, ४ वेळा उपमुख्यमंत्री बनवलं. संघटनेचे पद का घेतले नाही, कधीतरी मला पक्षाचे अध्यक्ष

करा, मला पक्ष वाढवायचाय असं का म्हटलं नाही. तुम्हाला केवळ सत्ता हवी होती. त्या सत्तेसाठी तुम्ही शरद पवारांना घराच्या बाहेर काढण्याचा प्रयत्न केला आणि स्वतः पक्ष ताब्यात घेतला, असा आरोप त्यांनी केला. त्याशिवाय दुसरीकडे ज्या मातोश्रीने आईसारखं प्रेम दिलं, ज्या मातोश्रीने भरभरून दिले, त्यांनी मातोश्री फोडण्याचे काम केले. या दोन्ही गद्दारी महाराष्ट्राला कधी आवडणार नाही.

राज्यात २ गद्दारी ओळखली जाते, शिवाजी महाराजांच्या काळातला खंडोजी खोपडे आणि सूर्याजी पिसाळ, यांच्या औलादींना महाराष्ट्राने कधी ओळख दिली नाही, मोठेपणा दिला नाही. तसेच, या नवीन सूर्याजी पिसाळ, खंडोजी खोपडेंना या निवडणुकीत कायमचे संपवून टाका, येणाऱ्या कुठल्याच निवडणुकीत जागा देऊ नका, असे सांगत आव्हाडांनी अजित पवारांसह एकनाथ शिंदेंवर निशाणा साधला. दरम्यान, महाविकास आघाडीचे उमेदवार राजन विचारे यांच्या समर्थनार्थ घेतलेल्या सभेत जितेंद्र आव्हाड बोलत होते. निष्ठावंत विरुद्ध गद्दार अशी ठाण्यात लढाई आहे. माझ्या निष्ठेबाबत टीव्हीवर बघत असाल. तसेच, ठाण्यातील लढाई निष्ठावंतविरुद्ध गद्दार असल्याचेही आव्हाडांनी सांगितले.

निवडणूक खर्चात उदयनराजे अव्वल

सातारा : सातारा लोकसभा मतदारसंघाचे मतदान तिसऱ्या टप्प्यात झाले आहे. पण या निवडणुकीत आतापर्यंत भाजपचे उमेदवार उदयनराजे भोसले यांनी सर्वाधिक ४९ लाख ५७ हजार १८७ रुपये, तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार शशिकांत शिंदे यांनी ४६ लाख ७ हजार ६७९ रुपये खर्च झाल्याचे निवडणूक आयोगाकडे दिलेल्या खर्चाच्या अहवालात नमूद केले आहे. निवडणूक आयोगाने प्रत्येक उमेदवाराला ९५ लाख रुपयांपर्यंत खर्च करण्याची मर्यादा दिली आहे. मतदानाच्या दिवसापर्यंत उमेदवारांनी दिलेला खर्च पहिला, तर सर्वाधिक खर्च खा. उदयनराजे भोसले यांनी केला आहे.

मोदींना सभेची जागा बदलण्याची नामुष्की

। नाशिक । प्रतिनिधी ।

नाशिक, दिंडोरी लोकसभा मतदार संघासाठी २० मे रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी येत्या १५ तारखेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा पिंपळगाव बसवंत येथे होणार आहे. परंतु, कांदा प्रश्नावरून महायुतीच्या उमेदवारांना शेतकरी मतदारांच्या रोषाला सामोरे जावे लागत असल्याने त्याचा परिणाम मोदी यांच्या सभेवरही होण्याची शक्यता असल्याचा गोपनीय अहवाल पोलिसांनी दिल्याचे समजते. त्यामुळे पंतप्रधान मोदी यांची सभा पिंपळगाव बसवंतऐवजी

■ कांदा प्रश्नावरून शेतकरी मतदार आक्रमक

नाशिकमध्ये होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यादृष्टीने चाचपणीही सुरू आहे.

या पार्श्वभूमीवर राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी नाशिक ग्रामीण पोलिस अधीक्षक कार्यालयात आढावा बैठक घेतली. लोकसभा निवडणुकीच्या बंदोबस्तासह पंतप्रधान नरेंद्र मोदी व अन्य राजकीय नेत्यांच्या सभा व दौऱ्यांच्या बंदोबस्ताचाही आढावा यावेळी घेण्यात आला. या बैठकीला विशेष पोलीस महानिरीक्षकांसह पोलीस आयुक्त व पोलीस अधीक्षकांसह वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते. नाशिक जिल्हा कांदा उत्पादक जिल्हा असून, कांद्यावरील निर्यातबंदीमुळे जिलह्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये असंतोष आहे. त्यामुळे ग्रामीण भागात महायुतीच्या उमेदवारांना कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे. विशेष शाखा व गोपनीय विभागानेही यासंदर्भातील माहिती पोलीस महासंचालकांना दिली आहे. परिणामी, पिंपळगाव बसवंत येथे मोदींच्या सभेची तयारी सुरु असली तरी, सुरक्षिततेच्या कारणास्तव पोलिसांनी नाशिक शहरात सभा घेण्यासंदर्भात माहिती दिली आहे. त्यानुसार चाचपणी केली जात असल्याचे समजते.

मोबाईल संचाच्या वापरावर बंदी

पुणे : पुणे लोकसभा मतदारसंघातील मतदान सोमवारी पार पडत असून, मतदान केंद्रांच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. प्रतिबंधात्मक आदेशाचा भंग केल्यास कारवाई करण्याचा इशारा सहपोलिस आयुक्त प्रवीण पवार यांनी दिला आहे. मतदान केंद्रांच्या शंभर मीटर परिसरात मोबाईल संचाचा वापर न करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, छायाचित्रण करण्यास मनाई करण्यात आली आहे.

भाजपकडून सीबीआय, ईडीचा दुरूपयोग

। पुणे । प्रतिनिधी ।

मोदी सरकारने सीबीआय, ईडी आणि निवडणूक आयोग यासारख्या यंत्रणा स्वतःच्या नियंत्रणाखाली ठेवल्या आहेत. निवडणूक रोख्यांची (इलेक्ट्रोल बॉंड) यादी पाहिल्यास ईडीच्या छाप्यानंतर अनेकांनी भाजपला निधी दिल्याचे चित्र स्पष्ट होते. सीबीआय, ईडीचा दुरुपयोग राजकीय द्वेषापोटी केला जात आहे. भाजपकडून संविधानाच्या मूळ ढाच्यावरच आघात केला जात आहे, असा आरोप काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते आणि ज्येष्ठ विधीज्ञ अभिषेक मनु सिंघवी यांनी केला.

पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या

वार्तालाप कार्यक्रमात सिंघवी बोलत होते. ते म्हणाले, वादविवाद घडविणारा, त्रासदायक ठरणारा संविधानाचा ढाचा सरकारने तयार केला आहे.

सध्या सरकारकडून आणखी एक नवीन व्यवस्था अवलंबली जात आहे. निवडणुकीचे 'सिलेक्शन'मध्ये रूपांतर होत आहे. सुरतमध्ये अन्य उमेदवारांनी माघार कशी काय घेतली. हे असेच सुरू राहिल्यास निवडणुकीची गरज पडणार नाही आणि तो लोकशाहीचा अंत असेल. प्रत्येक गोष्ट नियंत्रणात ठेवण्याचा केला जाणारा सरकारचा प्रयत्न भयावह आहे.

लोकसभा निवडणूक नरेंद्र मोदी विरुद्ध राहुल गांधी असल्याचे खुद्द मोदीच सातत्याने बोलत असल्याचेही सिंघवी यांनी स्पष्ट केले. ते म्हणाले, सध्याच्या भाजपने जुन्या भाजपची ओळख मिटवून टाकली आहे. सध्या देशात नियंत्रित लोकशाही आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. पंतप्रधानांना ते शोभत नाही.

आता बंडखोर अमोल कोल्हे बघाल

उपमुख्यमंत्री अजित पवारांना थेट आवाहन

। पुणे । प्रतिनिधी ।

शिवसिंहाची औलाद आहे, थांबणार नाही, अजून विधानसभा बाकी आहे, करारा जवाब मिलेगा. आतापर्यंत आज्ञाधारक अमोल कोल्हे बघितला, आता कफन बांधलेला बंडखोर अमोल कोल्हे बघाल, या शब्दांत महाविकास आघाडीचे उमेदवार खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना थेट आव्हान दिले.

डॉ. अमोल कोल्हे यांच्या प्रचाराची सांगता सभा नारायणगावात भरपावसात झाली. त्यावेळी ते बोलत होते. ते म्हणाले, जेव्हा एक भूमिका घ्यायची वेळ आली होती, तेव्हा स्वार्थासाठी सरटणाऱ्यांच्या रांगेत जायचं नाही हे ठरवलं होतं. उपमुख्यमंत्र्यांना १२ सभा घ्याव्या लागत असतील, तर हा माझा गौरव आहे. पुढे अमोल कोल्हे म्हणाले, कडेवर घेतलेल्या उमेदवाराच्या प्रचारात पालकमंत्री व्यग्र आहेत. प्रचारातून बाहेर या आणि बिबट्याच्या प्रश्नांवर लक्ष द्या. बिबट्याचा प्रश्न हा माझ्या माणसांसाठी गंभीर प्रश्न आहे.कितीही नोटिसा पाठवल्या तरी प्रश्न विचारत राहणार. सभेत दाखवलेली नोटीस आढळराव हे संसदेत आपल्या कंपनीच्या फायद्यासाठी संरक्षण खात्याविषयी कसे प्रश्न विचारत होते, हे डॉ. कोल्हे यांनी पुराव्यांसह दाखवले. त्यानंतर त्यांच्याकडून डॉ. कोल्हे यांना कायदेशीर नोटीस पाठवण्यात आली. ही नोटीस जाहीर सभेत दाखवत, कितीही नोटीस आल्या तरी त्याचा विचार करत नाही, कारण प्रश्न सर्वसामान्य जनतेचा आहे. जनहिताचे, लोकशाहीचे प्रश्न विचारत राहणार, असे सांगितले.

ही शिंदेंची शेवटची फडफड : संजय राऊत

। नाशिक । प्रतिनिधी ।

लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. चौथ्या टप्प्यातील मतदान सोमवारी पार पडेल आणि पाचव्या टप्प्याला सुरुवात होणार आहे. मात्र, आता पाचव्या टप्प्यातील मतदारसंघांवर सर्वच राजकीय पक्षांनी लक्ष केंद्रित केले आहे. नाशिक लोकसभा मतदारसंघाची निवडणूक देखील पाचव्या टप्प्यात आहे. येत्या २० मे रोजी नाशिक लोकसभा मतदारसंघाचे मतदान पार पडेल. नाशिक लोकसभा मतदारसंघात महायुतीकडून हेमंत गोडसे आणि महाविकास आघाडीकडून राजभाऊ वाजे लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात आहे. महाविकास आघाडीचे वाजे यांच्या प्रचारासाठी संजय

राऊत हे नाशिकमध्ये आहेत. मात्र, नाशिकची निवडणूक ही शिंदे आणि ठाकरेंच्या सेनेमध्ये असल्यामुळे दोन्ही सेनेच्या नेत्यांकडून आरोप प्रत्यारोपांची मालिका सुरू आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे नाशिक दौऱ्यावर येत असल्यामुळे संजय राऊत यांनी त्यांच्या दौऱ्यानिमित्ताने ही शिंदेंची शेवटची फडफड असल्याचं म्हटलं आहे.

संजय राऊत म्हणाले, मुख्यमंत्री आज नाशिकमध्ये पुरवठा करण्यासाठी येत असतील. त्यांनी धनुष्यबाण चोरला आहे. शिंदे-फडणवीस आणि अजितदादांनी टेम्पो भरून पैसे आणून द्या, तरी काही फरक पडत नाही. लोक त्यांना मतदान करणार नाही. पंतप्रधान मोदी देखील ठाण मांडून आहेत. त्याचाही काही परिणाम होणार नाही.

महाराष्ट्रात महाविकास आघाडी ३५ जागांवर विजय मिळवणार, असा दावा देखील संजय राऊत यांनी केला आहे. राज्यातील तीनही नेते तन, मन, धनाने काम करत आहे. अजितदादांच्या उमेदवारांच्या निवडणुका संपल्या आहेत. पण, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची धावपळ सुरू आहे. पण, ही शेवटची फडफड आहे. डॅमेज कंट्रोलसाठी देखील काही राहिले नाही, असे राऊत म्हणाले.

नाशिकमध्ये ८०० कोटींचा भूखंड घोटाळा झाला आहे. त्या संदर्भात १४ तारखेला पुराव्यानिशी पत्रकार परिषदेत बोलेन, असे देखील संजय राऊत यांनी सांगितले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांचे काही पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांचा यात संबंध आहे, असे देखील संजय राऊत यांनी म्हटले. जनतेच्या पैशांची लूट सुरू आहे. शेतकरी नसलेल्या बिल्डरांना त्याचे पैसे मिळाले. या घोटाळ्यात शेतकरी कसे बिल्डर झाले, असा देखील सवाल राऊत यांनी उपस्थित केला आहे.

मावळ लोकसभा निवडणुकीसाठीचे साहित्य मतदान केंद्रांवर

। कर्जत । प्रतिनिधी ।

मावळ लोकसभा मतदारसंघातील कर्जत विधानसभा मतदारसंघात सोमवारी (दि.१३) होणाऱ्या मतदानाची तयारी पूर्ण झाली असून मतदान केंद्रावर मतयंत्र व मतदानासाठी लागणारे साहित्य पोहचले असल्याची माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अजित नैराळे यांनी दिली.

मावळ लोकसभा मतदारसंघातील कर्जत विधानसभा मतदारसंघात एकूण ३ लाख ५ हजार मतदार आहेत. त्यात एक लाख ५३ हजार मतदार हे पुरुष तर एक लाख ५१ हजार महिला मतदार आहेत. मतदारसंघात संपूर्ण कर्जत तालुका आणि खालापूर तालुक्यातील दोन जिल्हा परिषद गट तसेच खोपोली नगरपरिषद आणि खालापूर नगरपंचायत यांचा समावेश आहे. या निवडणुकीसाठी ३३९ मतदार केंद्र असून मूळ मतदार केंद्रांची संख्या ३३५ आहे. मात्र, १२०० पेक्षा जास्त मतदार असलेल्या मतदार केंद्रांवर सर्व मतदारांना वेळेत मतदान करता यावे. यासाठी चार मतदान केंद्र वाढविण्यात आली आहेत. त्यात कर्जत तालुक्यात दोन ठिकाणी दुर्गम मतदान केंद्र असून तुंगी आणि ढाक या ठिकाणी ही केंद्र असणार आहेत. कळकराई आणि पेठ येथील मतदान केंद्र येथील मतदारांच्या परवानगीने दुर्गम भागातून खाली पायथ्याशी आणली आहेत.

मतदारसंघात यावेळी तब्बल ३३ उमेदवार निवडणूक लढवीत असल्याने प्रत्येक मतदान केंद्रावर यावेळी तीन मतदान यंत्र असणार आहेत. तीन इव्हीएम मशीन निवडणुकीसाठी वापरण्यात येणार असल्याने मतदान केंद्रावर देखील तीन मशीन ठेवण्याची यंत्रणा आणि व्हिव्हीपट मशीन ठेवण्यासाठी अतिरिक्त जागा करण्यात आली आहे. उन्हाचा तडाखा वाढला असल्याने मतदान केंद्रावर मशीनमध्ये बिघाड झाल्यास तत्काळ दुसरे इव्हीएम मशीन उपलब्ध करून देता यावे. यासाठी मॅक्रो निरिक्षक तैनात असतील. मतदान सुरू असताना मतदान केंद्रावर कर्मचारी वर्गावर काहिसा ताण या निवडणुकीत प्रत्यक्ष मतदान केंद्र येथे असणार आहे. प्रत्येक मतदान केंद्रावर सहा याप्रमाणे साधारण दोन हजार कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. तसेच, प्रत्येक मतदान केंद्रावर आरोग्य प्रश्न निर्माण झाल्यास मतदार यांना तत्काळ सुविधा देण्याची व्यवस्था आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर आशा सेविका यांची नियुक्ती मतदान केंद्रांवर करण्यात आली आहे. तर, गावाचे पोलीस पाटील उपस्थित असणार असून ते मतदान केंद्रावरील कर्मचाऱ्यांना मदत करतील. मतदान दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी कर्जत विधानसभा मतदारसंघात अतिरिक्त पोलिस फाटा तैनात करण्यात आला आहे. होमगार्ड आणि राज्य राखीव पोलीस दलाचे कर्मचारी यांच्याकडून पोलीस तैनात ठेवण्यात येणार आहेत. मतदान साहित्य व अधिकारी कर्मचारी मतदान केंद्रावर नेण्यासाठी ५० एसटी बस, १९ मिनीबस व ३२ जीपचा वापर करण्यात आल्याचे अजित नैराळे यांनी सांगितले.

प्रशासकीय भवन परिसरात असलेल्या पोलीस मैदानात प्रशस्त मंडप उभारण्यात आला असून तेथून सर्व मतदान केंद्राचे साहित्य यांचे वाटप करण्यात आले. या सर्व यंत्रणांवर सहायक निवडणूक निर्णय अधिकारी अजित नैराळे यांचे जातीने लक्ष असून कर्जतचे तहसीलदार डॉ. शीतल रसाळ, खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी सहकार्य करीत आहेत.

स्लीप न मिळाल्याने टक्केवारीवर परिणाम

मावळ लोकसभा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी पत्रकार परिषद घेऊन मतदानाच्या स्लिप वाटण्यात आल्याचे सांगितले असले तरी प्रत्यक्षात कर्जत तालुक्यात काही भागांत, तर प्रशासकीय भवनाला लागून असलेल्या विठ्ठलनगर परिसरात अद्याप स्लिप पोहोचल्या नसल्याने मतदानाच्या टक्केवारीवर नक्की परिणाम होऊ शकतो. कारण मतदारांना स्लीप न मिळाल्याने ते मतदानासाठी किती उत्साही असतील हा हो संशोधनाचा विषय असेल, असे मत अरुण निघोजकर या मतदाराने बोलून दाखविले आहे.

अनावश्यक मतदारांची नावे वगळणे गरजेचे

। माथेरान । वार्ताहर ।

माथेरानमधील सध्याच्या परिस्थितीत सर्व प्रभाग मिळून जेमतेम ३९०० इतकी मतदार संख्या आहे. यातील बहुतांश मतदार हे याठिकाणी वास्तव्यास नसून त्यांचा वास्तव्याचा रेशनकार्ड तसेच स्वतःच्या घराचा पुरावा नाही. तर, काही मतदार हे इथे नोकरी-व्यवसायानिमित्ताने आले होते, ते इथे रहात सुध्दा नाहीत. फक्त माथेरान नगरपरिषदेच्या निवडणूक काळात प्रत्येक मताला पाच ते दहा हजार रुपये आणि वेळप्रसंगी त्याहूनही अधिक रक्कम मिळत असल्यामुळे अशी मंडळी केवळ पाच वर्षांतून एकदाच आपले दर्शन देत असतात.

यावेळी माथेरानमध्ये सुध्दा मतदार यादीत नावे असल्याने लोकसभा, विधानसभा आणि पुढील नगरपरिषदेच्या निवडणुकीत केवळ आर्थिक प्रलोभनांसाठी मतदार यादीत आजवर ठाम आहेत. त्यामुळे इथल्या नगरपरिषदेच्या निवडणूक काळात इथल्या उमेदवारांना आर्थिक झळ सोसावी लागत आहे. या अनाठायी मतदारांमुळे एखाद्या धनाढ्य उमेदवाराला याचा लाभ होत असतो. यासाठी इथल्या सर्वपक्षीय नेत्यांनी अशी नावे मतदार यादीम धून वगळल्यास काहीशा प्रमाणात आर्थिक बचत आणि सर्वांना फायदेशीर ठरू शकते.

माथेरान बाहेर वास्तव्यास असणारे हे मतदार लोकसभा, विधानसभा निवडणुकीच्या काळात यांना समाधानकारक मोबदला मिळत नसल्यामुळे हे मतदार इकडे फिरकत सुध्दा नाहीत आणि अशांना येथील राजकीय पक्षांचे लोक गाडीभाडे देऊन आणत देखील नाहीत. एरव्ही पतसंस्था निवडणूक असो अथवा नगरपरिषदेच्या निवडणूक काळात येथील सर्वपक्षीय मंडळी चार ते पाच वेळा बाहेरील मतदारांना गोंजारण्यासाठी पायपीट करताना दिसतात. त्यामुळे या लोकसभेच्या निवडणुकीत ३९०० पैकी जेमतेम २५०० च्या आसपास मतदान होण्याची शक्यता आहे. त्यातच निवडणूकीसाठी आलेल्या निधीचा वापर फक्त मद्यपीसाठी खर्च केला गेला तर अन्य निष्ठावंत कार्यकर्ता नाराजी व्यक्त करणार यात शंका नाही. याचाच फटका लोकसभेच्या उमेदवाराला सहन करावा लागणार आहे, असे स्थानिक बोलत आहेत.

वेधक

निवडणुकीची तयारी पूर्ण

। पनवेल । वार्ताहर ।

सोमवारी दि.१३ रोजी मावळ लोकसभेची सार्वत्रिक निवडणूक पार पडणार असून निवडणूक प्रशासनाची तयारी पुर्णत्वाकडे गेली आहे. या मतदार संघातील पनवेल विधानसभा मतदारसंघामध्ये १ हजार ९५८ बॅलेट युनिट, ७५० कंट्रोल युनिट आणि ७८८ व्हीव्हीपॅट लागणार आहेत. पनवेलमध्ये ५ लाख ९१ हजार ३९८ मतदार आहेत. त्यामध्ये ३ लाख १७ हजार ९६ पुरुष, २ लाख ७४ हजार २३१ महिला तर ७१ तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे. तसेच, पनवेल मतदारसंघात ५४४ मतदान केंद्रे असून याठिकाणी २ हजार ४०४ मतदान कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. यासाठी ४६ वाहतूक झोन तयार करण्यात आले आहेत. कर्मचाऱ्यांना वाहतुकीसाठी ८६ एसटी बसेस, १५ मिनी बसेस, २० जीप, ४ ईव्हीएम कंटेनर अशा १२५ वाहनांची याठिकाणी आवश्यकता असणार आहे. मावळ लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने या कार्यक्षेत्रात येणाऱ्या विधानसभा मतदारसंघ निहाय वाहतुक आराखडा तयार करण्यात आला आहे. मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी, कर्मचारी, पोलीस यांना मतदान केंद्रापर्यंत घेऊन जाण्यासाठी लागणाऱ्या वाहनांचे नियोजन करण्यात आले आहे.

मावळ लोकसभा मतदारसंघासाठी आवश्यक असणाऱ्या एकूण २ हजार ५६६ मतदान केंद्रावर एकूण ११ हजार ३६८ मतदान अधिकारी, कर्मचारी नियुक्त केले गेले आहेत. तसेच, संवेदनशील मतदान केंद्रांवर ८३ सूक्ष्म निरीक्षक देखील नियुक्त करण्यात आले आहेत. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय स्तरावर मतदान यंत्र तयार करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण देखील वेळोवेळी दिले गेले आहे.

मतदान प्रक्रियेसाठी सज्ज

। उरण । प्रतिनिधी ।

चौथ्या टप्प्यातील मतदान प्रक्रियेसाठी उरण विधानसभा मतदार संघातील संपूर्ण तयारी पूर्ण झाली असून या मतदानासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. मावळ लोकसभा मतदार संघातील उरण विधानसभा मतदार संघात संपूर्ण उरण तालुक्यातील ४ जिल्हा परिषद गट व उरण नगरपरिषद तर पनवेल तालुक्यातील गव्हाण व वडघर २ जिल्हा परिषद गट आणि खालापूर तालुक्यातील चौक आणि वासंबे २ जिल्हा परिषद गट आणि एक नगरपरिषद क्षेत्रात एकूण ३४४ मतदान केंद्र निश्चित करण्यात आली आहेत.

या उरण विधानसभा मतदार संघातील प्रत्येक मतदान केंद्रावर ४ मतदान अधिकारी, १ शिपाई अशा कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून, प्रत्येक मतदान केंद्रावर एका पोलिस कर्मचाऱ्यांचीही नेमणूक करण्यात आली आहे. तसेच, मावळ लोकसभा मतदार संघातील उरण विधानसभा मतदार संघातील एकूण३४४ मतदान केंद्रापैकी एकही मतदान केंद्र संवेदनशील नसून कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी नवीमुंबई पोलिस उपायुक्त परिमंडळ-२, पनवेलचे उपायुक्त विवेक पानसरे यांच्या आधिपत्याखाली उरण विधासभा मतदार संघातील संबंधित पोलिस ठाण्यांच्या हद्दीतील पोलिस अधिकारी त्यांच्या पोलिस कर्मचाऱ्यांसह ताफ्याची गस्त सज्ज ठेवण्यात आली आहे.

त्यामुळे मतदान प्रक्रिया सुरळीत होईल. असा आशावाद उरण विधानसभा मतदार संघाचे सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी जनार्दन कासार व अतिरिक्त सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा उरणचे तहसिलदार डॉ.उद्धव कदम यांनी व्यक्त केला आहे.

रोटरी ग्रीन सोसायटी प्रोजेक्टवर मार्गदर्शन

। रसायनी । वार्ताहर ।

पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट व रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.१२) प्रिया स्कूल मोहोपाडा येथे रोटरी ग्रीन सोसायटी प्रोजेक्ट २०२४ चे आयोजन करण्यात आले होते.

ग्रीन सोसायटी प्रकल्पाची पहिली पायरी म्हणून, सोसायट्यांसाठी सकाळी १० ते १ जनजागृती सत्रांचे नियोजन केले होते. यावेळी सादरीकरणे, चर्चा आणि वन टू वन चर्चा करण्यात आली. तसेच, हरित उपक्रमांतर्गत तज्ञ/एनजीओ/पुरवठादार सोसायट्यांना 'काय करावे' आणि 'कसे करावे' याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. ज्या संस्थांनी यापूर्वी हरित समाज किंवा पर्यावरणासाठी उपक्रम सुरू केले आहेत त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच, पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने प्लास्टिक बंदी जनजागृती म्हणून कापडी बॅगेचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी मान्यवर व पत्रकार उपस्थित होते.

सुविधा केंद्रावर ३२ कर्मचाऱ्यांकडून मतदान

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत विधानसभा मतदारसंघात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी सुविधा केंद्रावरील मतदान कक्षात मतदान केले. सोमवारी निवडणुका होत असलेल्या ११ पैकी ९ मतदारसंघातील ३२ मतदारांनी सुविधा केंद्रावर मतदान केले. तर या मतदारसंघात गृह मतदान म्हणून संमती देणाऱ्या ७० पैकी ६२ मतदारांनी गृह मतदानाचा पर्याय निवडला.

कर्मचाऱ्यांचे मूळ गाव हे कर्जत बाहेरील आहे. अशा कर्मचाऱ्यांचे मतदान सुविधा केंद्रावर घेण्यात आले. राज्यात शिर्डी, अहमदनगर, मावळ, शिरूर, पुणे, रावेर, बीड, नंदुरबार, जळगाव, जालना आणि छत्रपती संभाजीनगर अशा ११ मतदारसंघात मतदान घेतले आहे. त्या मतदारसंघात नावे असलेल्या आणि कर्जत तालुक्यात सेवा बजावत असलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांचे मतदान ११ आणि १२ मे रोजी प्रशासकीय भवन येथील सुविधा केंद्र येथे आयोजित केले होते.

गृह मतदानात ६२ मतदारांचा सहभाग

कर्जत विधानसभा मतदारसंघात मावळ लोकसभा निवडणुकीसाठी ८५ वर्षे वयावरील ५९ आणि चालता येत नसलेल्या ११ दिव्यांग मतदारांनी गृह मतदान करण्याची संमती दिली होती. त्यातील दिव्यांग ११ तर ८५ वर्षे वयावरील ५१ अशा एकूण ६२ मतदारांनी गृह मतदानाचा लाभ घेवून राज्य निवडणूक आयोगाच्या उपक्रमात सहभागी होत मतदान केले.

युवती चेतना शिबीर संपन्न

। रसायनी । वार्ताहर ।

वनवासी कल्याण आश्रम, महाराष्ट्र कोकण प्रांत कुलाबा जिल्हा यांच्या माध्यमातून जन शिक्षण संस्थान रायगड या ठिकाणी 'युवती चेतना शिबीर' हा उपक्रम रविवारी (दि.१२) राबविण्यात आला. याच उपक्रमाचा भाग म्हणून जन शिक्षण संस्थान रायगडच्या माध्यमातून उपस्थित २०० वनवासी बंधू-भगिनींना विधी साक्षरता व वारली चित्रकला मार्गदर्शन देखील करण्यात आले.

कार्यक्रमाच्या शुभ प्रसंगी डॉ. मेधा सोमैया, बोर्ड मेंबर ॲड. निला तुळपुळे, जन शिक्षण संस्थान रायगडचे संचालक डॉ. विजय कोकणे, ॲड. पल्लवी तुळपुळे, ॲड. स्वाती कुलकर्णी, सुशील साईकर, प्रणिता मगर व ॲड. मनिषा नागावकर, कोकण प्रांत महिला आयाम प्रमुख ज्योती पाटील, ज्योती जपे, प्राची आंग्रे, गौरी साठे, सानिका बाम, सुनंदा वाघमारे, स्वाती कुलकर्णी, लतिका दातार, अर्चना पाटील,सुनिता जोशी व वनवासी बंधू-भगिनी व प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेतील प्रशिक्षणार्थी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

गोरक्षण संस्थेला रोटरी क्लबची मदत

। पनवेल । वार्ताहर ।

आजच्या मातृदिनाचे औचित्य साधून येथील श्री पांजरपोळ गोरक्षण संस्थेला रोटरी क्लब ऑफ पनवेलने त्यांच्या अभिनव उपक्रमाला हातभार लावण्याच्या सजग हेतूने वीस लाखांची भरघोस मदत केली आहे. क्लबचे अध्यक्ष राजेंद्र मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांच्या सहकाऱ्यांनी श्री पांजरपोळ गोरक्षण संस्थेचे विश्वस्त नितीन मुनोथ यांच्यासह अन्य विश्वस्त मंडळींना धनादेश सुपूर्द केला.

यावेळी समाजसेवक राजू सोनी, सतीश पावशे, श्याम जहागीरदार, संजीवनी मालवणकर, संतोष आंबवणे, यतीश सादराणी, संगीता कामाठी, आदींचे सह रोटरी क्लब ऑफ पनवेलचे सदस्य तथा श्री. पांजरपोळ गोरक्षण संस्थेचे विश्वस्त तथा कार्यकर्ते, व्यापारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आम्ही येथे उभारलेले काम हे एका प्रामाणिक हेतूने उभारलेले आहे. येथून आम्हाला कुठल्याही स्वरूपाचे अर्थार्जन होत नाही. पशु सेवा हीच ईश्वर सेवा आहे असे मानून ज्यांना ज्यांना आम्हाला मदत करायची आहे ते आम्हाला आर्थिक सहाय्य करू शकतात. आपले वाढदिवस लग्नाचे वाढदिवस स्मृती दिवस अन्य दिवस लक्षात ठेवण्यासाठी आपण येथे येऊन आपले कार्यक्रम करू शकता तसेच आम्हाला सहकार्य देखील करू शकता. रोटरी क्लब प्रमाणे अन्य सेवाभावी संस्थांनी देखील पुढे येऊन आम्हाला सहकार्य करावे, अशी मी विनंती करतो.

- नितीन मुनोथ, विश्वस्त, श्री. पांजरपोळ गोरक्षण संस्था, पनवेल

वाघेरेंना मताधिक्य मिळण्याचा विश्वास

। उरण । प्रतिनिधी ।

काँग्रेसचे जेष्ठ नेते बाळासाहेब शिवरकर यांनी रायगड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष महेंद्र घरत यांची शेलघर येथील निवास्थानी भेट घेऊन मावळ लोकसभेचा आढावा घेतला. यावेळी महेंद्र घरत यांनी शिवरकर यांना सांगितले की, उरण विधानसभा मतदार संघातून किमान ४० ते ५० हजार मतांची आघाडी महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरेंना देणार असल्याचा विश्वास दिला. यावेळी बाळासाहेब शिवरकर यांचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी स्वागत केले. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, सिलोत्री, किरिट पाटील, वसंत म्हात्रे व मोठया संख्येने काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.

मुरूड समुद्रातून कोलंबीची मोठी आवक

। मुरूड-जंजिरा । वार्ताहर ।

रविवारी मुरूडच्या मुख्य मासळी मार्केटमध्ये मोठया प्रमाणांत कोलंबी मासळी आल्याने खवय्ये आणि पर्यटकांची चंगळ झाल्याचे दिसून आले; मात्र तापमान मोठ्या प्रमाणावर वाढल्याने पापलेट, कुपा, सुरमई, रावस आदी प्रकारातील मोठी मासळीने खोल समुद्रात पलायन केले. यामुळे मच्चीमारांना मिळू शकली नसल्याने मासळी पर्यटकांना ही मिळाली नाही. त्यामुळे बाहेरगावहून आलेली अत्यंत महागडी, मासळी घेण्याची वेळ सर्वसामान्यांवर येत आहे.

रायगड मच्चीमार संघाचे उपाध्यक्ष मनोहर बैले यांनी रविवारी बोलताना सांगितले की, समुद्राचे तापमान वाढून पाणी जेव्हा गरम होते तेव्हा पापलेट, सुरमई, रावस सारखी मोठी मासळी खोल समुद्रात निघून जाते. परंतु, याच काळात

मात्र उथळ समुद्रात किनारपट्टीवर कोलंबी, जवळा सारखी मासळी येत असते. शनिवार, रविवार याच परिस्थितीचा फायदा घेत काही मच्चीमार कोलंबी मासेमारीसाठी गेले असताना मोठ्या प्रमाणात कोलंबी मिळाल्याचे दिसून आले.

काशीद, नांदगाव, मुरूड समुद्रावर रविवारी पर्यटक मोठ्या प्रमाणात आले असून जंजिरा जलदुर्ग पाहण्यासाठी शेकडोंच्या संख्येने वाहने जाताना दिसत होती. त्यामुळे मासळी मार्केट आणि बंदर मार्गावर सातत्याने वाहतूक कोंडी होत होती.

शेकापच्या माध्यमातून वाघेरेंना वाढता पाठिंबा

। पनवेल । वार्ताहर ।

शेतकरी कामगार पक्षाचे कामोठे शहर कार्याध्यक्ष गौरव पोरवाल यांच्या माध्यमातून विविध समाज्यांच्या प्रतिनिधींच्या भेटी घेण्यात आल्या. मावळचे खा. श्रीरंग भारणे हे गेल्या १० वर्षापासून हरवले असल्याची माहिती या समाज बांधवांनी दिली. एवढेच काय तर त्यांनी त्यांचे नाव सुद्धा ऐकले नाही हे सुद्धा मान्य केले आहे. अनेक समस्या पनवेलमधील जश्याच्या तश्या आहेत, असे सुद्धा या बांधवांनी सांगितले. तसेच, येणाऱ्या काळात आम्ही गौरावभाई यांच्या माध्यमातून संजोग वाघेरे यांच्यापर्यंत पोहोचू शकतो आणि समस्यांचे निवारण होऊ शकते, या शुद्ध हेतून सर्वांनी वाघेरे यांना मतदान करून विजयी करण्याचा

संकल्प केला.

याप्रसंगी जैन समाज, सिरवी समाज, राजपूत समाज यांचे प्रमुख प्रतिनिधी विजय सिंह बोहरा, मनोज बाफना, मुकेश अंचालिया, ईश्वर राजपूत, मांगीलाल चौधरी आणि अनेक समाज बांधव उपस्थित होते.

यावेळी शेकापचे माजी आ. बाळाराम पाटील आणि उमेदवार संजोग वाघेर यांनी प्रचाराच्या गडबडीमधून वेळात वेळ काढून उपस्थितांशी व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे चर्चा केली आणि आभार मानले. तसेच, या बैठकीत हरियाणा समाजाचे तसेच स्टील चेंबरचे अध्यक्ष नरेश शर्मा व रिद्धी सिद्धी चेंबरचे दिनेश शर्मा आणि त्यांचे सर्व सहकारी, समाज बांधव यांनी सुद्धा संजोग वाघेरे-पाटील यांना जाहीर पाठिंबा दिला.

सर्व धर्मियांच्या पाठिंब्यामुळे वाघेरेंचे पारडे जड

- **आ. जयंत पाटील यांनी घेतलेल्या बैठकीचे सकारात्मक परिणाम**
- **तमाम शीख, मुस्लीमांचा मोठ्या प्रमाणात पाठिंबा**

। पनवेल । वार्ताहर ।

। पनवेल । वार्ताहर ।

लोकसभेसाठी चौथ्या चरणातील मतदानाच्या प्रचाराची प्रक्रिया थंडावली आहे. मावळमध्ये दोनवेळा खासदारकी उपभोगलेले श्रीरंग बारणे विरुद्ध नव्या दमाचे संजोग वाघेरे पाटील अशी लढत येथे होत आहे. शिवसेना विरुद्ध शिवसेना अशी लढत जरी असली तरी या लढतीला प्रस्थापित विरुद्ध नवे, उमदे असे स्वरूप प्राप्त झाले आहे. प्रचाराच्या तोफा थंडावल्यानंतर एकूणच या मतदारसंघाचा आढावा घेतला असता विद्यमान खासदारांना अँटिइंकंबन्सी भोवणार असे चित्र दिसून येते. तर, दुसरीकडे कट्टर शिवसैनिकांच्या परिश्रमाच्या जोरावर आणि सर्व धर्मियांच्या पाठिंब्यामुळे संजोग वाघेरे-पाटील यांचे पारडे जड झाले आहे.

संजोग वाघेरे यांना शिख बांधवांनी मोठ्या प्रमाणात पाठिंबा दर्शविला आहे. कळंबोली तसेच नवीन पनवेल गुरुद्वारा येथील प्रधानांनी जाहीर पाठिंबा देत तमाम शीख बांधव त्यांच्या पाठीशी उभे राहणार असल्याची ग्वाही दिली होती. तसेच, मुस्लिम समाजाच्या बांधवांनी देखील एकदिलाने वाघेरे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार असल्याचे आश्वासन दिले आहे. शेकापचे सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी पनवेल मधील मुस्लिम मोहोल्ल्यात घेतलेल्या बैठकीचे अत्यंत सकारात्मक परिणाम जाणवत आहेत. फार मोठ्या

संख्येने मुस्लिम बांधव या बैठकीला उपस्थित होते व वाघेरे यांच्या नावाचा जयघोष करत तमाम मुस्लिम बांधव त्यांना पाठिंबा देणार असल्याचे आश्वासन दिले.

केंद्र सरकारने केलेल्या कामगार विरोधी कायद्यामुळे फार मोठा कामगार वर्ग भाजपा सरकार विरोधात आहे. याचाच प्रत्यय संजोग वाघेरे यांच्या प्रचारादरम्यान आला. कामगार नेत्या श्रुती म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली एक डझन कामगार संघटनांनी वाघेरे यांच्या पाठीशी उभे राहून त्यांची मशाल निशाणी घरोघरी पोहोचवणार असल्याची शपथ घेतली होती. शिवसेना आमदार सचिन आहीर यांच्या अध्यक्षतेखाली हजारो कामगारांनी एकत्र येत वाघेरे यांना निवडून आणण्यासाठी दिवस रात्र एक करणार असल्याचे जाहीर केल होते. अशा सर्व स्तरांतून संजोग वाघेरे-पाटील यांना पाठिंबा मिळत असल्यामुळे त्यांचे पारडे जड असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

मोदींच्या गमतीजमती

निवडणुकीच्या तीन फेऱ्या आतापर्यंत झाल्या आहेत. चौथी फेरी आज पार पडत आहे. या सर्व फेऱ्यांमध्ये भाजपविरोधात मोठे मतदान झाले आहे. विरोधकांकडे साधने कमी आहेत. पण ही निवडणूक आता लोकांनी हाती घेतली आहे. ही राजवट नको असे वातावरण तयार झाले आहे. आणि, हे महाराष्ट्रातच नव्हे तर देशाच्या अनेक भागातले चित्र आहे. यामुळेच, बहुदा, नरेंद्र मोदी बऱ्याच गमतीजमती करू लागले आहेत. दोन दिवसांपूर्वी, काँग्रेसला अदानी आणि अंबानीकडून टेम्पो भरभरून माल उर्फ काळा पैसा जात असल्याचा आरोप त्यांनी केला. वास्तविक आजवर अदानी हा मोदींचा 'यारदोस्त' असल्याचे म्हटले जात होते. अदानीच्या कंपनीत परदेशातून आलेल्या हजारो कोटी रुपयांचे हिशेब लागत नसल्याचा आरोप अमेरिकी संस्थेने केला. तरीही मोदींची इडी काही अदानीच्या दारात गेली नाही. उलट त्याला पूर्ण संरक्षण दिले गेले. अंबानींचे तर यांचे जुने संबंध. तरीही या दोघांवरच मोदींनी काळा पैसा देत असल्याचा आरोप केला. त्यांना बोलायचे काँग्रेसवर होते. पण ते बोलले भलतेच. ही गंमत केल्यानंतर दुसऱ्या दिवशी मोदींना बहुदा प्रायश्चित्त करावे लागले. कारण नऊ मे या दिवशी मोदींनी कोठेही सभा घेतली नाही. ऐन निवडणुकीच्या हंगामात मोदी गप्प बसले हीच मोठी बातमी होती. त्यानंतर शुक्रवारी ते महाराष्ट्रात आले. त्यांच्या नेहमीच्या सवयीप्रमाणे ते पुन्हा रेटून खोटे आरोप करणार असे सगळ्यांना वाटले. पण अदानी-अंबानीवर त्यांनी चकार शब्दही काढला नाही. त्याऐवजी त्यांनी वेगळीच गंमत केली. शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांना आपापले पक्ष घेऊन भाजपसोबत येण्याचे निमंत्रण देऊन टाकले. हेच मोदी याच भाषणात या दोन्ही नेत्यांच्या पक्षांना नकली म्हणत होते. नंतर काहीच क्षणात या नकली पक्षांना पराभूत करण्याची भाषा करण्याऐवजी मोदींनी त्यांना अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्या पक्षांमध्ये सामील व्हा असा सल्ला दिला.

अतृप्त आत्म्याला साद

इतकेच नाही तर तसे केल्यास तुमची सर्व स्वप्ने पूर्ण होऊन जातील असे भरघोस आश्वासनही दिले. कुरुक्षेत्रावर गदायुध्द चालू असताना दुर्योधनाने भीमाला, (चार दिन गुजारिए गुजरात में म्हणणाऱ्या अमिताभच्या थाटात) आपल्यासोबत येण्याचे आवाहन करावे असा हा मनोरंजक प्रकार म्हणायला हवा. हेच मोदी आठ दिवसांपूर्वी पुण्यातल्या सभेत पवारांना भटकता आणि अतृप्त आत्मा म्हणाले होते. दोन दिवसांपूर्वी उद्धव यांचा उल्लेख त्यांनी बाळासाहेबांचे नकली संतान असा केला. पवारांनी महाराष्ट्रासाठी काय केले असा सवाल मोदी आणि अमित शाह हे दोघे सतत करीत असतात. आता त्याच आत्म्यांना व संतानांना साद घालण्याची वेळी मोदींना आली आहे. त्यातही गंमत अशी की, दादा आणि शिंदे यांच्या गटात सामील व्हा असे हलवायाच्या घरावर तुळशीपत्र पध्दतीचे हे निमंत्रण आहे. तिकडे शिंदे रोज येताजाता उद्धव ठाकरे यांना अनेक प्रकारच्या शिव्या देत असतात. आयत्या पिठावर रेघा मारणारे, पक्षातल्या लोकांकडून पैसे घेणारे अशी किंवा याहूनही वाईट संभावना ते करीत असतात. दुसरीकडे अजितदादा काकांना रोज रिटायर होण्याचा सल्ला देत आहेत. अमोल कोल्हे किंवा निलेश लंके यांची लायकी काढत आहेत. पवार गटातील काही आमदारांना पुन्हा निवडून कसे येता म्हणून धमक्या देत आहेत. प्रश्न असा आहे की, या मंडळींनी मोदींचे आमंत्रण स्वीकारलेच तर शिंदे आणि दादांचे काय होणार? तिकडे भाजपचे लोक सतरंज्या घालून दमले आणि भरत गोगावलेंचा मंत्रिपदासाठी शिवलेला सूट जुन्या बाजारात विकायची वेळ आली. त्यात आता तुमची स्वप्ने पूर्ण करतो असे थेट मोदींकडचे आश्वासन घेऊन ही नवीन मंडळी दाखल झाली तर या आधीच्या लोकांची स्थिती पायपुसण्याहूनही वाईट होणार.

पराभवाच्या छाया

पवार व ठाकरे यांचे पक्ष फोडल्यामुळे महाराष्ट्रात भाजपवर मतदारांचा प्रचंड राग आहे. तो मतदानात व्यक्त होणार आहे. त्या मतदारांमध्ये चलबिचल निर्माण करू असे मोदींना बहुदा वाटले व म्हणून त्यांनी हे निमंत्रण दिले. पण पवार व ठाकरे यांनी ते स्पष्टपणे फेटाळून लावले व त्यांचा डाव उधळून लावला. आपला वारसा गांधी-नेहरुंचा आहे व आपण लोकशाहीविरोधी मोदींच्या पक्षासोबत कधीही जाऊ शकत नाही असे पवारांनी स्पष्ट केले. किंबहुना, दोनच दिवसांपूर्वी त्यांनी, भविष्यात, राष्ट्रवादी व इतर छोटे पक्ष काँग्रेससोबत अधिक सहकार्य करू शकतात व त्यात विलीन होऊ शकतात असे मत व्यक्त केले होते. मोदींनी आपले निमंत्रण त्याच मताच्या आधारावर बेतले होते. काँग्रेस हा आता संपू घातलेला पक्ष आहे, तिकडे जाऊन तुम्हीही संपून जाल असा इशारा त्यांनी दिला होता. पण मोदींची ही धडपड केविलवाणी आहे. या निवडणुकीमध्ये काँग्रेससह सर्वच विरोधी पक्षांना जनतेतून मोठे बळ मिळते आहे. भाजपची एकाधिकारशाही, खोटारडेपणा आणि इडी वगैरे वापरण्याची सरकारी गुंडगिरी यांना कंटाळली आहे. त्यामुळे काँग्रेस हे बुडते जहाज आहे वगैरे भाषा सध्या कोणालाही पटणारी नाही. उलट चारशेपारचा नारा देणारे मोदींचा भाजप बहुमताच्या आकड्यापर्यंत तरी पोचू शकेल का याबाबत योगेंद्र यादव इत्यादींनी शंका व्यक्त केली आहे. इंडिया शायनिंगचा प्रचार करून असाच फटका २००४ मध्ये वाजपेयी आणि प्रमोद महाजन यांना बसला होता. मोदींचे जहाजही त्याच दिशेने निघालेले दिसते. त्याची जाणीव झाल्यामुळेच मोदी आतापासून मित्र जमवण्याच्या मागे लागलेले दिसतात, असाही एक अर्थ निघू शकतो. मोदी यांनी महाराष्ट्राच्या निवडणुका होईपर्यंत तरी आपले निमंत्रण रोखून ठेवायला हवे होते असे आता देवेंद्र फडणवीस आणि मंडळींना वाटत असेल. कारण, पुणे व मुंबईच्या दोन महत्वपूर्ण फेऱ्या बाकी असताना, मोदींच्या या गमतीजमतींमुळे भाजपला फायदा होण्याऐवजी तो हरत असल्याचाच संदेश गेला आहे.

विचार

बेपर्वाईमुळे जंगलाची राख

उत्तराखंडमधील डोंगराळ भागातील जंगले आगीच्या भक्ष्यस्थानी पडली आहेत. या हंगामात जंगलाला आग लागण्याच्या ८८६ घटना घडल्या असून आतापर्यंत पाचजणांचा मृत्यू झाला तर पाचजण जखमी झाले आहेत. त्याचबरोबर ११०७ हेक्टरपेक्षा जास्त वनक्षेत्र बाधित झाले आहे. दर वर्षी हजारो हेक्टर क्षेत्रातील जंगले मानवी बेपर्वाईमुळे आगीच्या भक्ष्यस्थानी पडत आहेत. या समस्येला भिडण्याचे आव्हान समोर उभे ठाकले आहे.

मिलिंद बेंडाळे

उत्तर काशी जिल्ह्यातील बराहत पर्वतरांगेपासून धरासू पर्वतरांगांपर्यंत अनेक जंगले जळत आहेत. विभागाच्या नोंदी पाहिल्यास आतापर्यंत १९.५५ हेक्टर वनक्षेत्र जळून खाक झाले आहे. धुरामुळे लोकांना श्वास घेण्यास त्रास होत असताना वन विभाग आग शमवण्यासाठी धडपड करत आहे. बाराहत रेंजमधील जंगलातील आग अनेक दिवस धुमसत राहिली. मुखेम पर्वतरांगेतील डांग आणि पोखरी गावालगतचे जंगल तसेच दुंडा पर्वतरांगेतील चमकोट व दिलसौद परिसरातील जंगलेही आगीच्या भक्ष्यस्थानी पडली आहेत. धरसू पर्वतरांगेतील फेडी आणि सिल्क्यरालगतची जंगलेही जळताना दिसली. जंगलाला लागलेल्या आगीमुळे मौल्यवान वनसंपत्तीचे तसेच वन्यजीवांचे नुकसान होते; मात्र वन विभागाकडून जंगलातील आग रोखण्यासाठी कोणतेही अर्थपूर्ण प्रयत्न होताना दिसत नाहीत. जंगलातील आग नियंत्रणासाठी संसाधने वाढवण्यात आल्याचे वन विभागाचे म्हणणे आहे; परंतु त्यामुळे आगीच्या घटना कमी झालेल्या नाहीत. आग किती वेळात आटोक्यात येते, याला महत्त्व असते. वन विभागाची आकडेवारीच आगीच्या वाढत्या घटना आणि आग धुमसत राहण्याचे दिवस सांगते. त्यावरून अजून तरी जंगलांना आगीपासून वाचवण्यात आपल्याला फार यश आले आहे, असे दिसत नाही. भारतातील हवामानाच्या दृष्टीने एप्रिल ते जून या महिन्यांना जंगलांसाठी 'अग्नी हंगाम' असे म्हणतात; पण आगीच्या घटना डोंगराळ राज्यांमध्ये जास्त घडतात. उत्तराखंडच्या जंगलात सध्या असे घडत आहे. ही जंगले उत्तराखंडच्या सौंदर्याचा पाया आहेत. इथली संपूर्ण सांस्कृतिक, आर्थिक आणि सामाजिक रचना यावर अवलंबून आहे.

जनता आणि सरकारला हे माहीत आहे, की उन्हाळ्याच्या महिन्यांमध्ये आग लागू शकते; परंतु तरीही आग वर्षानुवर्षे पसरत आहे. आग इतकी भीषण झाली आहे की जंगलातील आग शमवण्यासाठी हेलिकॉप्टर तैनात करण्यात आली आहेत. राज्यातील विविध भागांमधून जंगलाला आग लागण्याची ३१ नवी प्रकरणे समोर आली आहेत. यामुळे झाडे आणि प्राण्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान तर होतेच; शिवाय वायूप्रदूषण आणि उष्णतेची समस्याही या परिसराला भेडसावते. इतकेच नाही, तर उत्तराखंडच्या जंगलात आगीची आपत्ती दर वर्षी ओढवते. त्यात मानवी हस्तक्षेप हे प्रमुख कारण मानले जाते. या वेळीही असेच काहीसे घडले आहे. आता या प्रकरणात रुद्रप्रयागमधून तिघांना अटक करण्यात आली आहे. जंगलात आग लावण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. ही आग या डोंगराळ राज्याच्या नशिबी आहे की हा अज्ञानाचा परिपाक आहे, असा प्रश्न आगीची तीव्रता पाहून मनात येतो.

उत्तराखंड वन विभागाच्या आकडेवारीवरून दिसून येते की गेल्या वर्षी नोव्हेंबरपासून राज्यभरात जंगलाला आग लागण्याच्या किमान ६०६ घटना घडल्या आहेत. त्याचा परिणाम ७३५.८१५ हेक्टर क्षेत्रावर झाला आहे. जंगलातील आगीच्या २२० घटना गढवाल आणि ३३३ कुमाऊं विभागातील आहेत. ५३ घटना वन्य जीव क्षेत्रातील आहेत. उत्तराखंडमध्ये गेल्या दहा वर्षांमध्ये जंगलाला आग लागण्याच्या १४ हजारांहून अधिक घटना घडल्या आहेत. त्यात २३ हजार हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावरील वनसंपत्ती बाधित झाली आहे. गेल्या दहा वर्षांमध्ये जंगलातील आगीच्या घटनांमध्ये १७ जणांना जीव गमवावा लागला आहे, तर ७४ जण जखमी झाले आहेत.

उत्तराखंड राज्यात २०२१ मध्ये जंगलाला आग लागण्याच्या सर्वाधिक घटना घडल्या. २०२१ मध्ये राज्यभरात जंगलाला आग लागण्याच्या २१८३ घटना घडल्या. त्यात ३,९४३ हेक्टर क्षेत्रातील वनसंपत्ती बाधित झाली. २०२० मध्ये कोरोना साथीमुळे लागू केलेल्या टाळेबंदीमुळे जंगलांमध्ये मानवी क्रियाकलाप कमी राहिला. त्यामुळे जंगलांना आग लागण्याच्या घटनांमध्ये विक्रमी घट झाली. त्या वर्षी १३५ आगी लागून केवळ १७२.६९ हेक्टर वनक्षेत्र प्रभावित झाले. त्या वर्षी दोघांचा मृत्यू झाला होता तर एकजण जखमी झाला होता. उत्तराखंडमध्ये साधारणपणे १५ फेब्रुवारी ते १५ जून हा आगीचा काळ मानला जातो.

आग लागण्याला तीन बाबी कारणीभूत ठरतात. पहिले म्हणजे इंधन, दुसरे म्हणजे ऑक्सिजन आणि तिसरे म्हणजे उष्णता. जंगलात ऑक्सिजनची कमतरता नाही. याशिवाय झाडांची कोरडी पाने आणि फांद्या हे इंधनाचे मुख्य स्रोत असतात. पाइन आणि देवदारची झाडे डोंगरावर विपुल प्रमाणात आहेत. उष्णतेबद्दल बोलायचे तर उन्हाळ्याच्या हंगामात ते निश्चितपणे उद्भवते. राज्यात या वर्षी जानेवारीदरम्यान पाऊस आणि बर्फवृष्टी झाली नाही. नोव्हेंबर आणि डिसेंबरही कोरडेच राहिले. जंगलात आग लागण्याचे मुख्य कारण म्हणजे आर्द्रतेचा अभाव. 'एसओएफआर' या संस्थेने २०२० चा हवाला देऊन हवामानबदल आणि जंगलातील आग यांच्यातील दुवा मान्य केला आहे. अहवालात २०३०, २०५० आणि २०८० च्या अंदाजानुसार भारतीय जंगलांना हवामानबदलाचे 'हॉटस्पॉट' म्हटले आहे. डोंगरी भागातील राज्यांमध्ये तापमानात कमाल वाढ होईल आणि पावसात घट होईल, असा इशारा देण्यात आला आहे; पण यासाठी केवळ बदलत्या हवामानाला दोष देणे योग्य नाही. जंगलात आग लागण्याची इतरही कारणे आहेत. उत्तराखंडच्या जंगलात अनेक प्रकारची पाने आहेत, सदाहरित झाडे आहेत. नोव्हेंबर आणि डिसेंबरमध्ये पानगळती होते. नंतर वसंत ऋतूमध्येदेखील पाने पडतात. ही पाने सुईसारखी असतात. वैशिष्ट्य म्हणजे ती स्वतःच वाढतात आणि कुठेही उडतात. ही पाने उन्हाळ्यात ठिणगीचे काम करतात. एकदा आग लागली की ती शमवणे कठीण जाते.

त्यासाठी ही जंगले सातत्याने स्वच्छ करण्याची गरज आहे. हिमालयातील समाज आणि पर्यावरणाचा अभ्यास करणारे डॉ. शेखर पाठक सांगतात, नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यात वन विभागाकडून जंगलात 'फायर लाईन्स' बनवायचे केले जात असे. मात्र या प्रक्रियेत आता अत्यंत हलगर्जीपणा दिसतो. त्याचे परिणाम आपल्या सर्वांसमोर आहेत. पाइन सुयांच्या सहाय्याने वीजनिर्मितीची सुरुवात झाली; पण यालाही अनेक कारणांमुळे अडथळे आले आणि ते यशस्वी होऊ शकले नाहीत. या कामासाठी पाच ते दहा टक्के पाइन सुया वापरल्या गेल्या तर आपण खूप मोठ्या क्षेत्राचे संरक्षण करू शकतो.

उत्तराखंडमध्येच नाही, तर जगभरातील जंगलातील आगीच्या घटनांमागे मानवी हस्तक्षेप हे प्रमुख कारण मानले जाते. भारताच्या पर्यावरण मंत्रालयाअंतर्गत असलेल्या वन संशोधन संस्थेच्या २०१९ च्या अहवालानुसार, जंगलातील ९५ टक्के आगी मानवी चुकांमुळे लागतात. गावकरी अनेकदा जंगलात जमिनीवर पडलेली पाने किंवा सुकलेले गवत पेटवून देतात. त्यानंतर आग पसरत जाते आणि भडकली की अनियंत्रित होते आणि भयंकर रूप धारण करते. याशिवाय काही वेळा पर्यटक जळत्या सिगारेट किंवा इतर पदार्थ जंगलात टाकतात. त्यामुळे आग संपूर्ण जंगलात पसरते. बदलते हवामान आणि प्रशासकीय पातळीवरील दुर्लक्ष ही जंगलातील आगीची प्रमुख कारणे आहेत. या घटनांमध्ये समाजजीवनातील बदलही महत्त्वाची भूमिका बजावतात. पूर्वी ग्रामीण जीवन थेट जंगलांवर अवलंबून होते; पण आता इतके स्थलांतर झाले की डोंगराजवळ कुणी राहत नाही. स्थानिक लोकांचा जंगलांशी असलेला ओढाही कमी झाला आहे. अशा परिस्थितीत जंगलात आग लागते तेव्हा ती कोणी पहात नाही किंवा शमवण्याचा विचारही करत नाही. दर वर्षी आगीच्या हंगामापूर्वी उत्तराखंडचा वन विभाग जंगलात आग पसरू नये, म्हणून तयारी करतो.

आग आटोक्यात आणण्यासाठी नियंत्रित बर्निंगद्वारे 'फायर लाईन्स' तयार करणे, जुन्या 'फायर लाईन्स'ची साफसफाई करणे, 'क्रू स्टेशन'ची देखभाल करणे, जुनी उपकरणे दुरुस्त करणे आदी तयारी करतो. दर वर्षी काही नवीन उपकरणे खरेदी केली जातात. या कामी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित केले जाते आणि लोकांना जागरूक करण्यासाठी मोहिमा राबवल्या जातात, तरीही आगी रोखण्यात अपयश येण्यामागील कारण काय? वन विभागात आवश्यकतेपेक्षा कमी कर्मचारी असणे हे या घटनांमागील एक मोठे कारण आहे. शिवाय कर्मचाऱ्यांना योग्य प्रशिक्षणही मिळत नाही. कर्मचारी कमी झाले आहेत, लोक निवृत्त होत आहेत आणि नवी भरती नाही. या सर्व आघाड्यांवर प्रशासन, जिल्हा प्रशासन आणि वन विभागाने नव्याने विचार करण्याची गरज आहे. आगीशी लढण्यासाठी आपल्याला नोव्हेंबर महिन्यापासूनच तयारी करावी लागेल.

जूनपर्यंत कोणत्याही व्यत्ययाशिवाय ती सुरू राहिली पाहिजे. जंगलातील आग रोखण्यासाठी समुदायाचा सहभाग खूप महत्त्वाचा आहे आणि तो मजबूत करण्यावर भर दिला गेला पाहिजे. भारतीय वन सर्वेक्षण २०२१ च्या अहवालानुसार भारतातील एकूण वनक्षेत्रापैकी ३६ टक्के भागाला अनेकदा आगीचा धोका असतो. यापैकी चार टक्के 'अत्यंत धोक्याच्या' श्रेणीत येतात आणि सहा टक्के 'अति उच्च धोका' श्रेणीत येतात. ओडिशा, मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमध्ये जंगलाला आग लागण्याच्या सर्वाधिक घटना घडल्याचे या अहवालात म्हटले आहे.

आजकाल

महात्मा बसवेश्वरांचे वैचारिक सोने

रवींद्र केसकर

महात्मा बसवेश्वरांनी वेदप्रामाण्य नाकारले, स्त्रीजातिवर्णभेद नाकारला, आश्रमव्यवस्था नाकारली, उच्च-नीचता नाकारली, मूर्तिपूजा व बहुदैवत उपासना नाकारली, स्वर्ग-नरक आणि पुनर्जन्म या संकल्पना पूर्णपणे नाकारल्या. कोणत्याही जातिवर्णाच्या व्यक्तीस इष्टलिंग दीक्षा देऊन लिंगायत संप्रदायात प्रवेश दिला. सर्व लिंगधारक समान व बंधू आहेत असे नवे समतावादी तत्त्व स्थापले.

'वेदांवर खड्ग चालवीन, शास्त्रांना बेड्या घालेन, तर्काच्या पाठीवर चाबकाचे फटकारे ओढेन,' आशा परखड शब्दात सनातनी व्यवस्थेला आव्हान दिले. वयोज्येष्ठ असलेल्या डोहोर समाजातील कक्कय्यांना बसवेश्वर आजोबा म्हणत तर मातंग चैन्नय्यांना त्यांनी वडील मानलं! कल्याण येथील अस्पृश्य वस्तीतील संबळी नागदेवांच्या घरी बसवेश्वरांनी भोजन केले. त्यामुळे राजा बिज्जलाच्या मंत्रिमंडळातील सल्लागार असलेल्या सनातनी नारायण भट्ट, नारायण क्रमित, कृष्ण पेट्टी, विष्णुभक्त आदींनी महात्मा बसवेश्वरांच्याविरोधात मोठी आघाडी उघडली. महात्मा बसवेश्वर सनातन ब्राह्मण धर्माच्या, शैव परंपरेच्या विरोधी वर्तन करून धर्मभ्रष्ट आशा शिवशरणांचे आंदोलन पसरवत आहेत, असा प्रचार त्यांनी सुरू केला.

महात्मा बसवेश्वरांचे अनुयायी असलेल्या ब्राह्मण समाजातील मधुवय्यांनी आपली मुलगी चांभार समाजातील अस्पृश्य असलेल्या हरळय्याच्या मुलास दिली. याला बसवेश्वरांसह सर्व लिंगायतांचा सानंद पाठिंबा होता. परंतु राजा बिज्जलाने त्यांच्या दरबारातील सनातनी मंत्र्यांच्या सल्ल्यावरून मधुवरस व हरळय्या यांचे डोळे काढून टाकले. अमानुषपणे हत्तीच्या पायाला बांधून त्यांची हत्या करविली. त्यामुळे शिवशरण बिथरले. अस्वस्थ झालेल्या महात्मा बसवेश्वरांनी अचानक कल्याण सोडले आणि कूडलसगमास प्रयाण केले. त्यामुळे सनातनी ब्राम्हणांच्या सल्ल्याने चालणारी राजसत्ता विरूद्ध बसवेश्वरांनी सुरू केलेली शिवशरण चळवळ अशी अंतर्गत यादवी सुरू झाली. इ. स. ११६७ मध्ये बसवाण्णा कूडलसंगम येथे लिंगैक्य पावले.

लिंगायत संप्रदायाने कन्नडमधून खूप मोठे वचनसाहित्य निर्माण केले. त्यातून प्रस्थापित सनातनी व्यवस्थेला अनेक प्रश्न विचारून नामोहरम केले. वेद, यज्ञ, कर्मकांडे, आचार परंपरा अशा सर्वांविरोधी कठोर भूमिका वचनकारांनी घेतली. राजा बिज्जलने राजसंन्यास घेतल्यानंतर त्याचा दुसरा राजपुत्र रायमुरारी सोविदेवला राजा केले आणि या राजा सोविदेवाने सनातनी कारभारांच्या सल्ल्याने वचन साहित्याचे भले मोठे भांडार जाळून नष्ट केले. मंदिराचं सनातनी, वैदिक तत्वज्ञान नाकारून माणसांना महत्व देणारं व्यापक ऐक्य घडवून आणणाऱ्या महात्मा बसवेश्वरांची १३९६, अल्लमप्रभूंची १४०९ वचने आजच्या घडीलाही उपलब्ध आहेत. याशिवाय अनेक वचनकारांची वचने उपलब्ध होत आहेत. यातील बहुतेक वचनकार कष्टकरी वर्गातील व निम्नजातीतील होते. यातील प्रमुख चेन्नबसवण्णा, अक्कमहादेवी, सिद्धराम आहेत. याशिवाय सकलेश मादरस, मोळीगेय मारय्या, एकांतद रामय्या, अक्कनागम्मा, गंगा बिका, नीलम्मा अशा अनेकांचा समावेश होतो.

१२ व्या शतकात उच्च आणि कनिष्ठ अशा समाजाच्या सर्व थरातून आलेल्या, स्वतःचा असा वेगळा 'स्वर' असलेल्या तीनशेहून अधिक कवींना जन्म देणारी अभिव्यक्तीची अशी प्रभावी वाङ्मयीन चळवळ जगाच्या पाठीवर अन्यत्र आढळणे अवघड आहे. १२ व्या शतकात साक्षरतेचा अधिकार नाकारल्या गेलेल्या, सर्व शूद्रांच्या, अस्पृश्यांच्या आणि स्त्रियांच्या जातिबद्ध समाजातील हा विस्फोट होता. शरण आंदोलनातुन जन्माला आलेली सर्वात मोठी क्रांती म्हणजे खालच्या थरातून आलेल्या ३३ वचनकार कवयित्री या चळवळीने तयार केल्या, लिहित्या केल्या. ते ही आजपासून हजार वर्षांपूर्वी. महात्मा बसवेश्वरांच्या वचनसाहित्यातून, अनुभव मंटपातून, नवसंप्रदायातून साकारलेली ही व्यापक कल्याण क्रांती सनातनी ब्राह्मण मंत्री व मुजोर राजसत्तेच्या माध्यमातून मोडून काढली गेली. त्यामुळे प्रचंड मोठी प्रभाव क्षमता असलेल्या लिंगायत पंथाला अनेक आव्हानांचा सामना करावा लागला. त्यातूनही महात्मा बसवेश्वरांच्या मानवी कळवळीतून जन्माला आलेले हे वैचारिक सोनं आजही लख्ख आहे. फक्त ते पाहण्याची, समजून घेण्याची आणि अंगिकरण्याची व्यापक दृष्टी आपण हरवून बसलो आहोत.

लोकसंसद

अनेक वृद्धांना औषोपचाराचा कंटाळा

देशभरात वृद्धावर एक सर्वेक्षण करण्यात आले होते. हे सर्वेक्षण एजवेल या संस्थेने केले होते. त्यातील माहितीनुसार अनेक वृद्ध जवळपास ५० टक्के वृद्ध आर्थिक अडचणीमुळे व वाहतुकीच्या अडचणीमुळे डॉक्टर्स कडे जात नाहीत. ग्रामीण भागात हेच प्रमाण जवळपास ६२ टक्के इतके प्रचंड आहे. ही बातमी नुकतीच वाचण्यात आली. अनेक वृद्धांना घरीच उपचार हवे असतात. कित्येकांना शुगर डायबेटीस याची नियमित तपासणी सुद्धा जरुरीची वाटत नाही. एकदा का एखाद्या दुखण्याने उचल खाल्ली की मग ते डॉक्टरांच्या दवाखान्याची पायरी चढतात. नियमित आरोग्य तपासणी व औषधोपचार घेतल्यास अनेक व्याधीवर मात करता येते. यासाठी केंद्र सरकारने ७० वर्षांपुढील वृद्धांसाठी मोफत आरोग्य सेवा पुरविण्याचा निर्णय घेतला आहे. ही एक वृद्धांना चांगली संधी आहे. त्याचा फायदा त्यांनी घ्यावा नियमितपणे आपल्या आरोग्याची तपासणी करून घ्यावी. त्यामुळे आपणास आणखी काही वर्षे आयुष्य लाभू शकते व या जीवनाचा आनंद लुटता येतो.

- शांताराम वाघ, पुणे

मराठी साहित्यिक दिनविशेष

१३ मे

१८०३:- कवी आणि कादंबरीकार लक्ष्मणशास्त्री मोरेश्वर हेबळे यांचे निधन. 'चंद्रिका' हे मासिक त्यांनी सुरु केले होते. अद्भुत-गूढ विषयांवरील अनेक रंजक कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. त्यापैकी मुक्तामाला व 'रत्नप्रभा' या कादंबऱ्या विशेष गाजल्या. **१८८०:-** धर्मशास्त्र, इतिहास प्राचीन कवितांचे व्यासंगी गोविंद रामचंद्र राजोपाध्ये यांचा जन्म. ह्यांनी 'समाजशास्त्र अथवा सनातन धर्मप्रणाली', 'सामराज कविविरचित मृद्र व्याख्यान', 'कवी रघुनाथ पंडीत व सामराजकृत स्पूट कविता' ही त्यांची पुस्तके. 'काव्यविषयक विवेचक, रसग्रहण, शोधक व रसिक याची प्रचिती देतात. त्यांचा 'पंडीतराव राजोपाध्ये घराण्याचा इतिहास' हा ग्रंथ त्यांच्या मृत्यूनंतर प्रसिध्द. 'रुक्मिणीहरण कर्ता सामराज व मृद्रलारण्यात कर्ता सामराज एक की दोन' या वादात त्याचा कर्ता एकच हे त्यांचे निर्णायक मन अभ्यासकांना मान्य आहेच. यावरुन त्यांच्या व्यासंगाची आणि विद्वतेची कल्पना येते. **१९२५:-** साहित्यिक व समीक्षक डॉ. भालचंद्र दिनकर फडके यांचा जन्म. मराठी कथा या विषयावर पी एच डी मिळवून न थांबता नवकथोत्तर मराठी कथेचा शोध त्यांनी घेतला. 'दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह', 'मराठी लेखिका : चिंता आणि चिंतन', 'सहा कथाकार आणि 'समुद्रकाठची रात्र' या पुस्तकांचे कर्ते व चिकित्सक समीक्षक असा नावलौकिक त्यांनी संपादला होता. **१९३०:-** प्रसिध्द लेखिका तारा वनारसे यांचा जन्म. मराठी नवकथेच्या आरंभकाळापासून त्यांचे लेखन लक्षणीय ठरले होते. 'कक्षा' हे नाटक, 'नर्सेस क्वार्टर्स' ही एकांकिका, 'पश्चिमकडा', 'केवल कांचन' हे लघुकथासंग्रह 'बारा वाऱ्यांवर घर' हा कवितासंग्रह, 'श्यामिनी व सूर' या कादंबऱ्या, 'तिळा तिळा दार उघड' हा प्रवासवर्णनांचा संग्रह व आता प्रकाशनाच्या उंबरठ्यावर असलेले 'गुप्त वरदान' हे भाषांतरीत कथांचे त्यांच्या भाष्यसहित तयार केलेले पुस्तक असा साहित्यिक कार्याचा त्यांचा पट आहे. यापैकी कवितासंग्रह, 'श्यामिनी' ही कादंबरी आणि 'तिळा तिळा दार उघड' या प्रवासवर्णनाला राज्य पुरस्कार मिळाले त्या व्यवसायाने प्रसूतितज्ज्ञ होत्या. दीर्घकाळ त्यांचे वास्तव्य इंग्लंडमध्ये होते. डॉ. बेन रिचर्ड्स त्यांचे पती होते. पती निधनानंतर त्या इंग्लंडमध्येच राहत होत्या. आपल्या वाढदिवसाच्या एक दिवस अगोदर त्यांचे निधन झाले. **१९३०:-** 'विवेकनिष्ठ जीवनदृष्टी' चे लेखक व सामाजिक भान रुजवणारे समीक्षक गोपाळ मारुतीराव पवार यांचा जन्म. 'विनोदाचा औपपत्तिक विचार', 'विनोदाचे तत्त्व आणि स्वरुप', 'मराठीतील साहित्य मूल्य आणि अभिरुची' या विषयांची चर्चा करणाऱ्या पुस्तकांखेरीज महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे चरित्र त्यांनी लिहिले आहे. आता ऐंशीच्या घरात आणणाऱ्या गो.मं.चा गौरवग्रंथ (मराठी साहित्य आणि समाज) अलिकडेच निघाला. याशिवाय 'विनोद-तत्त्व आणि स्वरुप' या विषयावर पीएच.डी त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर (चरित्र), विनोद-तत्त्व आणि स्वरुप, विवेकनिष्ठ जीवनदृष्टी, महर्षि शिंदे यांचे स्फुट लेख (संपादन), रोजनिशी साहित्य मूल्यं आणि अभिरुची, विनोदविषयक लेखन. महर्षि शिंदे यांच्यावर लिहिलेल्या ग्रंथाला साहित्य अकादमीचा पुरस्कार. **१९३०:-** लेखिका, कुमारसाहित्यिका नलिनी दत्तात्रय कुलकर्णी यांचा जन्म. ह्यांच्या 'अबोल बोल' या सुविचार संग्रहासह 'कांगो', 'सहारा', 'सूचिपर्णी अक्षय्य', 'सुदान' या कुमारांसाठी भौगोलिक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. **१९३२:-** 'विवेकनिष्ठ जीवनदृष्टी' चे लेखक व सामाजिक भान रुजवणारे समीक्षक गोपाळ समीक्षक गोपाळ मारुतीराव पवार यांचा जन्म. 'विनोदाचा औपपत्तिक विचार', 'विनोदाचे तत्त्व आणि स्वरुप', मराठीतील साहित्य मूल्य आणि अभिरुची या विषयांची चर्चा करणाऱ्या पुस्तकांखेरीज महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे चरित्र त्यांनी लिहिले आहे. आता ऐंशीच्या घरात असणाऱ्या गो.मं.चा गौरवग्रंथ (मराठी साहित्य आणि समाज) अलीकडेच निघाला. याशिवाय 'ओझं' हे व्यंकटेश माडगूळकरांच्या कथांचे संपादन तसेच पु. ल. देशपांडे आणि आनंद यादव यांच्या लेखनाची समीक्षा, 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' हे महर्षी शिंदेच्या, 'विवेकनिष्ठ जीवनदृष्टी', 'महर्षी शिंदे यांचे स्फुट लेख संपादन', 'रोजनिशी साहित्य मूल्यं आणि अभिरुची', 'विनोदविषयक लेखन', 'महर्षी शिंदे' यांच्यावर लिहिलेल्या ग्रंथाला साहित्य अकादमीचा पुरस्कार. **१९३६:-** ज्येष्ठ साहित्यिक अ. शे. देशमुख यांचा जन्म. 'इंद्रायणी', 'विराणी' हे त्यांचे काव्यसंग्रह प्रसिध्द. **१९३८:-** समीक्षात्मक ललित लेखक, अभिनेता, दिग्दर्शक प्रा. डॉ. सुधाकर गो. गोकाळकर यांचा जन्म. 'शोकनाट्याची मुलतत्त्वे' ह्या समीक्षात्मक ग्रंथाचेत्यांनी सहसंपादन केले. **१९४१:-** नाट्यलेखक, दिग्दर्शक, कथाकथनकार प्रा. सुधाकर प्रल्हाद कुलकर्णी यांचा जन्म. 'स्वप्न रंगले राजूचे' हे विनोदी बालनाटय त्यांच्या नावावर आहे. **१९५९:-** 'हिंदी हीच राष्ट्रभाषा' या पुस्तकातून हिंदीचा पुरस्कार करणारे मराठी साहित्यिक, इतिहासकार शंकर दामोदर चितळे यांचे निधन. 'इतिहास कसा शिकवावा', 'आमचा महाराष्ट्र देश', 'अर्वाचीन भारतीयांच्या कथा' ह्या ग्रंथासह रा. वि. ओतुरकरांच्या सहकार्याने 'हिंदुस्थान साधनरुप इतिहास' हा ग्रंथ त्यांनी संपादित केला. कथात्मक पध्दतीने आणि रसाळ रीतीने इतिहास लेखन त्यांनी केले. याशिवाय काही काळ दै. सकाळचा सहसंपादक म्हणून त्यांनी काम केले.

- संजय वझरेकर
९९७५५७६६७५

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१३ मे

१) श्री. सूर्यकांत यशवंत तिबळे चेंढरे, अलिबाग १३-५-१९४४

२) श्री. सखाराम जोमा पाटील चेंढरे, अलिबाग, १३-५-१९४६

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

पाणीटंचाईचं संकट बिकट

अनेक नियोजित कामे शासनाकडून मंजुरीच्या प्रतीक्षेत

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यात यावर्षी पूर्वीपेक्षा अधिक पाणीटंचाई जाणवत आहे. पाणीटंचाई दूर करण्यासाठी बनविण्यात आलेल्या पाणीटंचाई निवारण कृती आराखड्याला शासनाने मंजुरी दिली आहे. मात्र, रायगड जिल्हा प्रशासनाने अनेक नियोजित कामांना निधी उपलब्ध करून दिला नाही आणि त्यामुळे पाणीटंचाई वाढण्यास मदत होत आहे.

शासनाकडून पाणीटंचाई निवारण्यासाठी संभाव्य पाणीटंचाई गावे आणि वाड्या असलेला आराखडा बनविला जातो. त्यासाठी शासनाकडून टँकरने पाणी पुरविणे, नवीन विंधन विहिरी खोदणे, विंधन विहिरींची दुरुस्ती करणे, नवीन विहीर खोदणे, विहिरींचे खोलीकरण करणे तसेच गाळ काढणे आदी कामे प्रस्तावित केली जातात. त्यासाठी नियोजित कामांसाठी शासनाकडून निधीदेखील देण्यात येतो. मात्र, कर्जत तालुक्याच्या पाणीटंचाई निवारण कृती आराखड्याला जानेवारी २०२४ मध्ये रायगड जिल्हाधिकारी यांच्याकडून मंजुरी देण्यात आली आहे. मात्र, रायगड जिल्हा प्रशासनाने त्यातील पाणीटंचाई निवारण्यासाठी टँकरने पाणीपुरवठा करण्याशिवाय कोणत्याही कामांसाठी निधी दिलेला नाही. त्यामुळे उन्हाळा सुरु होण्यापूर्वी करण्यात येणारी विहिरी खोलीकरण, विहिरींमधील गाळ काढणे, विंधन विहीर खोदणे, विंधन विहिरी दुरुस्त करणे आदी कामे करण्यासाठी निधी मिळाली नाही. त्यामुळे कर्जत तालुक्यातील पिण्याच्या पाण्याची टंचाई वाढण्यास वाढ झाली आहे.

पाणीटंचाई निवारण करण्यासाठी तालुक्यात सात गावे आणि आठ वाड्यांमध्ये नवीन विंधन विहिरी खोदण्यात येणार होत्या. त्याचवेळी २१ गावे आणि १८ आदिवासी वाड्यांमध्ये विंधन विहिरींची दुरुस्ती करण्याचे कामे प्रस्तावित केली होती. मात्र, त्या कोणत्याही कामासाठी निधी प्राप्त झाला नाही. तर नवीन विहीर खोदणे आणि विहिरीमधील गाळ काढणे तसेच विहिरींची खोली वाढवणे, अशी कामे प्रस्तावित करण्यात आली होती. तसेच विहिरींचे जलभरण करणे यासाठीदेखील कामे करण्यासाठी शासनाने निधी दिला नाही. या सर्व कामांसाठी कर्जत पाणीटंचाई कृती समितीने सव्वा कोटींच्या निधीची मागणी केली होती. त्यात विहिरींचे खोलीकरण आणि गाळ काढण्याच्या कामासाठी ७५ लाखांच्या निधीला मान्यता देण्यात आली होती, मात्र एक रुपयादेखील निधी मिळाला नाही. तर विंधन विहिरींच्या दुरुस्तीसाठी २४ लाख ६० हजारांच्या निधीला मंजुरी देण्यात आली होती, मात्र एक रुपयादेखील निधी मिळाला नाही. तर नवीन विंधन विहिरी खोदण्यासाठी १४.४० लाखांच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली होती. परंतु, यापैकी पाणीटंचाई निवारण करण्यासाठी कोणताही निधी शासनाने कर्जत पंचायत समितीकडे वर्ग केलेला नाही.

आंबेवाडी रस्त्याची दुरवस्था

। कोलाड । वार्ताहर ।

मुंबई-गोवा महामार्गावरील आंबेवाडी नाका येथील मुख्य चौकात उड्डाण पुलाचे काम सुरु करण्यासाठी मुख्य रस्ता बंद करण्यात आला असून, पावसाळा तोंडावर आला असताना उड्डाण पूल बनविण्यासाठी प्रशासनाला जाग आली आहे, अशी चर्चा आहे. त्यामुळे वाहतूक दोन्ही बाजूला कमकुवत असणाऱ्या सर्व्हिस रोडवरुन वळवण्यात आली आहे. परंतु, या दोन्ही बाजूचे रस्ते एवढे कमकुवत आहेत की, ते खचल्यामुळे वाहनचालकांसह या मार्गानी प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे.

पावसाळा संपल्यानंतर पाच महिन्यांत आंबेवाडी नाका येथील उड्डाण पुलाचे काम सुरु केले नाही. परंतु, दुसरा पावसाळा सुरु होण्यासाठी काही दिवस राहिले असून, आंबेवाडी नाक्यावरील मुख्य रस्ता बंद करुन उड्डाण काम सुरु करण्यात आले. परंतु, या अगोदर सर्व्हिस रोडच्या दोन्ही बाजूचे रस्त्याचे काम हे सिमेंट काँक्रिटने पक्के करणे गरजेचे होते; परंतु याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप वाहनचालकांकडून होत आहे.

आंबेवाडी बाजापेठेत थोडा पाऊस पडला तरी पुराची परिस्थिती निर्माण होते. याला कारण दोन्ही बाजूला बनवले गटार हे उंचावर व रस्ता खाली असल्यामुळे पाण्याचा निचरा होत नाही. यात भरीत भर म्हणून गोदी नदीजवळील गटाराचे काम अर्धवट स्थितीत असून, यामुळे पाण्याचा निचरा होत नाही. दरम्यान, खचलेल्या रस्त्यामुळे कोणाचा नाहक बळी गेला तर याला जबाबदार कोण, अशी संतप्त प्रतिक्रिया प्रवाशांतून व्यक्त केली जात आहे.

दीपक धुमाळ यांचे निधन

। भाकरवड । वार्ताहर ।

अलिबाग तालुक्यातील पोयनाड, धामणपाडा हद्दीतील रहिवासी दीपक अनंत धुमाळ यांचे वयाच्या ४८ व्या वर्षी अल्पशा आजाराने शुक्रवार, दि. ३ मे रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी रुपाली, मुलगा शिवम, मुलगी आदिती, जावई, नातू असा मोठा परिवार आहे.

एक विश्वासू, प्रामाणिक तसेच कधीही कामचुकार न करता राज्य परिवहन महामंडळात उत्कृष्ट चालक म्हणून १५ वर्षे सेवा केली. मूळ गाव धामणपाडा गावातील रहिवासी असलेले धुमाळ सामाजिक, शैक्षणिक, आध्यात्मिक आदीमध्ये सक्रीय सहभाग घेत असत. त्यांच्या निधनाची बातमी कळताच संपूर्ण धामणपाडा, पोयनाड परिसरावर शोककळा पसरली. त्यांच्या पार्थिवावर धामणपाडा गावच्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध आध्यात्मिक, सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा आदी क्षेत्रातील मान्यवर उपस्थित हो.

दरम्यान, एकतारी भजन मंडळ, ग्रामस्थ मंडळ, क्रीडा मंडळातर्फे पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. उपस्थित सर्वांच्या वतीने सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक नरेश पाटील यांनी श्रद्धांजली वाहिली. कै. दीपक धुमाळ यांचे उत्तरकार्य बारावा मंगळवार, दि. १४ मे रोजी राहत्या घरी होणार आहे.

पर्यायी रस्त्यावर धुळीचे साम्राज्य

। पाताळगंगा । वार्ताहर ।

लोहप-चौक रस्त्याचे सध्या सिमेंट काँक्रिटीकरणचे काम सुरू आहे. त्यामुळे वाहनांसाठी पर्यायी रस्ता कोपरी ते आसरोटी असा साधारणपणे एक कि.मी माळरानावरून करुन देण्यात आला आहे. परंतु, वाहनांच्या वर्दळीमुळे मोठ्या प्रमाणात धूळ निर्माण होत असल्यामुळे श्वसनांचे त्रास होण्याची समस्या गंभीर बनत आहे. हवेत सातत्याने धूळ निर्माण होऊन समोरील वाहन दिसत नाही. यामुळे अपघातांची समस्या गंभीर बनत आहे. मात्र, रात्रीच्या वेळी अपघाताची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

तातपुरता बनविलेला रस्ता उत्तम दर्जाचा नाही, फक्त प्रवासी वर्गांची समजूत काढावी या दृष्टिकोनातून निर्माण करण्यात आला आहे. काही ठिकाणी चढण, तर काही ठिकाणी तीव्र उतरण त्यांचबरोबर खाच खड्डे असा मार्ग तयार करून दिल्यामुळे या मार्गावर नित्यनेमाने प्रवास करणारे कामगार, शेतकरी, वयोवृद्ध, तसेच आजारी व्यक्तींना यांचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

मागील दोन आठवड्यापासून या ठिकाणी या रस्त्यांचे काँक्रिटीकरण सुरु आहे. यामुळे अनेकांना या पर्यायी मार्गांचा वापर करून धुळीचा सामना करावा लागत आहे. या ठिकाणी वाहन जात असताना धूळ मोठ्या प्रमाणात उडत असल्यामुळे या मार्गावरून प्रवास करू की नये? असा प्रश्न सध्या निर्माण होत आहे. मात्र, दुसरा पर्याय नसल्यामुळे याच मार्गाचा अवलंब केला जातो. परिणामी उत्तम रस्ते पूर्ण झाल्याशिवाय पर्याय नसल्याने याच मार्गावरून प्रवास केला जात असल्यामुळे अपघाताची दाट शक्यता प्रवासीवर्गाकडून वर्तवली जात आहे.

नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर आरटीओची कारवाई

जेएसडब्ल्यू व्यवस्थापनालाही नोटीस

। नागोठणे । वार्ताहर ।

डोलवी (ता. पेण) येथील जेएसडब्ल्यू कंपनी ते जेएसडब्ल्यू कंपनीच्या साळाव येथील प्लांटमध्ये कच्चा लोखंड असलेल्या खडीची (गोटी) डंपरमधून नागोठणे, भिसे खिंड, रोहामार्गे साळाव अशी वाहतूक करण्यात येत आहे. साळाव येथे प्रक्रिया करुन ही खडी डोलवी येथे आणण्यात येत आहे. मात्र, डंपर व ट्रक चालक नियमबाह्य वाहतूक करीत असल्याचे कृषीवलने निदर्शनास आणताच पेण येथील उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी या वाहनांवर कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसारच तपासणीदरम्यान आढळलेल्या ताडपत्रीशिवाय वाहतूक

करणाऱ्या एका वाहनावर दंडात्मक कारवाई करण्यात आल्याची माहिती उपप्रादेशिक परिवहन अधिकारी महेश देवकाते यांनी दिली.

उपलब्ध माहितीनुसार अलिबागमार्गे रेवदंडा ते साळावदरम्यान असलेला सागरी पूल दुरुस्तीसाठी जड वाहनांना बंद करण्यात आला असल्याने नागोठणे, रोहामार्गे साळाव या मार्गाचा उपयोग तात्पुरत्या कालावधीसाठी सदर वाहनांकडून करण्यात येत आहे. मात्र, असे असले तरी नियम धाब्यवर बसवून हे वाहनचालक माल वाहतूक करीत असल्याच्या बातम्या व तक्रारी पेणच्या उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांकडे करण्यात आल्या होत्या. त्याची दखल घेत उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पेण यांच्या आदेशानुसार रविवार, दि. १० मे रोजी इंडो एनर्जी जेट्टी-नागोठणे-रोहा-साळाव या मार्गाने जेएसडब्ल्यू कंपनीसाठी कच्च्या लोखंडी गोळ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान बहुतेक गाड्या ताडपत्र्यांचा वापर करत असल्याचे दिसून आले असले तरी इतर बाबतीतही नियम मोडणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यात येईल, असेही महेश देवकाते यांनी स्पष्ट केले.

तसेच जेएसडब्ल्यू कंपनी, साळाव येथील व्यवस्थापनास उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून काढण्यात आलेली नोटीस बजावण्यात आली आहे. तेथील कंपनीच्या संबंधित अधिकाऱ्यांना परिस्थितीचे गांभीर्य लक्षात आणून दिले. त्यांनी यावर ते करीत असलेल्या उपाययोजना व प्रयत्न सांगितले आहेत. तसेच संबंधित वाहतूकदारांशी यासंदर्भात समज देण्याचे आश्वासन दिले असल्याची माहितीही महेश देवकाते यांनी दिली.

सुधागडात बिबट्याची दहशत

ग्रामस्थ भयभीत; गुरे व कुत्र्याची शिकार, वनविभागाचे खबरदारीचे आवाहन

। सुधागड-पाली । वार्ताहर ।

सुधागड तालुक्यातील माणगाव बुद्रुक गावात बिबट्याची दहशत निर्माण झाली आहे. मंगळवारी (दि.७) व बुधवारी (दि.८) रात्री गावात बिबट्या शिरल्याचे काही ग्रामस्थांनी पाहिले आहे. परिणामी, ग्रामस्थ भयभीत असून, या बिबट्याने एका कुत्र्याची शिकारदेखील केली आहे. याआधी काही दिवसांपूर्वी तालुक्यातील माणगाव बुद्रुक परिसरातील पावसाळावाडी व उंबरवाडी गावातील गुरांना बिबट्याने ठार मारल्याच्या घटना समोर आल्या आहेत.

या संदर्भात गुरुवारी (ता.९) वन विभागाचे वनक्षेत्रपाल विकास तरसे व कर्मचाऱ्यांनी गावाला भेट देऊन ग्रामस्थांना खबरदारीचे आवाहन केले आहे. वनक्षेत्रपाल विकास तरसे यांनी सांगितले की, गावात बिबट्या येत असल्याबाबत शहानिशा केली जाईल. त्यासाठी बिबट्याच्या पायांचे ठसे, त्याने केलेली शिकार आदी पुरावे शोधले जातील. मात्र, तोपर्यंत गावकऱ्यांनी सतर्क राहावे. रात्री घराबाहेर पडू नये.

माणगाव बुद्रुक गावाच्या आजूबाजूला डोंगर व जंगल आहे. जंगलात पाण्याची व अन्नाची कमतरता असल्याने बिबट्या भक्ष्य व पाण्याच्या शोधात गावात येण्याची शक्यता आहे. गावातील भटके कुत्रे हे बिबट्याचे सोपे शिकार असल्याने कुत्र्यांच्या शिकारीसाठी गावात बिबट्या येण्याची शक्यता वर्तवण्यात आली असून, त्यामुळे ग्रामस्थ भयभीत झाले आहेत.

> गावकऱ्यांना लागलीच भेटून खबरदारीचे आवाहन करण्यात आले आहे. बिबट्यापासून संरक्षण कसे करावे व सुरक्षित कसे राहावे यासंदर्भात गावात पोस्टर लावण्यात येतील. गावात बिबट्या येत असल्याचे पुरावे शोधण्यासाठी ट्रॅप कॅमेरेदेखील लावण्यात येतील. त्यानंतर योग्य ती उपाययोजना वनविभागातर्फे केली जाईल.
>
> – विकास तरसे, वनक्षेत्रपाल, सुधागड-पाली

> मागील दोन दिवसांपासून गावात बिबट्याचा वावर असल्याचे काही ग्रामस्थांनी पाहिले आहे. त्यामुळे येथील ग्रामस्थ भयभीत आहेत. यासंदर्भात वनविभागाला माहिती देण्यात आली आहे आणि त्यानुसार वन विभाग अधिकारी व कर्मचाऱ्यांनी गावाला भेट दिली. यासंदर्भात योग्य ती उपायोजना करण्यात यावी.
>
> – रक्षक वाघमारे, ग्रामस्थ

खरिपासाठी युरियाचा तातडीने पुरवठा व्हावा

। तळा । वार्ताहर ।

यावर्षी पाऊस भरपूर प्रमाणात होण्याचा अंदाज वर्तविण्यात आल्याने तालुक्यात शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणावर खरीप पिकांची पेरणी व लागवड होणार आहे. त्यामुळे खरीप पिकांसाठी आवश्यक असलेल्या युरिया खतांचा तातडीने पुरवठा करण्यात यावा, अशी मागणी तळा तालुका शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

तळा तालुका शेतकरी संघटनेचे सचिव कैलास पायगुडे यांनी तालुका कृषी अधिकारी यांची भेट घेऊन तालुक्यासाठी मे महिनाअखेर युरियाचा पुरवठा होणे आवश्यक असून, याबाबतीत किती टन युरिया लागणार आहे त्याचे नियोजन तातडीने करावे याबाबतीत चर्चा केली.

केंद्र सरकारने खतांच्या किमती वाढविल्या आहेत. त्यामुळे शेतकरी अडचणीत आले आहेत. तालुक्यात युरिया खताची जादा दराने विक्री होत आहे.

पान १ वरुन

चौथ्या टप्प्यातील आज मतदान

दरम्यान, महाराष्ट्रात मावळमध्ये संजोग वाघेरे-पाटील (ठाकरे गट) विरुद्ध श्रीरंग बारणे (शिंदे गट), बीडमध्ये बजरंग सोनावणे (शरद पवार गट) विरुद्ध पंकजा मुंडे (भाजप), शिरुरमध्ये अमोल कोल्हे (शरद पवार गट) विरुद्ध शिवाजीराव आढळराव (अजित पवार गट), छत्रपती संभाजीनगरमध्ये चंद्रकांत खैरे (शिवसेना ठाकरे गट), संदिपान भुमरे (शिंदे गट) आणि इम्तियाज जलील (एआयएमआयएम) यांच्यात तिरंगी लढत, जालनामध्ये कल्याण काळे (काँग्रेस) विरुद्ध रावसाहेब दानवे (भाजप), नगरमध्ये निलेश लंके (शरद पवार गट) विरुद्ध सुजय विखे-पाटील (भाजप), शिर्डीमध्ये भाऊसाहेब वाघचौरे (ठाकरे गट), सदाशिव लोखंडे (शिंदे गट), उत्कर्षा रुपवते (वंचित बहुजन आघाडी) यांच्यात तिरंगी लढत, तर रावेर मतदारसंघात श्रीराम पाटील (शरद पवार गट) विरुद्ध रक्षा खडसे (भाजप), पुण्यामध्ये रवींद्र धंगेकर (काँग्रेस), मुरलीधर मोहोळ (भाजपा) आणि वसंत मोरे (वंचित) यांच्यात तिरंगी लढत, असा सामना पाहायला मिळणार आहे.

प्रशासन सज्ज

मावळ मतदारसंघातील अनेक भागांमध्ये गेल्या महिनाभरापासून प्रचार सभा, रॅली, पथनाट्य, सभा घेण्यात आल्या. सभा, रॅलीच्या माध्यमातून वेगवेगळ्या राजकीय पक्षातील उमेदवारांनी मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. गेल्या अनेक दिवसांपासून प्रचाराच्या माध्यमातून राजकीय वातावरण तापले होते. प्रशासकीय यंत्रणादेखील कामाला लागली होती. अखेर शनिवारी (दि. ११) सायंकाळी पाचनंतर प्रचार थांबला. आता सोमवारी (दि.१३) मतदान असणार आहे. ही मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडण्याबरोबरच कामकाज योग्य पद्धतीने व्हावे यासाठी जिल्हा प्रशासनासह पोलीस प्रशासनाने कंबर कसली आहे. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण घेण्यात आहे. त्यामुळे मावळ मतदारसंघात प्रशासन मतदान प्रक्रियेसाठी सज्ज असल्याचे दिसून येत आहे.

मतदान केंद्रावर राहणार नजर

मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासनासह पोलीस प्रशासनदेखील कामाला लागले आहे. रविवारी सकाळपासून कर्मचारी केंद्रांवर रवाना झाले आहेत. प्रत्येक मतदान केंद्रामध्ये केंद्राध्यक्षांसह शिपायापर्यंत सहा कर्मचारी असे एकूण ११ हजार ३६८ अधिकारी, कर्मचारी असणार आहेत. १३ लाख ४९ हजार १८४ पुरुष व १२ लाख ३५ हजार ६६१ महिला तसेच तृतीयपंथी १७३ मतदार मतदान करणार आहेत. उन्हाच्या वाढत्या तडाख्यामुळे मतदानाच्यावेळी मतदारांच्या आरोग्यावर परिणाम होऊ नये यासाठी मंडप व्यवस्था केली आहे. केंद्रावर आरोग्य कर्मचारीदेखील नेमण्यात आले आहेत. त्यांच्यासोबत प्रथमोपचार कीट देण्यात आले आहेत.

मतदान केंद्रावर सोयी सुविधा

प्रत्येक मतदान केंद्रावर वैद्यकीय सुविधा देण्यासाठी डॉक्टरांची नियुक्ती केली आहे. पिण्याचे पाणी, व्हीलचेअर, प्रतीक्षा कक्ष, वेब कास्टींगद्वारे ५० टक्के मतदान केंद्र जोडण्यात आली आहेत. यावर बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी आकुर्डी येथील निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात सात नियंत्रण कक्ष स्थापित केले आहेत.त्यासाठी दोन उपजिल्हाधिकाऱ्यांची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्त केले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी दिपक सिंगला यांनी दिली.

घर कोसळले; तिघे जखमी

पाथरज ग्रामपंचायतीमधील मोरे वाडी येथे आदिवासी शेतकऱ्याच्या घराचे मोठे नुकसान केले. त्या वाडीमधील आदिवासी शेतकरी किसन भाऊ केवारी यांच्या सात वर्षांपूर्वी बांधलेली विटा मातीच्या घरावरील पत्रे उडून बाजूच्या शेतकऱ्याच्या घरावर गेल्याने त्या शेतकऱ्याचे घराचेदेखील नुकसान झाले. मात्र, किसन केवारी यांच्या घरावरील छपर उडून गेल्यावर त्यांच्या घराच्या भिंती अर्धवट कोसळल्या आणि अपघात झाला. किसन केवारी यांच्या घरामध्ये त्यावेळी त्यांच्या सूनबाई आणि दोन लहान मुले होती. घराची भिंत थेट गीता जगदीश केवारी यांच्या अंगावर कोसळली असून, त्या अपघातात गीता या जखमी झाल्या आहेत. तर त्यांची दोन लहान मुले घरात खेळत होती आणि त्यांच्या अंगावर त्या कोसळणाऱ्या भिंतींच्या विटा पडल्या. त्यामुळे तीन वर्षांचा तन्मय जगदीश केवारी आणि दोन वर्षाचा अंश जगदीश केवारी हेदेखील जखमी झाले आहेत. त्या सर्वांना मोरेवाडी ग्रामस्थ प्रकाश केवारी आणि अन्य ग्रामस्थांनी जखमी अवस्थेत कशेळे येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी खासगी वाहनातून नेले. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

शेतीचे नुकसान

पोलादपूर शहरातील मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गालगत शनिवारी सायंकाळी उठलेल्या अवकाळी पावसाने परिसराला झोडपून काढले. एसटी स्थानक परिसर, पेट्रोल पंप, अंडरपास महामार्गावरील पाच ब्रिजेस, अंडरपास महामार्ग या ठिकाणी अवकाळीच्या झडपा दिसून आल्या.

ग्रामीण भागामध्ये शेतकऱ्यांचे आंबा बागायती पीक उतरविण्यात येण्यापूर्वीच अवकाळीने दोन आठवड्यात सलग झोड उठविल्याने नुकसान झाले आहे. तालुक्यामध्ये आंबापीक घेणाऱ्या बागायतदार शेतकऱ्यांचे १० ते ५०० कलमी आंबा पीकदेखील या अवकाळीने धोक्यात आणले आहे. एक पिकलेले आंबा फळ गळून पडल्याखेरीज आंब्याची पेटी पिकविण्यासाठी आढी न लावलेल्या शेतकऱ्यांना या अवकाळीने मोठ्या प्रमाणात नुकसान पोहोचविले आहे.

पोलादपूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी आत्तापर्यंत वाशी एपीएमसी बाजारपेठेमध्ये करवंद, जांभुळ, फणसांची निर्यात केली असून, या निर्यातीचे १५ दिवस अजून शिल्लक असताना गेल्या आठवड्यात आणि या शनिवारी सायंकाळी झालेल्या अवकाळीने व्यापाऱ्यांनाही नुकसान पोहोचविले आहे. दरम्यान, सोमवारपासून पोलादपूर तालुक्यात पुन्हा प्रशासन व यंत्रणा सेवेत रूजू झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनातून कार्यवाही करण्याची गरज निर्माण झाली आहे.

अलिबाग, पेणला चक्री जुगाराचा विळखा

चोरीचे गुन्हेदेखील होत आहेत.

चक्री जुगाराला बंदी असतानाही हे धंदे बिनधास्तपणे चालविले जात आहेत. कारवाई करण्यास गेलेल्या पोलिसांना सत्ताधाऱ्यांकडून फोन आल्यावर माझा धंदा आहे, असे सांगितले जाते. त्यामुळे अनेक पोलिसांना कारवाई न करता परत माघारी फिरावे लागत आहे, अशी चर्चा पोलिसांकडून ऐकावयास मिळत आहे. काही पोलिसांनी कारवाई केल्यावर त्यांना अन्य ठिकाणी बदली करून शिक्षा देण्याचा प्रकारदेखील जिल्ह्यात घडत आहे. चक्री जुगारामुळे आर्थिक हानी मोठ्या प्रमाणात होत असून, कुटुंबं उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे याकडे पोलीस अधीक्षक घार्गे यांनी गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी केली जात आहे.

मतदानावर बहिष्कार

केले होते. अधिकारीवर्गाकडून उडवाउडवीची उत्तरे मिळाली होती. अर्ज, दाखले भरण्याचे काम आमचे आहे का, याबाबत अमोघ कुळकर्णी यांनी अधिकाऱ्यांची नक्की जबाबदारी काय आहे हे त्यांनी स्पष्ट करावे, अशी मागणी केली होती.

२४ मार्चला बहिष्कार टाकण्यासंबंधी नगरपरिषद मुख्याधिकारी वैभव गारवे, तहसीलदार डॉ. शीतल रसाळ, उपविभागीय अधिकारी अजित नैराळे यांना निवेदन देण्यात आले होते. त्यानंतर १ एप्रिल रोजी तहसीलदार आणि मुख्याधिकारी, अभियंता यांनी वाडीला भेट दिली. त्यावेळी निवडणूक होण्याआधी वाडीतील लोकांचे काम त्वरित करून दिले जाईल, असे आश्वासन दिले होते. मात्र, महिना उलटून गेला, आता मे महिना सुरू झाला. मतदान करण्याची वेळ आली तरी अधिकारी वर्गाने काम करून दिले नसल्याने आदिवासी बांधवांनी आक्रमक पवित्रा घेत उद्याच्या मतदानावर बहिष्कार टाकला आहे.

ॲड. प्रवीण ठाकूर इच्छुक

माध्यमातून ही उमेदवारी काँग्रेस पक्षाला मिळावी, असेही त्यांनी म्हटले आहे. ॲड. प्रवीण ठाकूर यांनी आपला असलेला जनसंपर्क, वकिली व्यवसायात ३० वर्षांहून अधिक काळ सक्रीयता, शिवाय वडील स्व. मधुकर ठाकूर हे काँगेसचे येथील आमदार होते, हेदेखील नमूद केले आहे.

वाघेरे पाटलांना उरणकरांची पसंती

जेएनपीटी बंदर खासगीकरण होऊ देणार नाही, अशी वल्गना खासदार बारणे यांनी केली होती. ती वल्गना हवेत उडून जेएनपीटीचे खासगीकरण सुरू झाले आहे. डीपी वर्ल्डच्या एनएसआयटी टर्मिनलमध्ये स्थानिकांना न घेता परप्रांतियांची भरती सुरू आहे. जेएनपीटीबरोबर इतर कंपन्याही खासगीकरणाच्या मार्गावर असल्याचे समजते. याबाबत खासदार महाशय बोलण्यास तयार नाहीत. तसेच जेएनपीटी सेझमध्ये दोन लाख नोकऱ्या देऊ, साडेबारा टक्के, सीएसआर फंड, हॉस्पिटल, मैदान, सेफ्टी झोन, विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी सोय नाही, अशा अनेक समस्या गेली अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत. याकडे खासदार बारणे यांना लक्ष देण्यास वेळ नाही. मात्र, जेएनपीटी बंदरातील कोट्यवधी रुपयांचा पार्किंगचा ठेका गेली अनेक वर्षांपासून त्यांच्याकडे आहे. याबाबत विरोधकांनी वारंवार आरोप करूनही यावर खासदार बोलण्यास तयार नाहीत. तसेच जनतेचा विकास होण्याऐवजी त्यांचा विकास म्हणजे मालमत्ता दुपटीने वाढली असल्याचे दिसत असल्याने नक्की कोणाचा विकास झाला, असा आरोप उरणचे मतदार करीत आहेत.

उरणच्या मतदारांना आता बदल हवा आहे. तसेच बारणे यांच्यावरील नाराजीमुळे उद्धव ठाकरे महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे यांना उरणकरांची पसंती मिळत असल्याने त्यांचे पारडे जड दिसत आहे.

विमानतळास दिबांचे नाव कधी?

दरम्यान, मावळ लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात लोकनेते दि.बा. पाटील यांच्या नावाचा वापर करून मतदारांना आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न सत्ताधाऱ्यांकडून झाला. मुख्यमंत्री शिंदे सरकारने ठराव घेऊन आज कित्येक महिने उलटूनही पुढील कोणतीच सोपस्कार झालेले दिसत नाही. मतदानासाठी काही तासांचा अवधी उरला आहे. निवडणूक झाल्यावर निवडून येणारा उमेदवार अथवा त्यांचे पक्ष यासाठी कशावरून पाठपुरावा करतील, अशी चर्चा दबक्या आवाजात उरणच्या मतदारात सुरू आहे.

रायगडातील किनारे गजबजले

रायगड जिल्ह्यातील समुद्रकिनारे तसेच येथील मंदिरे, ऐतिहासिक वास्तू, किल्ले, तीर्थक्षेत्रे पर्यटकांच्या कायमच पसंतीस उतरली आहेत. यंदादेखील पर्यटकांनी उन्हाळी सुट्टीचा आनंद घालविण्यासाठी जिल्ह्याला पसंती दिली आहे. शाळा, महाविद्यालयांना सुट्टी पडली आहे. त्यात शनिवार व रविवार साप्ताहिक सुट्टी आहे. त्यामुळे मुंबई, पुणे, ठाणे जिल्ह्यासह इतर राज्य, देश-विदेशातील पर्यटक जिल्ह्यात येऊ लागले आहेत. शनिवार व रविवारी सुट्टी असल्याने काही पर्यटक शुक्रवारी सायंकाळी, तर काही पर्यटक शनिवारी सकाळी जिल्ह्यात आले. अलिबागसह नागाव, वरसोली, काशीद, मुरूडसारख्या अनेक समुद्रकिनाऱ्यांमध्ये जाऊन पाण्यात पोहण्याचा आनंद त्यांनी लुटला. काही पर्यटक बनाना राईड्स, तर काही पर्यटकांनी बोटींमधून प्रवास करीत समुद्र सफरीचा आनंद घेतला. काही पर्यटकांनी समुद्रकिनारी असलेले सायकल, उंटावरील सवारी घेत मौजमजा केली. काही जण आपल्या मित्रांसमवेत, तर काही कुटुंबियांसमवेत समुद्रकिनारी फिरण्यास आल्याचे दिसून आले. यामध्ये तरुण पर्यटकांचा अधिक उत्साह असल्याचे दिसून आले. यामुळे पर्यटनावरुन अवलंबून असलेले हॉटेल व लॉज व्यावसायिक, खानावळी, दुकानदार यांची सध्या खूप चलती आहे.

शिक्षण विभागाचा नवा आदेश

२०१३मध्ये तसेच महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ मध्ये ९ फेब्रुवारी २०२४ रोजी काढलेल्या अधिसूचनेद्वारे सुधारणा करण्यात आली. पण, काहींनी उच्च न्यायालयात धाव घेतल्याने शासनाने पुन्हा प्रवेश प्रक्रियेत बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. सुधारित आदेशानुसार 'आरटीई' प्रवेशाच्या पोर्टलमध्ये बदल करावा लागणार आहे. शिक्षण खात्याने 'एनआयसी'ला तशा सूचना केल्या असून, त्यासाठी किमान तीन दिवस लागणार आहेत. त्यामुळे नवीन आदेशानुसार शुक्रवारपासून (ता. १७) 'आरटीई' प्रवेशाला सुरुवात होणार आहे.

क्षणचित्र

कालव्याजवळ गुरांचा ठिय्या

सुतारवाडी : चिंचवलीनजीक कालव्याच्या दुतर्फा उनाड गुरांचा रात्रंदिवस संचार असतो. यामुळे वाहनांना मार्ग काढताना मोठी कसरत करावी लागत आहे. सध्या सुट्टीच्या हंगाम आणि कंपन्याचा कच्चामाल नेण्यासाठी अनेक वाहने येथून ये-जा करीत असतात. या वाहनांना मार्ग काढताना मोठी कसरत करावी लागत आहे. रात्री ही गुरे रस्त्याच्या मधोमध विश्रांती घेत असतात. अशावेळी वाहन चालकाला गुरे न दिसल्यामुळे अपघात होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही.

चार लाखांच्या दागिन्यांची चोरी

पनवेल : रेल्वेने प्रवास करून ऑनलाईन गाडी बुक करून घरी गेल्यानंतर बॅग नसल्याचे लक्षात आले आणि त्यातील ४ लाखांच्या दागिन्यांची चोरी करण्यात आली. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. विघ्नेश नायडू हे कुटुंबासह मदुराई येथे फिरण्यासाठी गेले होते. मुंबईला परत येताना त्यांची गाडी सीएसएमटी येथे पोहोचली. त्यानंतर घरी येण्यासाठी दोन ओला बुक केल्या. रात्री ते राहत्या घरी खारघर येथे पोचले. त्यावेळी त्यांची एक बॅग चोरून नेल्याचे त्यांच्या लक्षात आले.

इमारतीवरून पडल्याने मृत्यू

पनवेल : इमारतीवरून खाली पडून ऐका अनोळखी व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली.करंजाडे सेक्टर एक येथील प्लॉट नंबर ३२१, निर्माणधीन ईमारतीच्या समोर मोकळ्या जागेत वरचे ओवळे, पुष्पक नोड, सेक्टर एक पनवेल येथे अंदाजे ३० ते ३५ वर्षीय इसम निर्माणधीन इमारतीवरून खाली पडून जखमी बेशुद्ध अवस्थेत मिळून आला. त्याला उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.

साई येथून विवाहिता बेपत्ता

पनवेल : पनवेल तालुक्यातील साई गाव येथून एक विवाहिता बेपत्ता झाल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अंजली म्हात्रे (४३) असे या महिलेचे नाव असून उंची ५ फुट, रंग गोरा, केस लांब व काळे, डोळे काळे, बांधा मध्यम असून अंगात हिरव्या रंगाची साडी व पायात पैंजण घातलेले आहे. तसेच तिला मराठी, हिंदी भाषा अवगत आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे संपर्क साधावा.

महिलेने केली आत्महत्या

पनवेल : पतीने वारंवार केलेल्या छळ्वणुकीमुळे खारघर वसाहतीमधील एका ३१ वर्षीय महिलेने आत्महत्येचे टोकाचे पाऊल उचलले आहे. याबाबत मृत महिलेच्या भावाने तक्रार दिल्यावर आठ दिवसांनी खारघर पोलीसांनी पतीविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याबद्दल गुन्हा नोंदविला आहे. खारघर वसाहतीमधील सेक्टर ३५ मधील इनोव्हेटीव्ह हाईट्स या इमारतीमध्ये ११०२ क्रमांकाच्या सदनिकेत अर्चना व अमोध सिंग हे दाम्पत्य राहत होते. ३ मे रोजी अर्चनाने घरात गळफास घेऊन आत्महत्या केली.

रायगडकर अनुभवणार शून्य सावली

१४ मे रोजी अलिबाग तर १५ मे रोजी कर्जत आणि माथेरानकरांना पर्वणी

। रायगड । प्रतिनिधी ।

कुतूहल लागून असलेला शून्य सावली दिवस रायगड जिल्ह्यात अलिबाग येथे १४ मे , कर्जत , माथेरान १५ मे अनुभवता येणार आहे. आपल्या सोबत वर्षभर राहणारी सावली या दिवशी काही मिनिटासाठी आपली साथ सोडून जाणार आहे. भौगोलिक आणि वैज्ञानिक दृष्ट्या हे दिवस महत्त्वाचे असून, विद्यार्थी व नागरिकांनी भौगोलिक घटनांचा अभ्यास, निरीक्षण करावे, असे आवाहन खगोल अभ्यासकांनी केले आहे.

सूर्याचा उत्तरायण आणि दक्षिणायन असा भासमान मार्ग पृथ्वीच्या २३.५० दक्षिण आणि उत्तरेकडे असतो. कर्कवृत्त आणि मकरवृत्त या दरम्यान असणाऱ्या सर्व भूभागावर सूर्य वर्षातून दोनदा दुपारी डोक्यावर येतो आणि दोनदा शुन्य सावली दिवस येतात. उत्तरायण आणि दक्षिणायन होताना ही स्थिती राहते. सूर्य दररोज ०.५० सरकतो. सूर्य क्रांती पृथ्वीवरील स्थळाशी समान कोन करते, तेव्हा सूर्य माध्यान्हाचे वेळी नेमका डोक्यावर आल्याने आपली सावली काही क्षणासाठी नाहीशी होते. उन्हाळ्यातील त्या शून्य सावली दिवसाला अधिक महत्त्व आहे. या कालावधीत या अनोख्या घटनेचा प्रारंभ दक्षिणेकडून उत्तरेकडे संबंधित शहराच्या जवळच्या भागात दुपारी १२ ते १२.३० या वेळेत घेता येईल. ही वेळ पूर्वेस कमी व पश्चिमेस वाढलेली असणार आहे.

अंदमान-निकोबार बेटावर इंदिरा पॉईंट येथे ६ एप्रिल आणि ५ सप्टेंबर रोजी दुपारी सूर्य अगदी डोक्यावर येतो आणि शून्य सावली अनुभवता येतो. १० एप्रिल आणि १ सप्टेंबर रोजी कन्याकुमारी येथे शून्य सावली दिवस असतो.दक्षिण भारतात तेलंगणा येथे २ मेपर्यंत विविध अक्षवृत्तांवर असलेल्या शहरात शून्य सावली दिवस पाहता येतो. शेवटी भोपाळजवळ १८ जून रोजी शून्य सावली दिवस पाहता येतो.लगेच दक्षिणायन सुरू होताच पुन्हा भोपाळ ते अंदमानपर्यंत पुन्हा पावसाळ्यात शून्य सावली दिवस येतात. परंतु ढग आणि पाऊस असल्याने हे दिवस अनुभवता येत नाहीत.

कसे कराल निरीक्षण

दुपारी १२ ते १२.३५ या वेळेदरम्यान सूर्य निरीक्षण करावे.समूहासाठी उपक्रम करायचा असेल तर मोकळ्या जागी आणि कौटुंबिक निरीक्षण करायचे असेल तर घराच्या छतावर किंवा अंगणात केले तरी चालेल. साहित्य – दोन, तीन इंच व्यासाचा, एक दोन फूट उंचीचा पोकळ प्लास्टिक पाईप, कोणतीही उभी वस्तू ठेवावी किंवा स्वता उन्हात सरळ उभे रहावे. सूर्य अगदी डोक्यावर आला की सावली दिसत नाही. सावलीने थोडा वेळ का होईना साथ सोडलेली असेल. हे प्रत्यक्षदर्शी पाहता येणार आहे.

शून्य सावली दिवस

१३ – पुणे, मुळशी, दौंड, लातूर, लवासा, १४ – लोणावळा, अलिबाग, दाभाडे, पिंपरी-चिंचवड, देहू, जामखेड, आंबेजोगाई, १५ – मुंबई , नवी मुंबई, कर्जत, बीड, माथेरान, राळेगण सिद्दी, सिरोंचा, १६ – बोरिवली, ठाणे, डोंबिवली, कल्याण, भिवंडी, बदलापूर, नारायण गाव, खोडद, अहमदनगर, परभणी, नांदेड, निर्मल, १७ – नालासोपारा, विरार,आसनगाव, अहेरी, आल्लापल्ली, १८ – पालघर, कसारा, संगमनेर, अंबाड, हिंगोली, मूलचेरा, १९ – छत्रपती संभाजी नगर, डहाणू, नाशिक, कोपरगाव, वैजापूर, जालना, पुसद, बल्लारशा, चामोर्शी, २० – चंद्रपुर, मेहकर, वाशीम, वणी, मूल, २१ – मनमाड, चिखली, गडचिरोली, सिंदेवाही, रोहना, २२ – मालेगाव, चाळीसगाव, बुलढाणा, खोपोली, यवतमाळ, आरमोरी, २३ – खामगाव, अकोला, देसाईगंज, ब्रम्हपुरी, नागभीड – धुळे, जामनेर, शेगाव, वर्धा, उमरेड, दर्यापूर, २५ – जळगाव, भुसावळ, अमरावती, अंमळनेर, तेल्हारा, २६ – नागपूर, भंडारा, परतवाडा, चोपडा – नंदुरबार, शिरपुर, बुऱ्हाणपूर, परतवाडा, चिखलदरा, तुमसर, गोंदिया, सावनेर, काटोल, रामटेक – अक्कलकुआ, शहादा, पांढुरणा, वरुड, नरखेड – बोराड, नर्मदा नगर, ३० – धाडगाव, ३१ – तोरणमाळ

वाढत्या उकाड्याने रोहेकर हैराण

ज्यूस, ताक, लस्सी आदी शीतपेयांची मागणी

। रोहा । वार्ताहर ।

दिवसेंदिवस तापमानात वाढ होत असल्याने रोहेकर हैराण झाले आहेत. तापमानाचा पारा ४० अंशापेक्षा जास्त गेला असल्यामुळे वाढत्या उष्णतेमुळे शीतपेयांना मागणी वाढली आहे. रोहा तालुक्यासह संपूर्ण रायगड जिल्ह्यात दिवसेंदिवस उष्णतेचे प्रमाण वाढत आहे. यामुळे वाढत्या तापमानामुळे नागरिक हैराण झाले आहेत. यामुळे शरीराचा दाह कमी करण्यासाठी शीतपेय, ज्यूस, ताक, लस्सी याकडे नागरिकांचा कल वाढताना दिसून येत आहे. उष्णतेचा पारा ४० अंशाच्या वर गेल्याने सकाळी दहा वाजल्यापासून उन्हाचे चटके बसू लागले आहेत. भरमसाठ वृक्षतोड व दिवसेंदिवस लावले जाणारे वणवे यामुळे वनसंपदा नष्ट होत असल्यामुळे परिसर व रस्ते आग ओकत आहेत. वाढते प्रदूषण व सतत होणाऱ्या पर्यावरणाच्या ऱ्हासाने जंगले ओस पडू लागली आहेत. त्यामुळे गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न भेडसावू लागला आहे. शहरात कुलर खरेदीच्या संख्येत वाढ झाली आहे. तसेच रसाळ फळांना मागणी वाढली आहे. उष्यापासून बचाव होण्यासाठी अनेकजण सकाळी अकराच्या आतमध्ये आपापली कामे आटोपून घेत आहेत. दुपारी मार्केट परिसर ओस पडू लागले आहेत. संध्याकाळी नागरिक घराबाहेर पडू लागले आहेत. येथील विहिरीमध्ये दुपारी उष्म्यापासून बचावासाठी अनेकजण पोहण्याचा आनंद घेताना दिसून येत आहेत.



संभाजी महाराज जयंतीचे आयोजन

। चिरनेर । वार्ताहर ।

उरण तालुक्यातील चिरनेर गावातील कातळपाडा येथील दत्त मंदिराच्या प्रांगणात छावा प्रतिष्ठानतर्फे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचा जयंती उत्सव सोहळा मंगळवारी १४ मे रोजी ऐतिहासिक वातावरणात साजरा करण्यात येणार असल्याची माहिती, छावा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष ॲड. सुभाष कडू यांनी दिली.

सध्या या सोहळ्याची जोरदार तयारी सुरू असून, छावा प्रतिष्ठानचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते पूर्व तयारीच्या दृष्टीने कामाला लागले आहेत. यात प्रामुख्याने छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन ज्येष्ठ कार्यकर्ते मारुती रेवसकर यांच्या हस्ते करण्यात येईल. यावेळी जन्म सोहळ्याचे पाळणा गीत सादर करण्यात येईल.

याप्रसंगी आयोजित करण्यात आलेल्या सत्यनारायणाच्या महापूजेचा मान सरिता योगेश खारपाटील यांना देण्यात आला आहे. छत्रपती संभाजी महाराजांची पालखी मिरवणूक हे या सोहळ्याचे आकर्षण असणार आहे.

या पालखी मिरवणुकीत शिवप्रेमींबरोबर ग्रामस्थ तसेच हभप गणपत महाराज, हभप हासूराम बाबा महाराज यांच्या अध्यात्मिक पौर्णिमा मंडळाचे वारकरी, माऊली हॉर्स फार्मचे प्रशांत घरत सहभागी होणार आहेत. यावेळी महिला लेझीम पथकाची झलक पाहायला मिळणार आहे. सायंकाळी सात वाजता महाप्रसादाचे वाटप करण्यात येईल. या महाप्रसादासाठी अन्नदाते तेजस डाकी यांचे सौजन्य लाभले आहे. रात्री नऊ वाजता बळवली येथील हभप अमित महाराज यांचे कीर्तन होईल. या सोहळ्याला मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

अवघे माथेरान झाले शिवमय

। माथेरान । वार्ताहर ।

अक्षय्य तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर माथेरान शहरामध्ये पारंपारिक पद्धतीने ढोल ताशांच्या गजरात शिवजयंती उत्सव आनंदात आणि उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. जय भवानी, जय शिवाजीचा अखंड जयघोष आणि शोभा यात्रेचा उत्साह अश्या चैतन्यमय वातावरणात युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांचा पारंपरिक शिवजयंती उत्सव शहरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी प्रतिमा पूजन,ढोल ताशांचा गजर,चित्तथरारक मर्दानी खेळ व स्थानिक महिलांचे लेझीम पथक अशा विविध उपक्रमांमुळे वातावरण शिवमय झाले होते.

समस्त माथेरानवासीयांच्या उपस्थितीत भव्यदिव्य अशी शिवप्रतिमेची शिवशाही थाटात ढोल ताशांच्या गजरात, फटाक्यांची आतिषबाजी करीत मुख्य बाजार पेठेतून मिरवणूक काढण्यात आली. यामध्ये महिला तलवारबाजी, महिला लेझीम पथक व दांडपट्ट्यांचे प्रात्यक्षिक यावेळी दाखविण्यात आले. माथेराननगरीत असलेल्या पर्यटकसुद्धा या शिवजयंती उत्सवात सामील झाले होते.

गांजाची विक्री करणारा अटकेत

१२०० ग्रॅम वजनाचा गांजा जप्त

। पनवेल । वार्ताहर ।

उरण फाटा येथे गांजा या अमली पदार्थाची विक्री करण्यासाठी आलेल्या व्यक्तीला सीबीडी पोलिसांनी अटक केली आहे. राजु बाबु धोत्रे (४६) असे या व्यक्तिचे नाव असून पोलिसांनी त्याच्याजवळ असलेला १२०० ग्रॅम वजनाचा १८ हजार रुपये किंमतीचा गांजा जप्त केला आहे.

सायन पनवेल मार्गालगत उरण फाटा येथे एक व्यक्ती अमली पदार्थाची विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती सीबीडी पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे व त्यांच्या पथकाने गत सोमवारी रात्री उरण फाटा येथील टी-पॉईटजवळ सापळा लावला होता. सदर ठिकाणी रात्री १०.३० वाजण्याच्या सुमारास राजु बाबु धोत्रे हा सॅक बॅग घेऊन संशयास्पदरित्या आला असता, पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्यानंतर पोलिसांनी त्याच्याजवळ असलेल्या सॅक बॅगची झडती घेतली असता, त्यात १८ हजार रुपये किंमतीचा १२०० ग्रॅम वजनाचा पाने, फुले, काड्या, बिया असलेला उग्र वासाचा गांजा आढळुन आला. त्यामुळे पोलिसांनी त्याच्याकडे गांजाबाबत अधिक चौकशी केली असता, त्याने सदरचा गांजा विक्री करण्यासाठी आणल्याचे सांगितले. त्यानुसार पोलिसांनी त्याच्याविरोधात एनडीपीएस कलमान्वये गुन्हा दाखल करुन त्याला अटक केली. तसेच त्याच्याजवळ असलेला गांजा जप्त केला.

विठाबाई बेलोसे यांचे निधन

रसायनी : विणेगाव पंचक्रोशीतील विठाबाई परशुराम बेलोसे उर्फ सर्वांची माय यांचे निधन झाल्याने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. खालापूर तालुक्यातील विणेगाव येथील सामाजिक कार्यकर्ते निलेश बेलोसे आणि रुपेश बेलोसे यांच्या आजी असलेल्या विठाबाई उर्फ परिसरातील सर्वांची माय म्हणुन त्यांना हाक मारली जायची. कै.कैलास व कै.विलास यांचे अल्पवयीन निधन झाले,तर पती कै.परशुराम यांच्या निधनानंतर त्यांनी आपल्या सुना आणि नातवंचा सांभाळ केला. अतीशय मेहनती, कष्टाळू त्यांचा स्वभाव होता. परिसरातून आलेल्या प्रत्येक माणसाला त्यांनी आपलस करून जमेल तेवढी मदत केली आहे. स्वतःच दुःख असताना दुसऱ्याचे दुखः पुसण्याचे काम त्यांनी केले.त्यांचे अंतिम धार्मिक विधी मंगळवार १४ मे रोजी विणेगाव येथे होणार आहेत.

सांडपाणी व्यवस्थापनाची कामे युद्धपातळीवर

। माथेरान । वार्ताहर।

माथेरानकरांसाठी एक अत्यावश्यक असा मलनि:स्सारण प्रकल्प मार्गी लावला जात असून संबंधीत ठेकेदाराकडून आता नियोजनबद्ध कामे पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले जात असल्यामुळे स्थानिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

सुरुवातीला ठेकेदाराला या गावातील एकंदरीत भौगोलिक परिस्थितीची पूर्ण कल्पना नसल्याने नेमून दिल्याप्रमाणे त्यांनी कामाचा सपाटा सुरू होता. मलनि:स्सारण पाईप लाईन टाकताना अनेक ठिकाणी विद्युत जोडण्या त्याचप्रमाणे पिण्याच्या पाण्याची भूमिगत कनेक्शन आहेत त्या सर्व कनेक्शनला लागून ही मलनि:स्सारण पाईप लाईन टाकण्यात आली होती. त्यामुळे भविष्यात काही बिघाड झाल्यास पुढील खर्चाचा बोजा नगरपरिषदेला सोसावा लागणार होता. याकामी गावाचे हित पाहणाऱ्या भूमिपुत्रांनी निकृष्ठ दर्जाच्या कामावर हरकत घेतली होती.

याबाबत मुख्याधिकारी यांच्या दालनात विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ठेकेदाराने सर्व परिस्थिती जाणून घेतली. एवढेच नव्हे तर ज्या ज्या ठिकाणी रस्त्यांची खोदाई करण्यात आली होती. त्या ठिकाणी जे पेव्हर ब्लॉकचे रस्ते होते. त्यावर पुन्हा ब्लॉक लावू नये, असा काही विघ्नसंतोषी लोकांनी ठेकेदाराला नेहमीप्रमाणे वेठीस धरण्याचा प्रयत्न केल्याचे बोलले जात आहे. माथेरान मध्ये कधी नव्हे एवढा जवळपास पन्नास कोटींपेक्षाही अधिक निधी या मलनि:स्सारण प्रकल्पासाठी मंजूर झाला आहे. याच माध्यमातून गावातील स्वच्छता त्याचप्रमाणे लोकांचे आरोग्य चांगले राहणार आहे. त्यासाठी स्वतः ठेकेदार जातीने लक्ष केंद्रित करत आहेत. त्यामुळे स्थानिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

> एसटीपी ठेकेदारांनी खोदलेल्या रस्त्याची खड्डे प्रेस करून ब्लॉक लावायला घेतले आहेत. याच पद्धतीने जलद गतीने कामे करून घ्यावीत त्यामुळे येणाऱ्या पर्यटन हंगामामध्ये पर्यटकांना व वयोवृद्ध नागरिक, घोडेवाले, रिक्षावाले यांना व्यवस्थित चालायला सोयीस्कर होईल.
>
> राकेश कोकळ
> माजी अध्यक्ष,
> धनगर समाज माथेरान

आदर्श शिक्षक समितीच्या पाठपुराव्याला यश

। खांब । वार्ताहर ।

जिल्ह्यातील वाढत जाणारे तापमान, खंडित होणारा वीजपुरवठा यामुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययन अध्यापन प्रक्रियेमध्ये निर्माण होणारा अडथळा अशा बिकट परिस्थितीत मार्च महिन्यात सकाळ सत्रात भरवणाऱ्या शाळा या १५ मार्च ऐवजी १ मार्च पासून सुरू व्हाव्यात व त्यानिमित्ताने अध्ययन अध्यापन प्रक्रिया अधिक सुसह्य व्हावी या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक समितीच्या कार्यकारीणीने मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भरत बास्टेवाड व शिक्षणाधिकारी पुनिता गुरव यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून समितीच्या पाठपुराव्याला यश प्राप्त झाले आहे.

सकाळ सत्रातील शाळा १५ मार्च ऐवजी १ मार्चपासून सुरू होणार

गेली अनेक वर्षे मार्च महिन्यातील १५ तारखेपासून सुरू होणारी शाळा ही शैक्षणिक वर्षामध्ये १५ तारखेऐवजी १५ दिवस अगोदर म्हणजेच १ मार्चपासून सुरू करण्यात यावी याबाबत प्रशासनाकडे निवेदन देण्यात आले. तसेच संघटनेच्या माध्यमातून त्याचा सातत्याने पाठपुरावा केला गेला. त्यानुसार मागणी मान्य करीत शिक्षणाधिकारी यांनी मार्च महिन्यातील सकाळ -सत्रातील शाळा १ मार्चपासून भरण्याबाबत निर्णय घेतला आहे.

क्लासिफाईड

जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफ ची आवश्यकता आहे. १. वेटर २. रिसेप्शन ३. हॉटेल मॅनेजर २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा-(व्हॉटसॲप वर मेसेज करावा) ८४०८८२९५५५, ७८७५८६६५५५
- विद्यानगर, चेंढरे येथे 2BHK टेरेस फ्लॅट विकणे आहे. क्षेत्र- १२०० Sqft. संपर्क : PROLOAN SOLUTION ९२२१६८०२८४/९७६४१४९१४३
- फर्निचर वर्कशॉपमध्ये कामाला मुले पाहिजेत. १० वी/१२ वी पास/ नापास ८ तास ड्युटी, ठिकाण- बामणसुरे, चोंढी पगार-१०,००० महिना. Contact- ९०४९६५५५२३.
- अलिबाग विभागासाठी सेल्समध्ये जॉब करण्यासाठी सुवर्णसंधी. फिक्स सॅलरी १५०००, २००००, २५००० + सुपर इनसेंटीव तसेच अलिबागमधील विविध शाखांसाठी होम रिव्हाईज एज्युकेशन प्रा.लि. या शैक्षणिक संस्थेत तातडीने पाहिजेत. Educational counsellors /sales executive-20, Team managers- 5, Telcaller- 3, संपर्क- ८४१९९४०००४/९३७२०७१७६९
- 'इंद्रप्रस्थ' गोंधळपाडा येथे महिला व पुरूष सफाई कामगार त्वरित पाहिजेत. कामाची वेळ सकाळी ९.३० ते सायं.६ भेटण्याची वेळ- सकाळी ११ ते सायं.५ ठिकाण-इंद्रप्रस्थ, गांवदेवी मंदिराजवळ, गोंधळपाडा माहितीकरीता संपर्क - ८१८०८६१२३४, ८१८०८५१२३४
- अलिबागमधील दुकानात कामासाठी मुलगा अथवा मुलगी हवी आहे. संपर्क : ८४२१३५४६४०
- सकाळी घरकामासाठी बाई हवी आहे. ८ ते १० पर्यंत (अलिबाग परिसरातील राहणाऱ्याला प्राधान्य.) संपर्क : ९२८४५५५३१४
- Fresh graduates required for office work. For interview call. ९९२३७५०५४९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

विवाहाचे निमंत्रण आता सोशल मीडियावरून

। रायगड । प्रतिनिधी ।

काळाचा महिमा अगाध आहे. त्याच्या पोटात जे गडप होते ते पुन्हा कधी बाहेर येतच नाही. मग त्या प्रथा, परंपरा असोत की अन्य काही. आता हेच बघाना, लग्नपत्रिकांची छपाई आणि वितरण हा विवाह सोहळ्याचा अविभाज्य घटक. नातेवाईकांची यादी तयार केल्यानंतर मिळेल त्या साधनाने गावोगावी पोहोचविणे जिकरीचे काम होते. त्यात वेळही फार जायचा.

पण, आता सोशल मीडियाचा जमाना आला. अवघ्या काही मिनिटांमध्ये शेकडो नातेवाईकांपर्यंत पोहोचता येते. वेळ आणि खर्चाची बचत होत असली तरी लग्नपत्रिका वाटपाच्या निमित्ताने नातेवाईकांच्या घरी जाऊन ख्यालीखुशाली जाणण्याचे, मुक्काम करण्याचे दिवस संपले आहेत. आजच्या डिजिटल युगात आधुनिक तंत्रज्ञानामुळे मानवी जीवनात अमूल्य बदल घडत आहेत. ज्या गोष्टींसाठी पैसा आणि वेळ विनाकारण वाया जातो, अशा अनेक गोष्टी आता तंत्रज्ञानाचा वापर करून चुटकीसरशी होत आहेत. यात सर्वच प्रकारच्या कार्यक्रमांचे निमंत्रण देण्याच्या प्रथेचा समावेश आहे. धूमधडाक्यात होणाऱ्या लग्न समारंभाचा महत्त्वाचा भाग म्हणजे लग्नाच्या निमंत्रण पत्रिका वितरित करणे. त्यासाठी खूप धावपळ करावी लागायची. नंतर मुहूर्त आणि त्यानंतरच लग्नपत्रिका तयार करण्याचे काम वधू-वराकडील मंडळींना असायचे. मुला-मुलींचे वडील लग्नपत्रिका नातेवाईक, स्नेही, आप्तजनांना देण्यासाठी प्रत्येकाच्या घरी जात होते. मात्र, आता मोबाईलवरून व्हॉट्स ॲप, फेसबुक यावरूनच निमंत्रण देण्याचा संदेश टाकला जातो. या नव्या पद्धतीमुळे घरोघरी जाऊन निमंत्रण देण्याची प्रथा लुप्त होण्याच्या मार्गावर आहे. एकूणच अलीकडे लग्नकार्यही हायटेक होत आहे.

तंत्रज्ञानामुळे मिटली चिंता

सोशल मीडियावरील विविध ॲपच्या माध्यमातून दूर असलेले आप्तेष्ट, मित्रपरिवाराला लगेच छापील पत्रिका पाठवून कार्यक्रमाचे निमंत्रण दिले जाते. पूर्वी लग्न जुळल्यानंतर गावोगावी जाऊन लग्नपत्रिका वितरित करावी लागत असे. लग्नाचे दिवस जसे जवळ आले त्यात कोणाकडे निमंत्रण पत्रिका पोहोचली नाही, याची चिंता आता मोबाईल क्रांतीमुळे मिटली. आमच्याकडे लग्नकार्य अमूक-अमूक महिन्यात असून, निमंत्रण पत्रिका वितरित करणे सुरू आहे. मात्र, वेळ कमी असल्याने दूरवरील मित्रमंडळी तसेच काही नातेवाईकांना व्हॉट्स ॲपवर पत्रिका पाठवून आमंत्रण दिले जाते.

खर्च अन् पैशांची बचत

डिजिटल पत्रिकेमुळे वेळ आणि पैशांसोबतच कागदाचा खर्चसुद्धा वाचतो. पर्यायाने पर्यावरणाचे संरक्षणसुद्धा होत आहे. अनेकदा लग्नपत्रिका वाटताना अनेकांचे अपघात होऊन जीव गेल्याच्या घटनाही घडल्या आहेत. परंतु आता डिजिटल पत्रिकेमुळे अशा घटना कमी झाल्या आहेत. पत्रिका संपल्याची तक्रारसुद्धा आता राहिलेली नाही. पूर्वी पत्रिका छपाईसाठी साधारण कुटुंबातील व्यक्तींना दोन ते पाच हजारांचा खर्च तर श्रीमंत व मोठे व्यावसायिक, नोकरदार ,धनदांडगेसुद्धा आपल्या कुवतीनुसार जास्त रकमेच्या व प्रतिष्ठेला शोभतील अशाच पत्रिका छापायचे. परंतु डिजिटल क्रांतीमुळे आता घरोघरी जाऊन निमंत्रण देण्याचा पायंडा मागे पडत आहे.

पर्यटक चाकरमान्यांची महामार्गावर रखडपट्टी

इंदापूर, माणगाव शहरातील वाहतूक कोंडीचा प्रवाशांना फटका

। माणगाव । प्रतिनिधी ।

मुंबई-गोवा महामार्गावरील माणगाव व इंदापूर शहरातील बाजारपेठेतील रस्त्यावरील वाहतूक कोंडी कमी होत नाही. त्यामुळे या शहराच्या दोनही बाजूला मोठ्या प्रमाणात वाहनांच्या लांबच रांगा लागल्या असल्याने तब्बल एक महिन्यापासून वाहतूक कोंडीचा फटका प्रवासी पर्यटक नागरिकांना नाहक बसत आहे. त्यामुळे इंदापूर व माणगावमधील नागरिकांची डोकेदुखी अधिकच वाढली आहे. शनिवार-रविवार ही नित्याचीच वाहतूक कोंडी असते. त्यातच हॉलीडे आणि उन्हाळी सुट्ट्या व यावर्षीची सुरु असणारी लगीनघाई यामुळे मुंबई, ठाणे, पुणे, सुरत येथे व परिसरात असणारा पर्यटक व चाकरमानी मोठ्या प्रमाणात कोकण व तळ कोकणात परतला आहे. उष्णतेने व्याकूळ झालेल्या पर्यटकांनी श्रीवर्धन, दिवेआगार, हरिहरेश्वर, मुरुड, काशीद बीच यासह अनेक ठिकाणी समुद्रात भिजण्यासाठी मोठ्या प्रमाणात गेले आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडीचा फटका सर्वांनाच बसला आहे.

ही वाहतूक कोंडी नित्याचीच होत असून नागरिकांची चांगलीच डोकेदुखी बनली आहे. या बाजारपेठेतील रस्ता कधी मोकळा श्वास घेणार, असा मार्मिक सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. लोकसभेची निवडणुक रायगड व रत्नागिरी व सिंधुदुर्ग येथील पार पडली असली तरी प्रवासी नागरिकांचीही लगबग कांही कमी झाली नाही. त्यातच शाळा विद्यालयाच्या परीक्षा आटोपल्यानंतर गावी जाण्याची लगबग सुरु झाली, त्यातच लग्नसराई सुरु झाल्याने नागरीकांनी गावाकडे कूच केली आहे. त्यामुळे माणगाव बाजारपेठेत पुन्हा वाहतुकीची कोंडी झाली असून त्याचा फटका नागरिकांना बसला आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरील माणगाव बाजारपेठेत दोन्ही बाजूंनी वाहतूक कोंडी झाल्याने पर्यटक नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली असून सकाळपासून संध्याकाळपर्यंत दिवसभर माणगावात वाहतूक कोंडी महामार्गावर मोठ्या प्रमाणात पाहायला मिळाली. याचा फटका प्रवासी नागरिकांना चांगलाच बसला असून या वाहतूक कोंडीचे कोडे कधी सुटणार, हा प्रश्न नागरिकांना भेडसावत आहे.

पुणे व पश्चिम महाराष्ट्रातून पर्यटक मोठ्या प्रमाणात पर्यटनासाठी रायगडात आले आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडी सोडविताना पोलिसांची चांगलीच दमछाक झाली आहे. उन्हाळ्याचे दिवस असल्याने दरम्यानच्या काळात या मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे पाण्यासाठी हाल होत आहेत. त्यामुळे पर्यटक नागरिकांच्या उत्साहावर वाहतूक कोंडीचे पाणीच पडले. कोकण व तळ कोकणात जाणाऱ्या व येणाऱ्या नागरिकांना या वाहतूक कोंडीशी सामना

वाहतुकीवर परिणाम

दर शनिवारी-रविवारी माणगाव व इंदापूर येथील मुख्य बाजारपेठेतील रस्त्यावर वाहतूक कोंडी पाहायला मिळते. या दोन्ही बाजारपेठेला बायपास काढण्याचे काम गेले अनेक वर्षापासून सुरु असून ते काम रखडले असल्याने नागरिकांना याचा नाहक फटका बसत आहे. आज सकाळपासूनच मुंबई-गोवा महामार्गावर माणगाव, इंदापूर या शहरात वाहतूक कोंडी झाली आहे. उन्हाळ्याचे सुट्या असल्याने महामार्गांनी प्रवासी नागरिकांच्या वाहनांच्या रांगा लागल्यामुळे वाहतूक संत गतीने सुरु होती. मुंबई-गोवा महामार्गावर मुंबई बाजूकडून वाहनाच्या रांगा महामार्गावर दिसत होत्या. पुणे बाजूकडून समुद्र व पर्यटना स्थळावर मौज मजा करण्यासाठी आपल्या कुटुंब व मित्रासह ग्रुप वर्षा सहलीसाठी मोठ्या प्रमाणांत आले आहेत. त्यामुळे सर्वांनाच या वाहतुक कोंडीचा फटका बसला. मुंबई-गोवा महामार्गावरील इंदापूर, माणगाव येथील बायपासचे काम पूर्ण झाल्यास माणगावमध्ये होणाऱ्या वाहतूक कोंडीचा प्रश्न कायमचा सुटेल. अशी आशा नागरिकांना वाटत असून हि वाहतूक सोडवण्यासाठी वाहतूक पोलीस तसेच महामार्ग पोलीस व माणगाव पोलीस विशेष प्रयत्न करीत आहेत.

पोलीस निरीक्षकाकडून पोलीस पाटलांच्या कामाचे कौतुक

। पाली । वार्ताहर ।

रायगड लोकसभेची निवडणूक ७ मे ला सुधागड तालुक्यातील. सर्व गाव वाड्यामध्ये कोणतेही अनुचित प्रकार न घडता शांततेत पार पडली. यामध्ये गावातील पोलीस पाटील यांनी या निवडणुकीत मोलाचे सहकार्य केले. आपल्या गावातील मतदान केंद्रावर बाहेरून आलेले सर्व कर्मचारी तसेच पोलीस कर्मचारी यांना सहकार्य करून त्यांनी आपली जबाबदारी चौक पणे निभावली. त्यांच्या या कामाची दखल घेत तालुक्यातील सर्व पोलीस पाटील यांचे पाली पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक सरिता चव्हाण यांनी कौतुक करून अभिनंदन केले.यावेळी

पाली पोलीस ठाण्याचे पीएसआय भास्कर गच्चे , आदीसह तालुक्यातील पोलीस पाटील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तालुक्यात ६० % मतदारांनी आपला हक्क बजावला.

या निवडणूक प्रक्रियेत सुधागड तालुक्यातील पोलीस पाटील व्यवस्थापक म्हणून मोलाचे सहकार्य केल्याबद्दल आभार ही मानले.

ॐ साई आर्थोपेडिक हॉस्पिटलचा शुभारंभ

। पेण । प्रतिनिधी ।

पेण येथील अल्पावधीतच नावारुपाला आलेले आर्थो पेडिक डॉक्टर वैभव गणेश ठाकूर यांच्या स्वतःच्या ॐ साई आर्थो पेडिक हॉस्पिटलचा शुभारंभ मा. नगराध्यक्षा प्रीतम पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मा. सभापती शेहनाज मुजावर, मा. नगरसेवक संतोष पाटील, मा. नगरसेवक अजय शिरसागर, डॉ. वैभव ठाकूर यांचे वडील गणेश ठाकूर व आई उषःप्रभा आदी मान्यवर उपस्थित होते.

पेण तालुक्यातील बोर्झेसारख्या दुर्गम भागात प्राथमिक शिक्षण, वाशी येथे माध्यमिक शिक्षण तर कनिष्ठ महाविद्यालय पेण प्रायव्हेट हायस्कूल पुढे वैद्यकीय क्षेत्रातील आर्थोपेडिक विषयात एम.बी.बी. एस.डी आर्थो विषयात डिग्री घेऊन काही काळ पेण सरकारी रुग्णालय येथे वैद्यकीय सेवा नंतरच्या काळात स्वतःचा खासगी रुग्णालय आणि आता स्वतःचे चार मजली आधुनिक सोयी सुविधांनी सज्ज असे हॉस्पिटल त्याचबरोबर या हॉस्पिटलमध्ये डॉ. वैभव यांची पत्नी डॉ. माधवी ठाकूर यांचा स्माइल दातांच्या दवाखान्याचादेखील शुभारंभ करण्यात आला.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

वीज ग्राहकांवर अतिरिक्त सुरक्षा ठेवीचा भार

अतिरिक्त रक्कम पाहून ग्राहक अवाक

। रायगड । प्रतिनिधी ।

महाराष्ट्रात विजेसाठी सर्वाधिक दर आहे. त्यात म हावितरणने १ एप्रिलपासून वीज दरवाढ लागू केली. शिवाय आता वीजबिलासोबत अतिरिक्त सुरक्षा ठेवीचेही देयक ग्राहकांना दिले जात आहे. महावितरणने एकाच महिन्यात वीज ग्राहकांना दिलेला हा दुहेरी मफ्शॉकफ्फ आहे. .तालुक्याचे तापमान ४३ अंशांवर गेले आहे. आणखी ऊन्ह तापणार असल्याचे हवामान खात्याने अंदाज वर्तविला आहे. दिवसा तीव्र उन्ह आणि रात्री उकाड्यापासून बचावासाठी रात्रभर कुलरही सुरू ठेवावा लागत आहे.

यामुळे विजेच्या मागणीत वाढ झाली असून बिलाची रक्कम ही वाढली आहे. या बिलासोबत अतिरिक्त सुरक्षा ठेवीचेही देयक देण्यात आल्याने ग्राहकांत संभ्रम निर्माण झाला आहे. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने गतवर्षी द्विवार्षिक वीज दरवाढीला मंजूरी दिली होती. त्यानुसार दुसऱ्या टप्प्यातील वाढ नवीन आर्थिक वर्षाच्या प्रारंभी म्हणजे एप्रिलपासून लागू झाली आहे. त्यामुळे ग्राहकांच्या खिशावर ६ ते ८ टक्के अधिकचा भार पडणार आहे

उन्हाळ्यात अधिक विजेच्या वापरामुळे भरमसाठ बिलासाठी तयार राहावे लागणार आहे. त्यात अतिरिक्त सुरक्षा ठेवीचे देयक एप्रिलमध्येच मिळाल्याने ग्राहकांचा पारा चांगलाच चढला आहे. आयोगाची विद्युत पुरवठा संहितेनुसार वीज ग्राहकांकडून सुरक्षा ठेव आकारली जाते. नवीन नियमांनुसार एप्रिलमध्ये ती दुप्पट करण्यात आली. त्यामुळे ग्राहकांचे नुकसान होईल.

अतिरिक्त सुरक्षा ठेव आकारण्याचा महावितरणला अधिकार आहे. पण आता राज्यभरात ङ्मप्रीपेड मीटरफलावले जाणार आहे. त्यासाठी निविदासुद्धा काढण्यात आली आहे. प्रक्रिया गतीने पुढे जात आहे. हे मीटर लागताच ग्राहकांना पूर्वीच पैसे मोजून नंतर तेवढ्या रकमेची वीज वापरता येणार आहे. अशात अतिरिक्त सुरक्षा ठेवींची गरज काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे. महावितरणकडून ङ्मप्रीपेड मीटरफ लावत असताना अतिरिक्त ठेवींची सक्ती करू नये. तसेच म ीटर लागताच जमा झालेली राशीही ग्राहकांना परत करावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

पर्यटकांचा अतिउत्साहीपणा स्थानिकांच्या जीवाशी

मद्यधुंद पर्यटकांनी दुचाकी स्वाराला उडविल्याचा आरोप

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबागहून पेणकडे जाणाऱ्या पर्यटकांच्या चारचाकी वाहनाची दुचाकीला जोरदार धडक लागली. या धडकेत दुचाकी चालक जखमी झाला असून, त्याला खासगी दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले आहे. मद्यधुंद अवस्थेत वाहन चालविणाऱ्या पर्यटकांचा अतिउत्साहीपणा स्थानिकांच्या जिवावर बेतला असता, असा आरोप स्थानिकांनी केला आहे. याबाबत स्थानिक पोलिसांकडून कारवाईत कसूर होत असल्याने स्थानिकांकडून नाराजी व्यक्त करण्यात आली आहे.

सुट्टीच्या हंगामात पर्यटक रायगड जिल्ह्यात फिरण्यास येत आहेत. शनिवार व रविवारी सुट्टीच्या दिवशी अलिबागसह अनेक पर्यटनस्थळे पर्यटकांनी बहरत आहेत. दरम्यान, शुक्रवारी रात्री एका पर्यटकांच्या भरधाव चारचाकी गाडीने स्थानिकाच्या दुचाकीला धडक दिली. या धडकेत चालक जखमी झाला. या अपघातानंतर चारचाकी वाहनातील पर्यटकांनी तेथून पळ काढण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, ते कार्ले येथील गावात घुसले. त्याठिकाणीदेखील त्यांनी दुचाकीचे नुकसान केल्याची माहिती समोर आली. रात्रीच्यावेळी हा प्रकार घडल्याने निद्रावस्थेत असलेले ग्रामस्थ जागे झाले. त्यांनी पर्यटकांचे वाहन थांबविण्याचा प्रयत्न केला. परंतु, वाहन त्यांनी थांबविले नाही. चारचाकी वाहनाच्या धडकेने दुचाकींच्या झालेल्या नुकसानीसह चालकाच्या दुखापतीकडे स्थानिक पोलिसांनी दुर्लक्ष केल्याचा आरोप काही स्थानिकांनी केला आहे.

घोणसे घाटात भीषण अपघात

* सुदैवाने कोणतीही जीवितहानी नाही
* ट्रक आणि मालाचे प्रचंड आर्थिक नुकसान

। म्हसळा । वार्ताहर ।

अपघातग्रस्त घोणसे घाटातून सिमेंट घेऊन नागोठण्याकडून म्हसळाकडे येणाऱ्या ट्रकला शुक्रवारी सकाळी १० वाजता भीषण अपघात झाला. अपघातात ट्रक क्र. एमएच ०६ बीडी १२१७ हा भरधाव असल्याने चालकाचे नियंत्रण सुटल्याने रस्त्यालगतच्या एका मोरीजवळ डोंगरावर आदळला. यामध्ये ट्रक आणि आतील सिमेंटचे भयंकर नुकसान झाले.

हा ट्रक नागोठण्याकडून म्हसळ्याकडे येत असता घोणसे घाटातील केळेवाडी या परिसरात तीव्र उतार आणि शीघ्र वळणावर चालकाचे भरधाव गाडीवरील नियंत्रण सुटल्याने अपघात झाला.

अपघातात ट्रक आणि आतील मालाचे भयंकर नुकसान झाले. सदर अपघात आज शुक्रवार, दि. १० रोजी सकाळी झाला. पोलीस कर्मचारी नवीन असल्यामुळे अपघाताची नोंद आणि डीआर देण्यास विलंब होत असल्याचे प्रभारी अधिकारी एपीआय पवन चौधरी यांनी सांगितले.

जाहीर नोटीस

माझे आशील यांनी दिलेल्या माहितीवरून व सांगितलेवरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणे:-

मिळकतीचे वर्णन

क्र	मौजे	गट नं.	क्षेत्र (हे.आर)/ आर. चौ. मी	आकार (रू.पैसे)
१	बामणोली. ता. अलिबाग,	५७/१	०.१२.४५ पो.ख. ०.०२.६० एकूण ०.१५.०५	३.२५
२	बामणोली, ता. अलिबाग,	५८/२	०.०८.३० पो.ख. ०.००.०० एकूण ०.०८.३०	१.६५
३	बामणोली, ता. अलिबाग,	५७/२	१३.२५.०० (बिनशेती)	१३२.५०

सदरहु मिळकतीत असलेली ग्रुप ग्रामपंचायत मानतर्फे झिराड कडे वर्णन असलेले मालमत्ता क्र. ११६, एकुण क्षेत्र ६१४० चौ. फुट

वर वर्णन केलेल्या सदरहु मिळकती या आज रोजी प्यारअली नाथाभाई हसलानी व बहादुर नाथाभाई हसलानी, रा. अलिबाग यांच्या नावे ७/१२ दप्तरी व असेसमेंट रेकॉडला मालकी हक्कात व ताबेकब्जात आहे. सदरहू मिळकतीचे विदयमान मालक यांनी माझे आशीलांस सदरहु मिळकती व गट नं. ५३ या मिळकतीतून २८.५ मीटर रुंद व ६ मीटर लांब असा सदरहु मिळकतीत ये जा करणारा रस्ता/रस्त्याचे हक्कासह सदरहु मिळकती विकत देण्याबाबत व्यवहार ठरविला आहे. सदरहू मिळकती या निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विदयमान मालक यांनी माझ्या आशिलांस दिला आहे. सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, वारसा हक्क, वहीवाटीचे हक्क, कुळ हक्क, भाडेकरार, ताबेकब्जा वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजुन माझे आशील विदयमान मालकांबरोबर पुढील व्यवहार ठरवून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक :- १३/०५/२०२४.

(ॲड. परेश एम. घरत)
तळमजला, अशोका शॉपींग सेंटर, एस. टी. स्टॅंडजवळ, अलिबाग ता. अलिबाग, जि. रायगड,
९८५०४८१२३४

जाहीर सूचना

सर्व संबधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे सातिर्जे, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील खाली नमुद केलेल्या वर्णनाची बिनशेती जमिन मिळकत श्री. दिलीप अप्पाराव खडतरे, राहणार पुणे, यांच्या मालकीची असून, सदरील बिनशेती जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरीत झाला आहे. सदर बिनशेती जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतींमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (चौ.मी.)	आकार (रु.पैसे)
सातिर्जे, ता. अलिबाग.	२७५/९	३-६५-०० एकूण	३६-५०

अलिबाग,
दिनांक : १२/०५/२०२४.

सही/
(ॲड. संजय म. भगत)
हिराबाग सोसायटी,अे विंग, टिळक रोड, अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

जाहीर सुचना

सर्व संबधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे सातिर्जे, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील खाली नमुद केलेल्या वर्णनाची बिनशेती जमिन मिळकत श्रीमती वरदा नारायण बापट, राहणार चेंढरे, तालुका अलिबाग, यांच्या मालकीची असून, सदरील बिनशेती जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरीत झाला आहे. सदर बिनशेती जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतींमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (चौ.मी.)	आकार (रु.पैसे)
सातिर्जे, ता. अलिबाग.	२७५/१०	३-६५-०० एकूण	३६-५०

अलिबाग,
दिनांक : १२/०५/२०२४.

सही/-
(ॲड. संजय म. भगत)
हिराबाग सोसायटी, अे विंग, टिळक रोड, अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

सिडको
शहरांचे शिल्पकार

जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून,खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **करारनामा / वाटपपत्र** प्रस्तावित आहे.

अ. क्र.	नोड व संचिका क्र.	भूसंपादन गाव व निवाडा क्र.	सर्व्हे क्र./ हि.क्र.	संपादित क्षेत्र (हे.आर)	मंजूर पात्रता (चौ.मी)	करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती	करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती	संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती
			ता. पनवेल, जि. रायगड					
१	उलवे ९२	उलवे ७	७३/६अ ७६/५ ७८/२ब ८१/४ ८१/५ब ८१/५ड ८२/३/१ ८२/५ ८१/५अ ८२/३(३)१ ९२/१	०-१७-७ ०-०४-० ०-०८-० ०-०४-० ०-०४-१ ०-०४-८ ०-३४-० ०-०६-३ ०-०६-५ ०-३८-९ ०-३४-०	एकुण मंजुर १९०० चौ.मी पैकी ३०० चौ.मी. प्रस्तावित	उलवे नोड येथील भूखंड क्र. ३७, सेक्टर-१५A, क्षेत्र-२९९.०४ चौ.मी.	कै. ताराबाई रामनाथ पाटील (मयत) यांचे वारस **१. श्रीमती सावित्री गणपत पाटील व** **२. श्रीमती मंदिरा उर्फ मंदिराबाई बबन ठाकुर**	रे.मु.क्र. २२६/२००८
		सोनखार ५	२१/५	०-५६-७				
			एकुण	**२-१९-०**				
२	उलवे २९२	बंबावी ५३	१८/५ब १९/३	०-३३-४ ०-२३-३	८०० चौ.मी. प्रस्तावित	उलवे नोड येथील भूखंड क्र. ९२, सेक्टर-२१, क्षेत्र-७९९.४०६ चौ.मी.	**कै. रामचंद्र त्रिंबक गायकवाड (मयत)** यांचे प्रोबेट सर्टिफिकेट ५४८/२०२१ नुसार वारस श्री. नरेश जगन्नाथ गायकवाड	-
		उलवे १९७	८४/८	०-१०-०				
		उलवे ४२	११३/५अ	०-२३-८				
			एकुण	**०-९०-५**				
३	उलवे १३८७	गव्हाण ५८४	१४३/१+२अ/३	०-२३-८	५०० चौ.मी. प्रस्तावित	उलवे नोड येथील इरादित भूखंड क्र. ३५२, सेक्टर-१९, क्षेत्र-४९९.६७ चौ.मी.	श्री. दत्ता उर्फ दत्तात्रेय चाया घरत	-
		गव्हाण २००	७६/३ ६०/९	०-१५-४ ०-१७-२				
			एकुण	**०-५६-४**				
४	उलवे १५२१	वहाळ ३५४	१४/४	०-१३-०	४०० चौ.मी. प्रस्तावित	उलवे नोड येथील भूखंड क्र. ५२, सेक्टर-५, क्षेत्र-३९९.५५ चौ.मी.	**कै. नुनीबाई नामदेव दापोलकर (मयत) यांचे वारस** १) श्री. सखाराम नामदेव दापोलकर, २) श्री. यशवंत नामदेव दापोलकर ३) श्री. धावजी नामदेव दापोलकर	-
		वहाळ ३५४	५०१/२ ५१५/३ ४८५/५	०-०५-० ०-०४-० ०-०७-०				
		पाडेघर ४६	४२क/४ १ब/५	०-१२-६ ०-०६-६				
			एकुण	**०-४८-२**				

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पूरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- मुख्य भूमी व भूमापन अधिकारी
सिडको भवन, तळ मजला, सी.बी.डी. बेलापूर,
नवी मुंबई ४०० ६१४.

अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (पनवेल)
सिडको/जनसंपर्क/०१७/२०२४-२५

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

निवडक

जोकोविचला दुखापत

रोम : नोव्हाक जोकोविच इटालियन ओपनरध्ये दमदार प्रदर्शन करत आहे. स्टार खेळाडू चाहत्यांना ऑटोग्राफ देत असताना अपघात झाला. रोमम धील इटालियन ओपन २०२४ मधील दुसऱ्या फ ेरीतील विजयानंतर जगातील नंबर वन सर्बियाच्या नोव्हाक जोकोविचच्या डोक्यावर स्टेनलेस स्टीलची बाटली आदळल्यानंतर, तो खाली कोसळला होता. त्यानंतर त्याला दवाखान्यात ॲडमिट करणात आले होते. तत्पूर्वी जोकोविचने फ्रान्सच्या कोरेन्टिन माउटेटचा पराभव केला.

पंतवर एका सामन्याची बंदी

दिल्ली : पंतवर आयपीएलच्या एका सामन्याची बंदी घालण्यात आली आहे. तो ७ मे रोजी अरुण जेटली स्टेडियमवर राजस्थान रॉयल्सविरुद्ध स्लो ओव्हर रेटसाठी दोषी आढळला होता. कोड ऑफ कंडक्टचे उल्लंघन केल्याप्रकरणी आयपीएलने त्याला दंड ठोठावला आहे. यासोबतच एका सामन्याची बंदीही घालण्यात आली होती. स्लो ओव्हर रेटसाठी पंतने तिसऱ्यांदा आयपीएलच्या आचारसंहितेचे उल्लंघन केले. त्यामुळे त्याच्यावर बंदी आणि ३० लाखांचा दंड ठोठावण्यात आला.

फुटबॉल संघाची घोषणा

नवी दिल्ली : फिफा विश्वचषक २०२६ च्या प्राथमिक संयुक्त पात्रता दुसऱ्या फेरीतील कुवेत आणि कतारविरुद्धच्या सामन्यांसाठी खेळाडूंची दुसरी यादी मुख्य प्रशिक्षक इगोर स्टिमॅक यांनी जाहीर केली.संभाव्य खेळाडूंमध्ये पी टेम्पा लचेनपा, विशाल कैथ आकाश मिश्रा, अन्वर अली, मेहताब सिंग, राहुल भेके, शुभाशिष बोस, अनिरुद्ध थापा, दीपक तांगडी, लालेंगमाविया राल्टे, लालियांझुआला छांगटे, लिस्टन कोलासो, सहल अब्दुल समद यांचा समावेश आहे.

बत्राने मनूला केले पराभूत

कुवेत : पॅरिस ऑलिम्पिकपूर्वी भारताच्या स्टार महिला टेबल टेनिसपटू मनिका बत्राने सौदी स्मॅश स्पर्धेत जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या चीनच्या वांग मन्यु हिचा पराभव करून तिच्या एकेरीच्या कारकिर्दीतील सर्वात मोठ्या विजयासह उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. जागतिक क्रमवारीत ३९व्या क्रमांकावर असलेल्या मनिकाने दुसऱ्या मानांकित चीनच्या खेळाडूवर ३७ मिनिटांचा सामना ६-११, ११-५, ११-७, १२-१० असा जिंकला.

जलतरणपटूंची मोहीम

ठाणे : अयोध्येतील राम मंदिर प्राणप्रतिष्ठापनेचे औचित्य साधून रामसेतू मोहीम आयोजित करण्यात आली आहे. या मोहिमेंतर्गत १२ तरुण जलतरणपटू श्रीलंकेतील तलाईमन्नार श्रीलंका ते भारतातील धनुष्कोडी हे २१ किलोमीटरचे अंतर रिले पद्धतीने पोहून पार करणार आहेत. अयोध्येतील भगवान रामाला त्यांच्या कर्मस्थानी मानवंदना देण्यासाठी आणि नव्याने बांधलेल्या राममंदिराची प्रतिष्ठा वर्धिष्णू करण्यासाठी या खास मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे.

चाहत्यांची वाढली चिंता

टी २० विश्वचषक स्पर्धा; रोहित, हार्दिकची सुमार कामगिरी

। मुंबई । वृत्तसंस्था ।

बीसीसीआयने टी २० विश्वचषक स्पर्धेसाठी आधीच भारतीय संघाची घोषणा केली आहे.भारतीय संघाची कमान पुन्हा एकदा रोहित शर्माच्या हातात आहे तर हार्दिक पांड्या उपकर्णधार म्हणून काम करताना दिसणार आहे. टी २० विश्वचषक सुरू होण्यास एक महिन्यापेक्षा कमी कालावधी शिल्लक आहे. पण आयपीएलचा हा हंगाम भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा आणि उपकर्णधार हार्दिक पांड्या या दोघांसाठी वाईट गेला आहे. त्याच वेळी, त्यांच्या आयपीएल संघ मुंबई इंडियन्सची कामगिरी देखील या हंगामात सर्वात खराब राहिली. आणि मुंबई या हंगामात बाहेर पडणारा पहिला संघ बनला आहे. आता या दोन खेळाडूंच्या खराब फॉर्ममुळे टी २० विश्वचषकापूर्वी चाहत्यांची चिंता वाढली आहे. कारण टी २० विश्वचषकासारख्या मोठ्या स्पर्धेपूर्वी कर्णधार आणि उपकर्णधार फॉर्मात नसतील तर संघ विश्वविजेता कसा होणार ?असा प्रश्न क्रीडाप्रेमींना पडला आहे.

रोहित शर्माची आयपीएल २०२४ मधील कामगिरी

रोहित शर्माने आयपीएल २०२४ मध्ये चांगली सुरुवात केली. पण रोहित ज्या प्रकारे शेवटच्या ६ डावात फलंदाजी करत आहे ते टी २० विश्वचषकापूर्वी भारतीय संघासाठी चांगले लक्षण नाही. या हंगामात आतापर्यंत रोहितने १३ सामन्यांत ३४९ धावा केल्या आहेत. या काळात रोहितनेही शतक झळकावले आहे. रोहितच्या शेवटच्या ६ डावांबद्दल बोलायचे झाले तर हिटमॅनच्या बॅटमधून केवळ ५३ धावा आल्या आहेत. टी २० विश्वचषकापूर्वी रोहित शर्मा फॉर्ममध्ये परतला नाही तर भारतीय संघाच्या अडचणी वाढू शकतात.

हार्दिकची आयपीएलमधील कामगिरी

आयपीएल २०२४ मध्ये हार्दिक पांड्या मुंबई इंडियन्सचे नेतृत्व करत आहे. मुंबई इंडियन्ससोबतच हार्दिकची कामगिरीही या हंगामात खूपच खराब राहिली. एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत दुखापत झाल्यानंतर हार्दिक क्रिकेटच्या मैदानापासून दूर होता, या हंगामात पांड्याने पुनरागमन केले पण तो फॉर्ममध्ये नाही.या हंगामात फलंदाजी करताना हार्दिकने १३ सामन्यांच्या १२ डावात केवळ २०० धावा केल्या आहेत. याशिवाय पांड्याच्या गोलंदाजीबद्दल बोलायचे झाले तर गोलंदाजीतही त्याला काही आश्चर्यकारक करता आले नाही. या हंगामात आतापर्यंत पांड्याला ११ बळी घेता आले आहेत. गोलंदाजीतही पांड्या चांगलाच महागडा ठरला आहे.

सलामीसाठी विराट उत्तम पर्याय : सौरभ गांगुली

भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार सौरव गांगुली यांनी त्याच्या फलंदाजीचे कौतुक केले. गांगुली यांनी आपले मत व्यक्त करताना म्हटले की, विराट कोहली यंदाच्या आयपीएलमध्ये छान फलंदाजी करीत आहे. कर्णधार रोहित शर्मा सलामीला फलंदाजी करतो. त्याच्यासोबत कोणता खेळाडू सलामीला फलंदाजी करील, याची उत्सुकता आहे. पण विराट कोहलीने रोहित शर्मासोबत सलामीला फलंदाजी करावी, असे सौरव गांगुली यांना वाटते. त्यामुळे भारताचा फलंदाजी विभाग आणखी मजबूत होईल, असे यामागील कारण आहे. सौरव गांगुली यांनी टी-२० विश्वकरंडकासाठी निवडण्यात आलेल्या भारतीय संघाचे कौतुकही केले. ते म्हणाले, भारताचा संघ समतोल आहे. फलंदाजी, तसेच गोलंदाजीमध्ये भारतीय संघ समतोल दिसून येत आहे. जसप्रीत बुमरा अव्वल दर्जाचा गोलंदाज आहे. अक्षर पटेल, मोहम्मद सिराज व कुलदीप यादव यांच्या समावेशाने अनुभवाची भर टीम इंडियात पडली आहे. सौरव गांगुली यांनी टी-२० क्रिकेटबद्दलही आपले मत व्यक्त केले. ते म्हणाले, संजू सॅमसन हा काही दिवसांपूर्वी म्हणाला होता की, टी-२० क्रिकेटमध्ये विश्रांतीला वेळ नसतो. प्रत्येक चेंडू हा टोलवावाच लागतो. यावरूनच टी-२० हे आक्रमक क्रिकेट आहे याची प्रचिती मिळते. यापुढेही असेच चित्र पाहायला मिळणार आहे.सध्या टी-२० लढतीत बहुतांशी वेळा २४० ते २५० धावा होताना दिसतात. भारतातील मैदाने लहान आहेत. तसेच खेळपट्ट्याही फलंदाजांना पोषक अशा बनवल्या जातात. इम्पॅक्ट प्लेयरच्या नियमामुळे अधिक फलंदाजांचा संघात प्रवेश होतो. या सर्व कारणांमुळे धावांचा पाऊस पडतो. त्यामुळे गोलंदाजांकडे कौशल्य असण्याची गरज आहे. जसप्रीत बुमरा, कुलदीप यादव यांसारख्या गोलंदाजांनी ठसा उमटवला आहे. बुमरा, कुलदीप, अक्षर पटेल हे तीनही प्रकारात सातत्याने खेळून प्रभाव टाकत आहेत, असे सौरव गांगुली म्हणाले.

कर्टनी वॉल्शने कोल्हापूर टस्कर्सच्या खेळाडूंशी साधला संवाद

। पुणे । वृत्तसंस्था ।

खेळाडूंना अनेक स्तरांतून प्रेरणा मिळू शकते, परंतु जेव्हा दिग्गज खेळाडू युवा क्रिकेटपटूंना महत्वाच्या टीप्स देण्यासाठी येतात तेव्हा वातावरण मंत्रमुग्ध होऊन जाते. महाराष्ट्र प्रीमियर लीगमधील कोल्हापूर टस्कर्सच्या खेळाडूंना असा अविस्मरणीय अनुभव आला, जेव्हा वेस्ट इंडिजचे माजी वेगवान गोलंदाज कर्टनी वॉल्श यांनी पुण्यातील हिंदू जिमखाना येथे संघाच्या प्रशिक्षण सत्राला भेट दिली.

कसोटीत ५०० बळी घेणाऱ्या पहिल्या खेळाडूचा मान पटकावलेल्या वॉल्श यांनी खेळाडूंसोबत बराच वेळ घालवला. त्यांच्या स्वतःच्या कारकिर्दीबद्दल त्यांच्याशी चर्चा केली आणि त्यांच्या प्रश्नांची उत्तरेही दिली. संवादादरम्यान खेळाडूंना संबोधित करताना वॉल्श यांनी नियंत्रित आक्रमकतेच्या महत्त्वावर भर दिला.

नियंत्रणाशिवाय आक्रमकता हानिकारक असू शकते. कधी फलंदाज जिंकतो तर कधी गोलंदाज, परंतु जर तुम्ही आक्रमकतेवर नियंत्रण ठेवू शकता आणि योजना ८०-९०टक्के चांगल्या प्रकारे अंमलात आणू शकत असाल, तर तुम्ही जास्त वेळा यशस्वी व्हाल,असे ५१९ कसोटी बळी आणि २२७ एकदिवसीय विकेट्ससह आपली कारकीर्द संपवणाऱ्या वॉल्श यांनी सांगितले.

केदार जाधव याच्या नेतृत्वाखालील कोल्हापूर टस्कर्सने गेल्या वर्षी महाराष्ट्र प्रीमियर लीगच्या पहिल्या आवृत्तीत उपविजेतेपद पटकावले होते. या वर्षी ट्रॉफी उचलण्याची तयारी करत असताना त्यांनी श्रीकांत मुंढे आणि अनिकेत पोरवाल यांना संघात सामील करून त्यांच्या संघाला आणखी मजबूत केले आहे.

सिद्धू ९० च्या दशकातील सर्वोत्तम फलंदाज

। लाहोर । वृत्तसंस्था ।

पाकिस्तानी संघाचा माजी खेळाडू वसीम अक्रम म्हणजे शेजारील देशाच्या क्रिकेटच्या इतिहासातील एक मोठे नाव. अक्रम म्हणजे धारधार गोलंदाजीसाठी ओळखला जाणारा घातक खेळाडू. ९० च्या दशकात सचिन तेंडुलकरसारख्या महान फलंदाजांनी अप्रतिम कामगिरी करताना इतिहास रचला. अशातच अक्रमने तेव्हाच्या काळात फिरकीपटूंविरुद्ध जबरदस्त फलंदाजी करणाऱ्या फलंदाजाचे नाव जाहीर केले आहे. वसीम अक्रमने सचिन तेंडुलकर आणि श्रीलंकेचा दिग्गज सनथ जयसूर्या यांचे नाव न घेता नवज्योतसिंग सिद्धू यांची सर्वोत्तम फलंदाजांमध्ये गणना केली.

वसीम अक्रम थेट म्हणाला की, ९० च्या दशकात नवज्योत सिंग सिद्धू असा फलंदाज होता जो फिरकीपटूंविरुद्ध जबरदस्त फलंदाजी करत असे. मी त्याला फिरकीपटूंविरुद्ध सर्वोत्तम फलंदाज मानतो.अक्रमने सांगितले की, सिद्धू हा खूप चांगला खेळाडू होता. मी त्याला समोरून कधीच गोलंदाजी केली नाही. योजना आखून त्याच्याविरूद्ध चेंडू टाकायचो. पण, ९० च्या दशकात त्याच्यासारखे फिरकीपटूंविरुद्ध कोणीही खेळले नाही, असे माझे ठाम मत आहे. मला वाटते की, ९० च्या दशकात फिरकीपटूंविरुद्ध जगातील सर्वोत्तम फलंदाज होता. तो फिरकीपटूंचा सामना करण्यात चांगला तरबेज होता.

सिद्धू सर्वोत्तम फलंदाज

माजी खेळाडू आणि विद्यमान समालोचक सिद्धू यांच्या क्रिकेट कारकिर्दीबद्दल भाष्य करायचे झाले तर, त्यांनी भारतीय संघासाठी ५१ कसोटी सामने खेळले असून, त्यांच्या नावावर ३२०२ धावांची नोंद आहे. त्यांनी कसोटीत ९ शतके आणि १५ अर्धशतके झळकावली आहेत. सिद्धू यांनी १३६ वन डे सामने खेळले आहेत, ज्यामध्ये त्यांना ४४१३ धावा करण्यात यश आले. या फॉरमॅटमध्ये त्यांनी ६ शतके आणि ३३ अर्धशतके झळकावली आहेत. दरम्यान, ९० च्या दशकात सिद्धूंची गोलंदाजांमध्ये वेगळीच दहशत होती. विशेषत: फिरकीपटूंविरुद्ध त्यांची फलंदाजी पाहण्यासारखी होती. सिद्धू फिरकीपटूंविरुद्ध लांब षटकार मारायचे. आजही जागतिक क्रिकेट त्यांच्या फलंदाजीचे कौतुक करत आहे.

मुमुक्षा घरत हिची कराटे स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

मोहपाडा रसायनी येथील श्री साईबाबा केंद्र संस्थान सभागृहात नुकताच गोशीन न्यू कराटे असोसिएशनच्या

वतीने आयोजित सोके कप कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेत विविध जिल्ह्यातील अनेक स्पर्धकांनी भाग घेतला होता. यामध्ये चौल सागमळा येथील फस्टडान ब्लॅक बेल्ट पदवी ग्रहण केलेली मुमुक्षा आनंद घरत हिने उत्कृष्ट कामगिरी करीत एक सुवर्ण व एक रौप्य पदक पटकावले.

मावळी मंडळाची राज्य कबड्डी स्पर्धा

पार्ले स्पोर्टस्, शिवशंकर, कर्नाळाची आगेकूच

। ठाणे । वृत्तसंस्था ।

श्री मावळी मंडळ आयोजित महाराष्ट्र राज्य कबड्डी स्पर्धेतील पुरुष विभागात मुंबई उपनगरच्या पार्ले स्पोर्टस् क्लब व जय भवानी तरूण मंडळासह ठाण्याच्या शिव शंकर क्रीडा मंडळानेही पुढल्या फेरीत प्रवेश केला. महिला विभागात रायगडच्या कर्नाळा क्रीडा व पुण्याच्या प्रकाश तात्या बालवडकर स्पोर्टस् फाऊंडेशन संघांनी प्रतिस्पर्ध्यांना पराभूत करीत पुढे पाऊल टाकले.

महिला विभागात कर्नाळा क्रीडा संघाने मुंबई शहरच्या अमर हिंद मंडळाचा ३६-२० असा १६ गुणांनी पराभव केला. मध्यांतराला कर्नाळा क्रीडा संघाकडे १५-१३ अशी २ गुणांची नाममात्र आघाडी होती. त्यानंतर कर्नाळा क्रीडा संघाच्या तेजा सकपाळ, रश्मी पाटील यांनी अतिशय उत्कृष्ट चढाया करीत आपल्या संघाची गुणसंख्या वाढवली व सामना आपल्या संघाच्या बाजूने झुकवला. पराभूत संघाकडून श्रद्धा कदम हिने एकाकी लढत दिली.

अन्य सामन्यात पुण्याच्या प्रकाश तात्या बालवडकर स्पोर्टस् फाउंडेशन संघाने चिपळूणच्या स्वराज्य स्पोर्टस् अकादमीचा संघाचा ५१-१३ असा ३८ गुणांनी धुव्वा उडवून घोडदौड केली. प्रकाश तात्या बालवडकर स्पोर्टस् फाउंडेशन संघाच्या हर्षा शेट्टी व अंकिता पिसाळ यांनी खोलवर चढाया करीत आपल्या संघाची गुणसंख्या भराभर वाढवत मध्यांतराला २७-०६ अशी २१ गुणांची विजयी आघाडी घेतली. त्यानंतर या दोन्ही खेळाडूंनी आक्रमक खेळ करीत सामना ३८ गुणांनी जिंकला.

अमनने गाठला पॅरिस ऑलिम्पिक कोटा

निशा दहियादेखील ठरली पात्र

। इस्तंबूल । वृत्तसंस्था ।

अमन सेहरावतने कुस्तीमध्ये भारतासाठी सहावा ऑलिम्पिक कोटा मिळवला आहे. इस्तंबूल येथे सुरू असलेल्या जागतिक ऑलिम्पिक पात्रता स्पर्धेत त्याने पुरुषांसाठी पहिला पॅरिस ऑलिम्पिक कोटा मिळवला होता. यापूर्वी महिलांमध्ये निशा दहियाने ६८ किलो वजनी गटात पाचवा कोटा गाठला होता.

निशापूर्वी ५० किलो वजनी गटात विनेश फोगट, ५३ किलो वजनी गटात अखिल पंघल, ५७ किलो वजनी गटात अंशू मलिक आणि ७६ किलो वजनी गटात हृतिक हुड्डा यांनी ऑलिम्पिक कोटा गाठला आहे.

माजी २३ वर्षाखालील जागतिक चॅम्पियन अमन सेहरावतने जागतिक ऑलिम्पिक पात्रता स्पर्धेच्या ५७ किलो वजनी गटाच्या उपांत्य फेरीत डेमोक्रॅटिक पीपल्स रिपब्लिक ऑफ कोरियाच्या चोंगसाँग हानचा १२-२ असा पराभव केला.

तत्पूर्वी, त्याने पाच टेकडाउनच्या आधारे बल्गेरियाच्या ऑलिंपियन जॉर्जी व्हॅन्गेलोव्हचा १०-४ असा पराभव करून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. त्यानंतर त्याने युक्रेनच्या आंद्रे यात्सेन्कोवर १२-२ असा विजय मिळवून आपले कोटा स्थान निश्चित केले.

दीपक पुनिया चुकला

टोकियो ऑलिम्पिकमध्ये देशाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या दीपक पुनियाचा ६८ क्रिलो ग्रोव्ह वजन गटात ऑलिम्पिक कोटा हुकला. आशियाई क्रीडा स्पर्धेतील रौप्यपदक विजेत्या दीपक पुनियाला सुरुवातीच्या काळात ३-० अशी आघाडी असतानाही चीनच्या झुशेन लिनकडून ६-४ ने पराभव पत्करावा लागला. झुशेन लिन नंतर उपांत्यपूर्व फेरीत पराभूत झाल्यामुळे बाहेर पडला, दीपक पुनियाच्या रिपेचेजद्वारे ऑलिम्पिक कोटा मिळवण्याच्या आशा संपुष्टात आल्या.

अल्फिया खानला रौप्यपदक

। नागपूर । वृत्तसंस्था ।

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागात तिकिट तपासणीस म्हणून कार्यरत असलेल्या अल्फिया खान पठाण हिने आशियाई बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये रौप्य पदक पटकावले आहे. कझाकस्तानमध्ये एशियन बॉक्सिंग कॉन्फेडरेशन तर्फे आशियाई बॉक्सिंग चॅम्पियनशिप आयोजित करण्यात आली होती. त्यात मध्य रेल्वेकडून अल्फिया सहभागी झाली होती. अल्फियाने ठिकठिकाणी बॉक्सिंग स्पर्धा गाजविल्या आहेत. आतापर्यंत आपली चमकदार कामगिरी प्रदर्शीत करून अल्फियाने १९ सुवर्ण, २ रौप्य आणि ३ कांस्य पदकांची कमाई केली आहे.

गावागावांत रंगतोय क्रिकेटचा थरार

। तळा । वार्ताहर ।

तळा तालुक्यात गावागावांत क्रिकेटचा थरार रंगत असून विजेत्या संघांसाठी आयोजकांकडून लाखोंची बक्षिसे लावण्यात येत आहेत. सध्या मे महिन्याची सुट्टी पडल्याने शहरात नोकरीसाठी स्थलांतरित झालेले तरुण सुट्टीसाठी मोठ्या प्रमाणावर आपल्या गावी परतले आहेत.यामुळे ग्रामीण भागात सर्वत्र क्रिकेटचे सामने आयोजित केले जात आहेत.

सध्या तालुक्यातील गावागावात, अगदी गल्लीबोळात देखील क्रिकेटच्या प्रीमियर लीग रंगू लागल्या आहेत. या प्रीमियर लीग पक्षाच्या किंवा त्या गावाच्या नावाने तसेच एखाद्या व्यक्तीच्या स्मरणार्थ भरविल्या जात आहेत. गावातील सरपंच ते मोठा नेता व पुढारी यासाठी बक्षिसांची रक्कम किंवा पूर्ण स्पर्धेचे आयोजन करतात.

या स्पर्धांमुळे गाव खेड्यातील प्रतिभावंत व होतकरू खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ व जोडीला थोडेफार आर्थिक पाठबळ देखील मिळत आहेत. गावागावातील मैदाने किंवा शेतात या स्पर्धा भरविल्या जातात. त्यासाठी मंडप बांधले जातात.सोबत डीजेदेखील लावला जातो. चांगले निवेदक बोलविले जातात. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे पंच यासाठी नेमले जातात. तसेच यावेळी मंडप व डेकोरेशन वाले, वडापाववाले, सरबत, पाणीवाले आदी व्यावसायिक व विक्रेत्यांना देखील चांगला धंदा मिळतो. आयोजकांच्या नावाचे व लोगो असलेले विविध टी शर्ट छपाई केली जाते.

एसबीए कप सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धा

चैतन्य, निक्षेप, सुदीप यांना विजेतेपद

। पुणे । वृत्तसंस्था ।

चैतन्य खरात, निक्षेप कात्रे, सुदीप खोराटे यांनी सुधांशू बॅडमिंटन अकादमीच्या वतीने आणि पीडीएमबीएच्या सहकार्याने आयोजित योनेक्स-सनराईझ एसबीए कप जिल्हा सुपर-५०० मानांकन बॅडमिंटन स्पर्धेत आपापल्या गटातील विजेतेपद पटकावले.

शिवाजीनगर येथील पीडीएमबीए मॉडर्न स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये ही स्पर्धा झाली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण पीडीएमबीएचे मानद सरचिटणीस सीए रणजीत नातु, संयुक्त सरचिटणीस सीए आनंद जोशी, स्पर्धा सचिव राजीव बाग, सुधांशू बॅडमिंटन अकॅडमीचे संस्थापक सुधांशू मेडसीकर यांच्या उपस्थितीत झाले. विजेत्यांना ट्रॉफी आणि रोख पारितोषिके देण्यात आली.

या स्पर्धेतील पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत अग्रमानांकित चैतन्य खरातने दुसऱ्या मानांकित प्रणव गावडेचे आव्हान २१-१७, १९-२१, २१-९ असे परतवून लावले आणि विजेतेपद पटकावले. यानंतर १९ वर्षांखालील मुलांच्या एकेरीत सुदीप खोराटेने बाजी मारली. सुदीपने अंतिम फेरीत ओजस जोशीवर २१-१४, १६-२१, २१-१० असा विजय मिळवला. निक्षेप कात्रेने १७ वर्षांखालील मुलांच्या गटात बाजी मारली. त्याने अंतिम फेरीत श्रेयस मासलेकरवर २१-१४, २१-१७ असा विजय मिळवला. स्पर्धेतील १५ वर्षांखालील मुलांच्या गटात तनिष्क आडेने विजेतेपद मिळवले. त्याने अंतिम फेरीत चिन्मय फणसेवर २१-२३, २१-१६ २१-१५ असा झुंजार विजय मिळवला. स्पर्धेतील १३ वर्षांखालील मुलांच्या एकेरीत एस. सोमजीने जेतेपद निश्चित केले. त्याने दुसऱ्या मानांकित हृदान पाडवेला २१-१६, २१-५ असे नमविले. यानंतर ११ वर्षांखालील मुलांच्या गटात अर्चित खानदेशेने तीन गेमपर्यंत चिवट लढा देऊन बाजी मारली. त्याने वेदांत मोरेवर ८-२१, १६-२१, २३-२१ अशी मात केली आणि विजेतेपद पटकावले.

शरदचंद्र छावलीने या स्पर्धेत दुहेरी मुकुट मिळवला. त्याने स्पर्धेतील ४० आणि ४५ वर्षांखालील गटाचे विजेतेपद पटकावले. स्पर्धेतील ४५ वर्षांखालील पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत शरदचंद्र छावलीने सत्यजित तरडलकरवर २१-१४, २०-२२, २३-२१ अशी मात करून विजेतेपद मिळवले. यानंतर ४० वर्षांखालील गटात शरदचंद्रने आशिष शेरॉनवर २१-१९, २२-२० असा विजय मिळवला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)